सोलापूर तरुण भारत
Solapur Tarun Bharat
न मे कर्मफले स्पृहा
छत्रपती संभाजीनगर, अहमदनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड येथून वितरित
छत्रपती संभाजीनगर | गुरूवार, २४ ऑक्टोबर २०२४ | वर्ष दुसरे | अंक २११ | पाने : ८+४ | किंमत रु. ६/- | www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

# दाना चक्रीवादळाचा धोका! काही भागात दिला अतिवृष्टीचा इशारा



भुवनेश्वर : बंगालच्या उपसागरात तयार झालेले कमी दाबाचे क्षेत्र खोल दाबात रूपांतरित झाले असल्यामुळे आज त्याचे 'दाना' या चक्रीवादळात रूपांतर होणार असल्याची बातमी समोर आली आहे. येत्या ४८ तासात ओडिशाच्या किनारपट्टीवर हे वादळ धडकणार असल्यामुळे किनारपट्टी लगतच्या सर्व भागात हवामान विभागाने अलर्ट मोड जारी केला आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, २४ आणि २५ ऑक्टोबर दरम्यान दाना चक्रीवादळ भीतरकनिका राष्ट्रीय उद्यान आणि ओडिशातील धामरा बंदरादरम्यान किनारपट्टीवर धडकण्याची शक्यता हवामान विभागाने वर्तवली आहे. यावेळी वाऱ्याचा वेग प्रतितास १००-११० किमी राहील. वाऱ्याचा वेग प्रति तास १२० किमी पर्यंत वाढू शकतो. त्यामुळे ओडिशा सरकारने राज्यातील सर्व शाळा आणि महाविद्यालये २६ ऑक्टोबरपर्यंत बंद ठेवण्याचे आदेश दिले आहेत. त्याचबरोबर मच्छिमारांना देखील समुद्रात न जाण्याची सूचना देण्यात आल्या आहेत.

कोणत्या ठिकाणी अतिवृष्टीचा इशारा?

हवामान विभागाने ओडिशा, गंगेच्या पश्चिम बंगालमध्ये अतिवृष्टीचा इशारा देण्यात आला आहे.

# उद्धव ठाकरेंनी दगा दिला; विश्वासघात केल्याने संभाजी ब्रिगेडने युती तोडली

पुणे : विधानसभा निवडणुकीच्या तोंडावर संभाजी ब्रिगेडने उद्धव ठाकरेंच्या शिवसेनेसोबतची युती तोडली आहे. पुण्यात झालेल्या बैठकीत हा निर्णय घेण्यात आला. अडीच वर्षापूर्वी संभाजी ब्रिगेड आणि उद्धव ठाकरे गट यांची युती झाली. परंतु दिलेला शब्द पाळला नाही, आश्वासने पूर्ण केली नाहीत, उद्धव ठाकरेंनी आम्हाला दगा दिला, असा आरोप करत संभाजी ब्रिगेड या युतीतून बाहेर पडली आहे.

याबाबत संभाजी ब्रिगेडचे नेते मनोज आखरे म्हणाले की, २०२२ मध्ये संभाजी ब्रिगेडने ठाकरेंच्या शिवसेनेशी युती केली होती. लोकसभा निवडणुकीत संभाजी ब्रिगेडने महाविकास आघाडीचा धर्म




पाळत प्रचंड ताकदीने सहकार्य केले. महाराष्ट्रात प्रत्येक ठिकाणी प्रचारक, वक्ते फिरले. लोकसभेत महाविकास आघाडीला त्याचा फायदा झाला. चांगल्या जागा मिळाल्या. विधानसभा निवडणुकीत आम्हाला ५-६ जागा देऊ असे उद्धव ठाकरेंनी आश्वासन दिले होते. मात्र गेल्या महिनाभर बैठका घेतल्या, पण आम्हाला ताटकळत ठेवले. कुठलाही निर्णय घेतलेला नाही, असा आरोप आखरे यांनी केला.

तसेच महिनाभरापासूनचे महाराष्ट्राचे राजकारण पाहता आपण स्वबळावर निवडणूक लढवली पाहिजे असे आम्ही ठरवले. त्यामुळे संभाजी ब्रिगेड महाराष्ट्रात ५०-६० जागांवर आमचे उमेदवार देणार आहे. संभाजी ब्रिगेडचा विश्वासघात झाला आहे. जो विश्वास आम्ही ठाकरेंच्या शिवसेनेवर ठेवला, महाविकास आघाडीवर ठेवला, त्याचा विश्वासघात झाला आहे. त्यामुळे महाराष्ट्रात मराठा बहुजनांच्या पुरोगामी चळवळी असतील त्यांना आवाहन आहे, त्यांनी महायुतीचे सनातन विषमता आणि महाविकास आघाडीचे बेगडी पुरोगामीत्व यांच्याविरोधात ताकदीने उभे राहिले पाहिजे.

हा महाराष्ट्र शिव शाहू फुले आंबेडकरांचा महाराष्ट्र आहे. हे लोक केवळ भाषणात त्यांची नावे घेतात पण कृतीत कुठलेही काम नसते. त्यामुळे जे लोक पुरोगामी विचारांचे आहेत त्यांनी संभाजी ब्रिगेडसोबत सहभागी व्हावे, असे आवाहन संभाजी ब्रिगेडचे मनोज आखरे यांनी केले आहे.

ऑगस्ट २०२२ मध्ये उद्धव ठाकरे यांनी संभाजी ब्रिगेडसोबत युती केली होती. त्यावेळी मातोश्रीवर झालेल्या पत्रकार परिषदेत ठाकरे म्हणाले होते की, प्रादेशिक अस्मिता वाचवण्यासाठी एकत्र यायला हवे असे अनेकजण म्हणतात, आता संभाजी ब्रिगेड आणि शिवसेना एकत्र येऊन मोठा इतिहास घडवू. आगामी सर्व निवडणुकीमध्ये संभाजी ब्रिगेड आणि शिवसेना एकत्र मैदानात उतरतील, असे ठाकरेंनी सांगितले होते.

# जया बच्चन यांना मातृशोक; इंदिरा भादुरी यांनी वयाच्या ९४ व्या वर्षी घेतला अखेरचा श्वास



भोपाळ : बॉलिवूडमधील अभिनेत्री जया बच्चन यांच्या आई आणि अमिताभ बच्चन यांच्या सासूबाई इंदिरा भादुरी यांचं निधन झाल्याची बातमी सध्या समोर येत आहे. वयाच्या ९४ व्या वर्षी इंदिरा भादुरी यांनी अखेरचा श्वास घेतलाय. इंदिरा भादुरी यांची प्रकृती गेल्या अनेक दिवसांपासून चिंताजनक होती आणि त्यांच्यावर रुग्णालयात उपचार सुरु होते, अशी माहिती सध्या समोर येत आहे. बच्चन कुटुंबावर इंदिरा भादुरी यांच्या जाण्याने दु:खाचा डोंगर कोसळला आहे. मंगळवार रात्री इंदिरा भादुरी यांची प्रकृती अधिकच बिघडली. त्यामुळे अमिताभ तातडीने भोपाळच्या दिशेने रवाना झाले. जया बच्चनसुद्धा भोपाळमध्ये पोहचल्या होत्या. मात्र, इंदिरा यांची आजाराशी झुंज अपयशी ठरली आणि भोपाळमधल्या रुग्णालयातच त्यांनी अखेरचा श्वास घेतला.

# चांदी खातेय भाव! पार केला लाखो रुपयांचा टप्पा

मुंबई : गेल्या काही महिन्यांपासून सोनं -चांदीच्या दरात मोठी वाढ होत आहे. त्यामुळे ऐन सणासुदीच्या काळात सर्वसामान्यांना सोनं चांदी खरेदी करणे आवाक्याबाहेरच असल्याचे दिसून येत आहे. परंतु आज सकाळी सोन्याचा भाव काहीसा कमी झाला आहे. मात्र चांदीने उच्चांक दर गाठला आहे. आजच्या दरात चांदीच्या किंमती तब्बल लाखांच्या पुढे पोहचल्या आहेत. त्यामुळे ग्राहकांना आता सोन्यासोबत चांदी खरेदी करणंही महाग पडणार आहे. पाहा काय आहेत सध्याचे सोनं-चांदीचे दर.



**काय आहेत सोन्याचे दर?**

२४ कॅरेट १ ग्रॅम सोन्याचा भाव ७ हजार ९७८ रुपये आहे. एक तोळा सोन्याचा भाव ७९ हजार ७८० रुपये आहे.

२२ कॅरेटच्या १ ग्रॅम सोन्याचा भाव ७,३१४ रुपये आहे. १० ग्रॅम सोन्याचा भाव ७३ हजार १४० रुपये आहे.

**चांदीचा भाव काय?**

आज १ किलो चांदीचा भाव आज १०० रुपयांनी वाढला आहे. त्यामुळे आजचा भाव १ लाख २ हजार रुपये इतका आहे. हेच दर राज्यातील विविध शहरात आहेत.

# विधानसभेसाठी पहिल्या दिवशी ५७ उमेदवारांचे ५८ अर्ज दाखल

तभा वृत्तसेवा/ विशेष प्रतिनिधी : मुंबई, दि. २२ ऑक्टोबर : महाराष्ट्र विधानसभा सार्वत्रिक निवडणूक करिता आजपासून उमेदवारी अर्ज दाखल करण्याची प्रक्रिया सुरू झाली. विधानसभेच्या २८८ मतदारसंघात पहिल्या दिवशी राज्यातून एकूण ५७ उमेदवारांचे ५८ नामनिर्देशन पत्र दाखल झाले आहेत, अशी माहिती मुख्य निवडणूक अधिकारी कार्यालयाने दिली आहे.

विधानसभाचे रणधुमाळी सुरू झाली असून २० नोव्हेंबरला मतदान तर २३ नोव्हेंबरला मतमोजणी होणार आहे. सत्तारूढ महायुती व विरोधी महाविकास आघाडीतील बहुतांश जागा निश्चित झाल्या असल्या तरीही अद्याप पूर्ण जागांचे वाटप झालेले नाही भाजपाने सर्वाधिक ९९ उमेदवारांची पहिली यादी जाहीर करून आघाडी घेतली आहे. निवडणुकीची आदर्श आचारसंहिता १५ऑक्टोबरपासून लागू आहे .आजपासून नामनिर्देशन पत्र भरण्यास सुरुवात झाली असून २९ ऑक्टबरला नामनिर्देशन पत्र भरण्याची शेवटची तारीख आहे. या अर्जाची ३० ऑक्टोबरला छानंनी करण्यात येऊन ४ नोव्हेंबर पर्यंत अर्ज मागे घेता येणार आहे.

# राष्ट्रवादी काँग्रेसची ३८ उमेदवारांची पहिली यादी जाहीर

## ९ मंत्र्यांसह ,उपाध्यक्ष व विद्यमान ३२ आमदारांचा समावेश

तभा वृत्तसेवा/ विशेष प्रतिनिधी

मुंबई, दि.२३ ऑक्टोबर: सत्तारूढ महायुती तील भाजपा व शिवसेना शिंदे गटाने विधानसभा निवडणुकीसाठी पहिली यादी जाहीर केल्यानंतर त्यांचा मित्र पक्ष असलेल्या राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाने बुधवारी ३८ उमेदवारांची पहिली यादी जाहीर केली आहे पक्षाचे प्रमुख उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्यासह आठ मंत्री, उपाध्यक्ष नरहरी झिरवाळ यांच्यासह विद्यमान ३२ आमदारांचा त्यात समावेश आहे.

प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे यांनी पत्रकार परिषदेत प्रदेश कार्यालयात उमेदवारांच्या नावाची घोषणा केली आहे.दुसरी यादी लवकरच जाहीर करणार असल्याचेही त्यांनी सांगितले.

उमेदवारांची नावे अशी :(कंसात मतदारसंघ)

अजित पवार (बारामती),छगन भुजबळ (येवला),

दिलीप वळसे पाटील (आंबेगाव),हसन मुश्रीफ (कागल),धनंजय मुंडे (परळी),नरहरी झिरवाळ (दिंडोरी), धर्मराव बाबा आत्राम (अहेरी),आदिती तटकरे (श्रीवर्धन),अनिल पाटील (अंमळनेर),संजय बनसोडे (उदगीर)रामकुमार बडोले (अर्जुनी मोरगाव), प्रकाश सोळंके (माजलगाव),मकरंद पाटील ( वाई), माणिकराव कोकाटे (सिन्नर),दिलीप मोहिते (खेड आळंदी),संग्राम जगताप (अहमदनगर शहर),दत्तात्रय भरणे (इंदापूर), बाबासाहेब पाटील (अहमदपूर), दौलत दरोडा (शहापूर),अण्णा बनसोडे (पिंपरी), नितीन पवार (कळवण),आशुतोष काळे (कोपरगाव),किरण लहामटे (अकोले), चंद्रकांत उर्फ राजू नवघरे (बसमत),शेखर निकम (चिपळूण),सुनील शेळके (मावळ),अतुल बेनके (जुन्नर),यशवंत माने (मोहोळ),चेतन तुपे (हडपसर), सरोज आहिरे (देवळाली),राजेश पाटील( चंदगड) हिरामण खोसकर (इगतपुरी),राजू कारेमोरे (तुमसर), इंद्रनील नाईक (पुसद),सुलभा खोडके (अमरावती शहर),भरत गावित (नवापूर),निर्मला विटेकर (पाथरी), व नजीब मुल्ला ( मुंब्रा-कळवा)

मलिक पितापुत्र झिशान सिद्दिकी वेटिंगवर

अजित पवार गटाच्या पहिल्या यादीत पक्षाचे ज्येष्ठ नेते व माजी मंत्री नवाब मलिक , त्यांची कन्या सना मलिक तसेच काँग्रेस मधून पक्षात आलेले विद्यमान आमदार झिशान सिद्दीकी यांचा समावेश नाही. त्यांचे तिकीट कन्फर्म असलेतरीही त्यांना अजून काही दिवस प्रतीक्षा करावी लागणार आहे तर आजच पक्षात आलेल्या काँग्रेसच्या आमदार सुलभा खोडके व हिरामण खोसकर तर भाजपाचे माजी मंत्री राजकुमार बडोले यांना स्थान देण्यात आले आहे.

# हरियाणा, पंजाब सरकारवर सुप्रीम कोर्टाची टीका

## दिल्ली-एनसीआरमधील प्रदूषणावर व्यक्त केली नाराजी

नवी दिल्ली, २३ ऑक्टोबर : दिल्ली-एनसीआरमधील प्रदूषणाच्या बिघडलेल्या परिस्थितीवर सर्वोच्च न्यायालयाने आज, बुधवारी कडक शब्दात ताशेरे ओढले. प्रदूषणाबाबत झालेल्या सुनावणीत हरियाणा, पंजाबसह केंद्र सरकारवरही सुप्रीम कोर्टाने नाराजी व्यक्त केली. गेल्या आठवड्यात याच प्रकरणावर सुनावणी करताना न्यायालयाने हरियाणा आणि पंजाब सरकारलाही भुसभुशीत शेतकऱ्यांवर कारवाई न केल्याबद्दल खडसावले होते. याशिवाय दोन्ही राज्यांच्या मुख्य सचिवांनाही समन्स पाठवण्यात आले होते.

पंजाब आणि हरियाणा सरकारवर टीका करताना सर्वोच्च न्यायालयाने म्हटले आहे की, दोन्ही राज्यांनी पेंढा जाळणाऱ्यांवर कोणतीही दंडात्मक कारवाई केली नाही. या सरकारांना कायद्याची अंमलबजावणी करण्यात खरोखरच रस असेल तर किमान खटला तरी चालेल, असे न्यायालयाने म्हटले आहे. सुप्रीम कोर्टाने पंजाबच्या मुख्य सचिवांना सांगितले की सुमारे १०८० उल्लंघन करणाऱ्यांवर एफआयआर नोंदवण्यात आला होता, परंतु तुम्ही केवळ ४७३ लोकांकडून नाममात्र दंड वसूल केला आहे. तुम्ही ६०० किंवा त्याहून अधिक लोकांना वाचवत आहात. असे वागून सरकार नियमभंग करणाऱ्यांना एक प्रकारे पाठबळ देते आहे. हा प्रकार गेल्या ३ वर्षांपासून सुरू आहे.

हरियाणाच्या मुख्य सचिवांनी सर्वोच्च न्यायालयात सांगितले की, पीक जाळण्याच्या ४०० घटना घडल्या. तसेच, राज्यात ३२ एफआयआर नोंदवण्यात आले आहेत. यावर नाराजी व्यक्त करताना सुप्रीम कोर्टाने म्हटले आहे की, पेंढी (पराली) जाळणाऱ्यांच्या आकडेवारीबाबत खोटे बोलले जात आहे. दर मिनिटाला आकडे बदलत आहेत.

# गुलाल उधळला नाही तर फाशी घेईन-शहाजीबापू पाटील

सांगोला , २३ऑक्टोबर : आगामी विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी शिवसेनेच्या शिंदे गटातील उमेदवारांची पहिली यादी जाहीर केली आहे. यामध्ये सर्व ४० विद्यमान आमदारांना पुन्हा उमेदवारी देण्यात आली आहे. यामध्ये सांगोल्याचे विद्यमान आमदार शहाजीबापू पाटील यांचाही समावेश आहे. उमेदवारी जाहीर झाल्यानंतर शहाजीबापू पाटील यांनी खासदार संजय राऊत यांच्यावर जोरदार टीका केली. पत्रकारांशी संवाद साधताना पाटील यांनी राऊत यांना माझ्याविरोधात दहा सभा



घेतल्या तरी त्याचा काही उपयोग होणार नाही, असे म्हणत कठोर शब्दांत आव्हान दिले. त्यांनी पुढे सांगितले की, संजय राऊत आणि उद्धव ठाकरे यांच्याकडे कोणतेही स्पष्ट नेतृत्व नाही फक्त टीका करण्याशिवाय त्यांच्याकडे कोणतेही मुद्दे नाहीत. त्यांनी राऊत यांना उद्देशून, मी विजयाचा गुलाल उधळला नाही तर फाशी घेईन, असे आव्हानात्मक विधान केले. याशिवाय पुणे येथे सापडलेल्या रोख रकमेबद्दलही शहाजीबापू पाटील यांनी आपली भूमिका स्पष्ट केली. सापडलेले पैसे व्यापारी रफिक शेख यांचे असून त्यांनी त्याची जबाबदारी घेतली आहे. मात्र या प्रकरणाचा राजकीय वापर करून एकनाथ शिंदे यांना बदनाम करण्याचा प्रयत्न संजय राऊत, जितेंद्र आव्हाड आणि रोहित पवार यांनी केला, असा आरोप पाटील यांनी केला.

# पिया मार्केटसमोरील अतिक्रमणावर मनपाचा हातोडा; कुंभारवाडा, रंगारगल्लीतील दुकाने जमीनदोस्त

छत्रपती संभाजीनगर : शहरातील पैठण गेट, गुलमंडी परिसरातील अतिक्रमणे हटविल्यानंतर महापालिकेच्या अतिक्रमण हटाव पथकाने कुंभारवाडा, रंगारगल्ली तसेच भाजीमंडई आणि पिया मार्केटसमोरील अतिक्रमणावर हातोडा मारला. दिवसभरात सुमारे ३५ दुकानासमोरील ओटे, शेड हटविण्यात आले.

चार पक्की बांधकाम असलेली दुकाने जमीनदोस्त करण्यात आली, अशी माहिती अतिरिक्त आयुक्त संतोष वाहुळे यांनी दिली. महापालिकेने शहराच्या मुख्य बाजारपेठेतील अतिक्रमण काढण्याची मोहीम हाती घेतली आहे. दोन दिवसापूर्वी गुलमंडीवरील अतिक्रमण हटविण्यात आले.

मनपा प्रशासक जी. श्रीकांत यांच्या मार्गदर्शनाखाली अतिरिक्त आयुक्त संतोष वाहुळे यांच्या नेतृत्वाखाली अतिक्रमण हटाव पथकाने आज मंगळवारी कुंभारवाडा, रंगारगल्ली, संभाजीपेठ भाजीमंडई, पिया मार्केट या ठिकाणी कारवाई केली. कुंभारवाडा आणि रंगारगल्लीत यापूर्वीही कारवाई करण्यात आली होती. मात्र, अवघ्या काही दिवसांमध्ये याठिकाणी दुकानदारांनी पुन्हा अतिक्रमण केल्याचे दिसून आले.

फळ विक्रेत्यांची दुकाने काढली पिया मार्केटसमोर रस्त्यावर अतिक्रमण करून फळ विक्रेत्यांनी दुकाने थाटली होती. दोन दुकानदारांनी रस्ता अडविल्याने या भागात वाहतूक कोंडीचा त्रास वाढला होता. या दुकानांवरही हातोडा मारून रस्ता मोकळा करण्यात आला. तसेच रस्त्याच्या दुतर्फा बसलेल्या भाजीविक्रेते, फळ विक्रेत्यांनाही हटविण्यात आले.

ओटे ही तोडले...

दुकानासमोर ओटे बांधून, शेड उभारून अतिक्रमण केले होते. मंगळवारी केलेल्या कारवाईत या भागातील ३५ ओटे तोडून रस्ता पूर्ण मोकळा करण्यात आला. तसेच कुंभारवाड्यातून भाजीमंडईकडे जाणाऱ्या रस्त्यावर देखील भाजीविक्रेत्यांसह दुकानदारांनी केलेले अतिक्रमण काढण्यात आले. त्यासोबत रस्त्यावरच बांधण्यात आलेली ४ पक्की दुकानेही जमीनदोस्त करण्यात आली. या कारवाईमुळे कुंभारवाडा आणि रंगारगल्लीतील रस्ता मोकळा झाला आहे. ही कारवाई अतिरिक्त आयुक्त संतोष वाहुळे यांच्या नेतृत्वाखाली इमारत निरीक्षक मझहर अली, सागर श्रेष्ठ, रवींद्र देसाई, नागरी मित्र पथकाचे प्रमुख प्रमोद जाधव यांच्यासह पथकातील कर्मचाऱ्यांनी केली.

# पाणी पुरवठा योजनेच्या कर्जासाठी शासनाला ठराव सादर

## तीन वर्षांतील उत्पन्न खर्चाचा लेखाजोखाही महापालिकेने मांडला

छत्रपती संभाजीनगर : नवीन पाणीपुरवठा योजनेसाठी महापालिकेला भरावा लागणाऱ्या हिश्श्यापोटी ८२२.२२ कोटी रुपये राज्य शासन महापालिकेला सॉफ्टलोन म्हणून देणार आहे. त्यासाठी विशिष्ट फॉरमॅटमध्ये शासनाने महापालिकेची आर्थिक स्थिती, घेतलेले कर्ज, कर्जाच्या हप्त्याची परतफेड आदींसंदर्भात माहिती मागविली होती. ही माहिती महापालिकेने शासनाला सादर केली आहे. या माहितीसोबतच ८२२ कोटी रुपयांच्या कर्जासाठी ठरावही पाठविण्यात आला आहे.

शहरासाठी केंद्र शासनाच्या अमृत-२ योजनेअंतर्गत नवीन पाणीपुरवठा योजना झालेली आहे. योजनेवर २७४० कोटी रुपये खर्च होणार असून, यातील सुमारे ७० टक्के हिस्सा केंद्र व राज्य शासनाने उचलला आहे. तर महापालिकेला सुमारे ३० टक्के हिस्सा भरण्याची अट योजनेत आहे. त्यासाठी महापालिकेला ८२२.२२ कोटी रुपये या योजनेत गुंतवावे लागणार आहे. तर केंद्र व राज्य शासनाने त्यांच्या हिश्श्याचा निधी उपलब्ध करून दिलेला आहे. महापालिकेची आर्थिक स्थिती फारशी चांगली नाही. जीएसटीच्या अनुदानावरच पगार व इतर खर्च भागतात. त्यामुळे या योजनेसाठी ८२२.२२ कोटींचा हिस्सा भरण्याची आर्थिक क्षमता महापालिकेची नाही, त्यामुळे शासनाने हा निधी अनुदान म्हणून ८२२ कोटींच्या कर्जासाठी शासनाला उपलब्ध करून द्यावा, असा प्रस्ताव शासनाला महापालिकेने पाठविला होता.

सॉफ्ट लोन स्वरूपात निधी

राज्य शासनाने अनुदान देण्यास नकार देत, महापालिकेला सॉफ्ट लोन म्हणून हा निधी कर्ज स्वरुपात उपलब्ध करून देण्यास मान्यता दिली आहे. त्यासाठी अध्यादेश काढून योजनाही तयार केली आहे. हे कर्ज वित्तीय संस्थेकडून दिले जाणार आहे. त्यामुळे राज्य शासनाने महापालिकेकडून आर्थिक स्थितीबाबत माहिती मागविली होती. त्यासाठी विशिष्ट असा फॉरमॅट पाठवून, त्यानुसार माहिती सादर करण्याची सूचना केली होती. महापालिकेने हि माहिती शासनाला सादर केली असून, लवकरच शासनाने नियुक्त केलेल्या वित्तीय संस्थेसोबत कर्जासाठी करार होणार आहे, अशी माहिती मनपा आयुक्त तथा प्रशासक जी. श्रीकांत यांनी दिली आहे.

पहिली दोन वर्षे हप्ते नाही

महापालिकेला ८२२.२२ कोटी रुपये कर्ज म्हणून मिळणार आहे. या कर्जाचा कालावधी १० वर्षांचा असून, पहिली दोन वर्षे हप्ता भरण्याची गरज नाही. मात्र, त्यानंतर पुढील ८ वर्षांत हे कर्ज फेडावे लागणार आहे. त्यामुळे या कर्जाची परतफेड कशी करणार, महापालिकेला मागील तीन वर्षात किती उत्पन्न मिळाले, तसेच खर्च किती झाला, महापालिकेने याआधी किती कर्ज घेतलेले आहे, त्याची परतफेड कशी चालू आहे आदी माहिती शासनाने मागविली होती. ती नुकतीच शासनाला सादर करण्यात आल्याचे सूत्रांनी सांगितले.

# ऑनलाईन फूड डिलीव्हरी महागणार!

## झोमॅटो प्लॅटफॉर्म फीमध्ये ६० टक्क्यांची वाढ

मुंबई : काही महिन्यांपूर्वी स्विगीसह झोमॅटो (नेर्रा) या फूड डिलीव्हरी कंपनीने प्लॅटफॉर्म फी वाढवली होती. त्यामुळे ग्राहकांना ऑनलाईन फूड डिलीव्हरी चांगलीच महाग पडत होती. त्यानंतर ऐन सणासुदीच्या काळात पुन्हा झोमॅटो कंपनीने त्यांच्या डिलिव्हरी चार्जमध्ये वाढ केली आहे. त्यामुळे झोमॅटोवरून फूड ऑर्डर करणाऱ्या ग्राहकांना वाढत्या महागाईत ऑनलाईन फूड डिलीव्हरीसाठी अधिक पैसे मोजावे लागणार आहेत.

मिळालेल्या माहितीनुसार, यापूर्वी झोमॅटो कंपनीने प्लॅटफॉर्म फीमध्ये २० टक्के वाढ केली होती. मात्र आता ही फी ६० टक्क्याहून अधिक वाढवण्याचा निर्णय घेतला आहे. ज्यामुळे ग्राहकांना प्रति ऑर्डरद्वारे प्लॅटफॉर्म फी ७ रुपयांऐवजी १० रुपये द्यावे लागणार आहेत.

नेमके कारण काय?

सणासुदीच्या कालावधीत झोमॅटो कंपनीचे ऑपरेशनल खर्च भरून काढण्यासाठी आणि सेवा




देण्यासाठी प्लॅटफॉर्म फीमध्ये वाढ केल्याचे सांगितले आहे. तसेच ही वाढ कंपनी सुरु ठेवण्यासाठी आणि इतर बिले भरण्यासाठी द्रखील उपयोगी पडू शकते असेही म्हटले आहे.

## जाहीर प्रगटन

**मा. दिवाणी न्यायाधिश साहेब, क. स्तर न्यायालय गंगापूर जि. औरंगाबाद**

सिव्हील एम.ए.क.४१६./२०२४

अर्जदार : १) ताराबाई जयराम पदार, वय. ६० वर्षे, धंदा, शेती, रा. पखोरा, ता. गंगापूर जि. औरंगाबाद २) भाऊसाहेब जयराम पदार, वय. ४८ वर्षे, धंदा, शेती, रा. पखोरा, ता. गंगापूर जि. औरंगाबाद ३) अतुल जयराम पदार, वय. ४४ वर्षे, धंदा, शेती, रा. पखोरा, ता. गंगापूर जि. औरंगाबाद ४) अरूण जयराम पदार, वय. ४२ वर्षे, धंदा, शेती, रा. पखोरा, ता. गंगापूर जि. औरंगाबाद ५) संगीता तातेराव चव्हाण, वय. ४६वर्षे, धंदा, शेती, रा. गोळेगांव, ता. खुलताबाद जि. औरंगाबाद

विरूध्द

गैरअर्जदार : निरंक

प्रकरण : वारस प्रमाणपत्र (हेअरशिप प्रमाणपत्र) मिळणे बाबत.

याअर्थी, वरील अर्जदारांनी ॲड. एस. के. लांडे यांच्या मार्फत या न्यायालयात वारस प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज दाखल केला आहे की, अर्जदार क. १ ही अर्जदार क. २ ते ५ यांची आई असून अर्जदार क. १ चे पती व अर्जदार क. २ ते ५ यांचे वडील नामे जयराम काशिनाथं पदार हे दि. ३१/१२/२०१७ रोजी मौजे पखोरा ता. गंगापूर जि. औरंगाबाद येथे मयत झाले आहे. अर्जदारांव्यतिरिक्त मयतास इतर कोणीही कायदेशीर वारसदार नाहीत. मयत जयराम काशिनाथ पदार यांच्या नावे जॉइन डीयर इंडिया लि. कंपनीचे ट्रॅक्टर वाहन ज्याचा नोंदणीकृत क. एम.एच.२० ए.एस. ७१० असा आहे. सदरचे ट्रॅक्टर हे आर.टी.ओ. ऑफीस कार्यालय औरंगाबाद येथे मयत जयराम काशिनाथ पदार यांच्या नावे नोंदणीकृत आहे. वर नमुद केल्याप्रमाणे मयत जयराम काशिनाथ पदार हे मयत झाल्यामुळे सदरचे ट्रॅक्टर हे वारसांने अर्जदार क. ३ च्या नावे करणे कामी अर्जदार हे प्रादेशिक परिवहन कार्यालय येथे गेले असता संबंधीत कार्यालयातील अधिकाऱ्यांने अर्जदारांना सदरचे वर नमुद ट्रॅक्टर हे वारसांने त्यांच्या नावे करणे कामी सक्षम दिवाणी न्यायालयातुन मयताचे कायदेशीर वारस असल्याचे प्रमाणपत्राची मागणी केली.

त्याअर्थी या जाहीर प्रगटनाव्दारे तमाम जनतेस कळविण्यात येते की, अर्जदारांच्या हक्कात त्यांनी मागणी केल्याप्रमाणे वारस प्रमाणपत्र जारी करण्यास कोणाचाही कोणत्याही प्रकाराचा आक्षेप, उजर असल्यास त्यांनी हे जाहीर प्रगटन प्रसिध्द झाल्यापासून ३० दिवसाच्या आत या न्यायालयात स्वतः किंवा वकिला मार्फत आक्षेप / उजर नोंदवावा. मुदतीत आक्षेप / उजर न आल्यास अर्जदारांच्या नावे वारस प्रमाणपत्र देण्यात येईल याची नोंद घ्यावी. करिता हे जाहीर प्रगटन.

दिनांक : २१/१०/२४

आदेशावरून
सहाय्यक अधिक्षक,
दिवाणी व फौजदारी न्यायालय, गंगापूर

## जाहीर प्रगटन

**मा. दिवाणी न्यायाधिश, (क. स्तर) न्यायालय गंगापुर ता. गंगापुर जि. औरंगाबाद.**

सिव्हील एम ए.क. १४६/२०२४

प्रकरणात पु. ता. ०७/१२/२०२४

अर्जदार : १) रूखमन छगनराव गायकवाड, वय ७० वर्ष, धंदा घरकाम, रा. पखोरा ता. गंगापुर जि. औरंगाबाद ह. मु. फुलेनगर, वडगांव ता. जि. औरंगाबाद २) आशाबाई आण्णासाहेब काळे, वय ४७ वर्ष, धंदा घरकाम, रा. प्लॉट क ६, टवाल किराणा स्टोर जवळ, रॉयल पार्क, विमान नगर, चिकलठाणा औरंगाबाद ता. जि. औरंगाबाद ३) लता कल्याण चव्हाण, वय ४३ वर्ष, धंदा घरकाम, रा. जागेश्वरी ता. गंगापुर जि. औरंगाबाद ४) कृष्णा छगन गायकवाड, वय ३९ वर्ष, धंदा मजुरी, रा. वडगांव कोल्हाटी ता. जि. औरंगाबाद ५) संतोष छगन गायकवाड, वय ३६ वर्ष, धंदा मजुरी, रा. वडगांव कोल्हाटी ता. जि. औरंगाबाद

विरुध्द

गैरअर्जदार :– निरंक

प्रकरण :– बॉम्बे रेगुलेशन ॲक्ट VIII 1827 अन्वये लिगल हेअरशिप सर्टिफिकेट मिळणे बाबत.

सर्व जनतेस कळविण्यात येते की, उक्त अर्जदार यांनी या न्यायालयात ॲड. एस. आर. शिराळे गंगापुर यांच्यामार्फत बॉम्बे रेगुलेशन ॲक्ट VIII 1827 अन्वये लिगल हेअरशिप सर्टिफिकेट मिळणे कामी अर्ज सादर केला आहे की, अर्जदार क १ ते ५ हे वरील नमुद ठिकाणची कायमस्वरूपी राहणारी असुन अर्जदार क १ हि अर्जदार क २ ते ५ यांची आई आहे म्हणजेच अर्जदार क २ ते ५ हे अपसात सख्खे भाउ व विवाहीत बहिनी आहेत. अर्जदार क १ चे पति व अर्जदार क २ ते ५ यांचे वडील नामे छगन तात्याराव गायकवाड हे दि. १४/०२/२०२३ रोजी बजाजनगर, वडगांव कोल्हाटी ता. जि. औरंगाबाद येथे मयत झालेले असुन मयतास अर्जदार क १ हि पत्नी व अर्जदार क २ व ३ हया विवाहीत मुली व अर्जदार क ४ व ५ हे मुले कायदेशीर वारसदार आहेत. मयतास अर्जदारांशिवाय इतर कोणीही कायदेशीर वारसदार नाही. मयत छगन तात्याराव गायकवाड यांना अर्जदार हेच एकमेव कायदेशीर वारसदार आहे. अर्जदारांच्या व्यतिरिक्त मयतांना इतर कोणीही वारसदार नाही. मयत छगन तात्याराव गायकवाड यांच्या मृत्यु मुळे अर्जदारांना शासकीय, निमशासकीय कामासाठी वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. म्हणुन अर्जदाराने प्रस्तुतचा अर्ज मा. न्यायालयात दाखल केला असुन वारस प्रमाणपत्राची मागणी केली आहे करीता सदर प्रकरणी कोणाचाही कोणत्याही प्रकारचा आक्षेप किंवा उजर असल्यास त्यांनी प्रस्तुत जाहीर प्रगटन प्रसिध्द झाल्यापासुन ३० दिवसाच्या आत या न्यायालयात नोंदवावा. त्यानंतर आलेल्या आक्षेपाचा विचार केला जाणार नाही. करीता जाहीर प्रगटन.

आज दि. २२ / १० /२०२४ रोजी माझ्या सहिने व या न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

आदेशावरूनलिपीक

लिपीक | सहाय्यक अधिक्षक

दिवाणी न्यायालय क. स्तर गंगापुर

## जाहीर प्रगटन

**मा. दिवाणी न्यायाधिश, (क. स्तर) न्यायालय गंगापुर ता. गंगापुर जि. औरंगाबाद.**

सिव्हील एम ए.क. ३९७ /२०२४

प्रकरणात पु. ता. १२/११/२०२४

अर्जदार : १) विमल भ्र. उत्तम गायकवाड, वय ४८ वर्ष, थंदा घरकाम, रा. डोमेगांव ता. गंगापुर जि. औरंगाबाद २) प्रकाश पि. उत्तम गायकवाड, वय ३१ वर्ष, धंदा मजुरी, रा. डोमेगांव ता. गंगापुर जि. औरंगाबाद ३) वंदना भ्र. कृष्णा दाणे, वय ४० वर्ष, धंदा मजुरी, रा. ह.मु. डोमेगांव ता. गंगापुर जि. औरंगाबाद ४) सावित्रा भ्र. अजय इंगळे, वय ३० वर्ष, धंदा घरकाम, रा. किराडपुरा औरंगाबाद ता. जि. औरंगाबाद ५) अश्विनी पि. उत्तम गायकवाड, वय २५ वर्ष, थंदा घरकाम, रा. डोमेगांव ता. गंगापुर जि. औरंगाबाद ६) दिव्या पि. उत्तम गायकवाड, वय १५ वर्ष, अ.पा.क. आई अर्जदार क १ विमल भ्र. उत्तम गायकवाड, वय ४८ वर्ष, धंदा घरकाम, रा. डोमेगांव ता. गंगापुर जि. औरंगाबाद

विरूध्द

गैरअर्जदार :– निरंक

प्रकरण : बॉम्बे रेगुलेशन ॲक्ट VIII 1827 अन्वये लिगल हेअरशिप सर्टिफिकेट मिळणे बाबत

सर्व जनतेस कळविण्यात येते की, उक्त अर्जदार यांनी या न्यायालयात ॲड. एस. आर. शिराळे गंगापुर यांच्यामार्फत बॉम्बे रेगुलेशन ॲक्ट VIII 1827 अन्वये लिगल हेअरशिप सर्टिफिकेट मिळणे कामी अर्ज सादर केला आहे की, अर्जदार क १ ते ६ हे वरील नमुद ठिकाणची कायमस्वरूपी राहणारी असुन अर्जदार क १ हि अर्जदार क २ ते ६ यांची आई आहे म्हणजेच अर्जदार क २ ते ६ हे अपसात भाउ व सख्खे बहिनी आहेत. अर्जदार क १ चे पति व अर्जदार क २ ते ६ यांचे वडील नामे उत्तम येडु गायकवाड हे दि.१३/०८/२०२४ रोजी डोमेगांव ता. गंगापुर जि. औरंगाबाद येथे मयत झालेले असुन मयतास अर्जदार क १ हि पत्नी व अर्जदार क २ हा मुलगा व अर्जदार क ३ ते ६ हया मुली कायदेशीर वारसदार आहेत. मयतास अर्जदारांशिवाय इतर कोणीही कायदेशीर वारसदार नाही. मयत उत्तम येडु गायकवाड यांना अर्जदार हेच एकमेव कायदेशीर वारसदार आहे. अर्जदारांच्या व्यतिरिक्त मयतांना इतर कोणीही वारसदार नाही. मयत उत्तम येडु गायकवाड यांच्या मृत्यु मुळे अर्जदारांना शासकीय, निमशासकीय कामासाठी वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. म्हणुन अर्जदाराने प्रस्तुतचा अर्ज मा. न्यायालयात दाखल केला असुन वारस प्रमाणपत्राची मागणी केली आहे करीता सदर प्रकरणी कोणाचाही कोणत्याही प्रकारचा आक्षेप किंवा उजर असल्यास त्यांनी प्रस्तुत जाहीर प्रगटन प्रसिध्द झाल्यापासुन ३० दिवसाच्या आत या न्यायालयात नोंदवावा. त्यानंतर आलेल्या आक्षेपाचा विचार केला जाणार नाही. करीता जाहीर प्रगटन.

आज दि. २२/१०/२०२४ रोजी माझ्या सहिने व या न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

आदेशावरून

लिपीक | सहाय्यक अधिक्षक

दिवाणी न्यायालय क. स्तर गंगापुर

## जाहीर प्रगटन

**माननिय दिवाणी न्यायालय कनिष्ठ स्तर वैजापुर यांच्या न्यायालयात**

दिवाणी किरकोळ अर्ज क्रं. १७९/२०२४

अर्जदार – १. कुसुम भ्र. हनुमंत कदम, रा. सुरेगांव, ता. कोपरगांव, जि. अहमदनगर २. उषाबाई भ्र. लक्ष्मीकांत देशमुख रा. लासुरगांव, ता. वैजापुर, जि. छ. संभाजीनगर ३. अनिता भ्र. अप्पासाहेब उगले रा. पावन गणेश मंदिराजवळ, नारलीबाग, छ. संभाजीनगर ता. व जि. छ. संभाजीनगर ४. शिल्पा आण्णासाहेब महाले रा. प्लॉट कं. २५, यशवंत हौसिंग सोसायटी, सिडको छत्रपती संभाजीनगर ता. व जि. छत्रपती संभाजीनगर ५. स्वप्नील आण्णासाहेब औराळकर रा. वरील प्रमाणे ६. चेतन आण्णासाहेब औराळकर रा. वरील प्रमाणे

विरूध्द

गैरअर्जदार – निरंक

विषय – कलम २ बॉम्बे रेगूलेशन कायदयाप्रमाणे वारसप्रमाणपत्र मिळणे बाबत....

ज्याअर्थी वरील अर्जदारांनी ॲड. भगवान एस. शिंदे यांच्या मार्फत या मा. न्यायालयात अर्जदार यांनी वारसाचे प्रमाणपत्र मिळणेकामी अर्ज दाखल केलेला आहे, सदरील अर्जात अर्जदार यांनी म्हटले आहे की, असे की, अर्जदार कं. १ ते ३ हया मयत वसंत आबा देशमुख व रत्नाबाई वसंत देशमुख यांच्या मुली आहेत. अर्जदार कं. ४ ते ६ हे वसंत आबा देशमुख व रत्नाबाई वसंत देशमुख यांची मयत मुलगी नामे सुशिला आण्णासाहेब महाले (औराळकर) यांची मुले व मुली आहे. वसंत आबा देशमुख हे दिनांक ०५/११/२००४ रोजी मौजे शिवुर, ता. वैजापुर जि. छत्रपती संभाजीनगर येथे मयत झालेले आहेत व रत्नाबाई वसंत देशमुख हया दिनांक २४/१२/२०१८ रोजी मौजे शिवुर, ता. वैजापुर, जि. छत्रपती संभाजीनगर येथे मयत झालेल्या आहेत. सुशिला आण्णासाहेब महाले (औराळकर) हया दिनांक ०४/११/२०२० रोजी मौजे औरंगाबाद येथे मयत झालेल्या आहे. अर्जदार कं. ४ ते ६ त्यांची मुले व मुली आहे. मयत वसंत आबा देशमुख, रत्नाबाई वसंत देशमुख व सुशिला आण्णासाहेब महाले (औराळकर) यांना अर्जदाराशिवाय इतर कोणतेही कायदेशीर वारसादार नाहीत. अर्जदार अर्जासोबत मयताचे मुत्युप्रमाणपत्र व अर्जदार यांचे आधार कार्ड जोडत आहे. असे की, मयत वसंत आबा देशमुख यांच्या नावावर मौजे शिवुर ता. वैजापुर येथे ग्रामपंचायत हददीत मालमत्ता कं. ८८१ क्षेत्र १३२४.४० चौ. फुट मध्ये बांधकाम केलले घर आहे, सदरील घर वारसाहक्काने अर्जदार यांनी त्यांचे नावे होणेकामी ग्रामपंचायत कार्यालय शिवुर, यांना विनंती केली असता, ग्रामपंचायत कार्यालय शिवुर यांनी अर्जदार यांना मा. न्यायालयातुन वारस प्रमाणपत्र आणण्याचे सांगितले, करीता अर्जदार यांना मा. न्यायालयातुन कायदेशीर वारसाचे प्रमाणपत्र मिळणे कामी सदरचा अर्ज मा. न्यायालयात दाखल केलेला आहे. असे की, मयत वसंत आबा देशमुख, रत्नाबाई वसंत देशमुख व सुशिला आण्णासाहेब महाले (औराळकर) यांना अर्जदाराशिवाय इतर कोणतेही कायदेशीर वारसदार नाहीत. अर्जदार यांनी या अर्जा व्यतिरिक्त कोणत्याही न्यायालयात ते मयत वंसत आबा देशमुख यांचे वारसदार आसल्याबाबतचे प्रमाणपत्र मिळणेकामी अर्ज दाखल केलेला नाही.

त्याअर्थी सर्व जनतेस कळविण्यात येते की, अर्जदार यांना ते मयताचे कायदेशीर वारसदार आसल्याचे प्रमाणपत्र देण्यास ज्या कोणाचा उजर व आक्षेप आसेल अशानी हे जाहिर प्रगटन प्रसिध्द झाल्यापासुन ३० दिवसांच्या आत त्यांचा उजर व आक्षेप या न्यायालयात नोंदवावा. मुदतीमध्ये कोणाचा उजर व आक्षेप न आल्यास अर्जदार यांना वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल, मुदतीनतंर आलेला उजर व आक्षेप ग्राहय धरला जाणार नाही. पुढील तारीख ०५/११/२०२४.

आज दिनांक २१/१०/२०२४ रोजी माझ्या सही व न्यायालयाच्या शिक्यानिशी दिले.

आदेशावरून

लिपिक | सहायक अधिक्षक

दिवाणी न्यायालय क–स्तर, वैजापूर

## जाहीर प्रगटन

**मा. श्रीमती ए.आय. आवटी सह–दिवाणी न्यायाधिश कनिष्ठ स्तर कन्नड यांचे न्यायालयातुन**

दिवाणी किरकोळ अर्ज क्रमांक : २५९/२०२४

पुढील तारीख : १८.११.२०२४

अर्जदार : १– घनशाम पिता विश्वासराव तायडे, वय ४० वर्षे, धंदा शेती, रा. नागापुर, ता. कन्नड, जिल्हा छ. संभाजीनगर (औरंगाबाद) २– अमोल पिता विश्वासराव तायडे, वय ३८ वर्षे, धंदा शेती, रा. नागापुर, ता. कन्नड, जिल्हा छ. संभाजीनगर औरंगाबाद ३– विमलबाई भ्र. विश्वासराव तायडे, वय ६५ वर्षे, धंदा घरकाम, रा. नागापुर, ता. कन्नड, जिल्हा छ. संभाजीनगर (औरंगाबाद) ४– कविता भ्र. केतन माळी, वय ४० वर्षे, धंदा घरकाम, रा. नागापुर, ता. कन्नड, जिल्हा छ. संभाजीनगर (औरंगाबाद) ह.मु. डी–१०१, शिवालिक अपार्टमेंट, बीहाईड गोविंदजी पार्क, सुरत गुजरात ५– यमुनाबाई भ्र. यादवराव तायडे, वय ८५ वर्षे, धंदा घरकाम, रा. नागापुर, ता. कन्नड, जिल्हा छ. संभाजीनगर औरंगाबाद

– विरुध्द –

गैरअर्जदार : महाराष्ट्र शासन, मार्फत जिल्हाधिकारी संभाजीनगर, जि. संभाजीनगर

अर्ज : वारसाचे प्रमाण पत्र मिळणे बाबत. Bombay Regulation Act

ज्या अर्थी अर्जदार यांचे वकील ॲड. डी.डी. जोशी यांच्या मार्फत या न्यायालयात अर्जदार हे वरील ठिकाणचे रहीवाशी असून अर्जदार यांनी सदरील अर्ज वारसाचे प्रमाण पत्र मिळावे म्हणून या न्यायालयात दाखल केले आहे. अर्जदार क्रमांक ३ चे पती व अर्जदार क्रमांक १,२ व ४ चे वडील नामे विश्वासराव यादवराव तायडे हे दिनांक १७.११.१९९३ रोजी मौजे नागापुर ता. कन्नड, जिल्हा छ. संभाजीनगर (औरंगाबाद), येथे मयत झालेले आहे, सोवत ग्राम पंचायत नागापुर यांचे कडील मृत्यु प्रमाण पत्र दाखल केले आहे. अर्जदार क्रमांक ५ ही मयत विश्वास तायडे यांची आई आहे. मयत विश्वासराव यादवराव तायडे यांचे वडील यादवराव लहानुजी तायडे हे दिनांक ११.१२.२०२३ रोजी मौजे नागापुर, ता. कनड, जिल्हा छ. संभाजीनगर (औरंगाबाद) येथे मयत झालेले आहे, विदयमान न्यायालयाचे अवलोकनासाठी सोबत ग्राम पंचायत नागापुर यांचे कडील दोघांचेही मृत्युप्रमाण पत्र दाखल केले आहे. मयताच्या नावे भविष्यात शासकीय निमशासकीय मिळणारे फायदे तसेच मयताच्या नावाने असलेल्या नोंदी वारस कायदया प्रमाणे संबंधीत रेकॉर्डला नोंद घेणेसाठी वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. सबब सदरील अर्ज करणेस कारण दिनांक १२.९.२०२४ रोजी घडले आहे. अर्जदार हे मयतांचे कायदेशीर वारस असल्याने अर्जदारां शिवाय मयतांना कोणीही ईतर वारस नाही. तसेच अर्जदार यांना सदरील वारसाचे प्रमाण पत्र हे शासकीय व निमशासकीय योजनेसाठी तसेच महसुल दप्तरी नोंद करण्यासाठी आवश्यक असल्याने वारस प्रमाण पत्राची अर्जदार हे मागणी करीत आहे. अर्जदार हे मे. न्यायालयाचे कक्षेत राहत असल्याने सदरील अर्ज चालविण्याचा व वारसाचे प्रमाण पत्र देण्याचा अधिकार मे. न्यायालयास आहे. सबव वरील प्रमाणे अर्जदार यांनी या न्यायालयात मागणी केली आहे.

त्या अर्थी सदरहू जाहीर प्रगटना व्दारे सर्व जनतेस कळविण्यात येत आहे की, अर्जदार हे मयताचे कायदेशीर वारस असल्या बाबत त्यांनी प्रस्तुतचा अर्ज या न्यायालयात वारस प्रमाण पत्र मिळणेसाठी अर्ज केलेला आहे, व त्या बाबत ईतर कुठल्याही वारसाचा उजर आक्षेप नाही या साठी प्रमाण पत्र देणे आहे. सबब या जाहीर प्रगटना व्दारे वरील वारस प्रमाण पत्र देण्या पुर्वी ईतर कुणासही आक्षेप उजर असल्यास सदर जाहीर प्रगटन वर्तमान पत्रांत प्रकाशित झाल्याच्या तारखेपासून ३० दिवसाच्या आत या न्यायालयात व्यक्तीगत किंवा रितसर वकीला मार्फत हजर व्हावे तसे न केल्यास . मुदतीत आक्षेप प्राप्त न झाल्यास अर्जदार यांना, मयतांचे कायदेशीर वारस असल्या बाबतचे वारसा हक्क प्रमाण पत्र प्रदान करण्यात येईल. सबब आज दिनांक ११.१०.२०२४ रोजी माझे सहीनिशी व मा. कोर्टाचे शिक्यानिशी दिले.

दिनांक ११.१०.२०२४

आदेशावरुन

लिपीक | सहाय्यक अधिक्षक

दिवाणी व फौजदारी न्यायालय कनिष्ठ स्तर कन्नड

## जाहीर प्रगटन

**माननीय श्रीमती. व्ही. एन. काटकर मॅडम, दिवाणी न्यायाधीश क. स्तर, कन्नड यांचे न्यायालयातून**

दिवाणी किरकोळ अर्ज क्र. २१८/२०२४

अर्जदार : १) धर्मा गंगाराम मोरे, वय ५४ वर्षे, धंदा–शेतो/मजूरी, रा. सायगव्हाण, ता. कन्नड, जि. औरंगाबाद २ चिंधा गंगाराम मोरे, वय ५३ वर्षे, धंदा–शेती/मजूरी, रा. सायगव्हाण, ता. कन्नड, जि. औरंगाबाद

विरूद्ध

गैरअर्जदार : महाराष्ट्र शासन, द्वारा–जिल्हा धिकारी, औरंगाबाद

अर्ज : वारस प्रमाणपत्र मिळणे बाबत.

ज्याअर्थी अर्जदार यांनी त्यांचे वकोल ॲड. एस. एन, उपासनो यांचे मार्फत या न्यायालयात अर्ज दाखल केला आहे को, अर्जदारांची आई नामे बाबूबाई गंगाराम मोरे ही होती ती दिनांक १८.०६.२०१४ रोजो मौजे सायगव्हाण, ता. कन्नड येथे मयत झाली आहे. तसेच अर्जदारांचे वडील नामे गंगाराम श्रावण मोरे हे देखील दिनांक ३०.०३.१९९४ रोजो मौजे सायगव्हाण, ता. कन्नड येथे मयत झाले आहे. मयत बाबूबाई गंगाराम मोरे यांना अर्जदार क्र. १ व २ हेच कायदेशीर वारस असून इतर कोणीही वारस नाही. अर्जदार यांना शासकीय, निमशासकीय विविध योजनेचा लाभ मिळण्यासाठी तसेच महसुल व इतर दप्तरी वारसाची नोंद घेण्यासाठी वारस प्रमाणपत्राची आवश्यकता असून तसे संबंधीत कार्यालयाने मागणी केलेली असल्याने अर्जदारास सदरचा अर्ज दाखल करणे भाग पडले आहे.

त्याअर्थी या जाहीर प्रगटनाद्वारे सर्व जनतेस सुचित करण्यांत येते की, सदरचे प्रकरणाबाबत कोणासही काही उजर आक्षेप असल्यास त्यांनी सदरचे जाहोर प्रगटन प्रसिध्द झाल्यापासून ३० दिवसाचे आत या न्यायालयात स्वतः अगर आपले विधिज्ञा मार्फत हजर राहून उजर आक्षेप सादर करावा, मुदतीत उजर आक्षेप न आल्यास अर्जदार क्र. १ ते २ चे हक्कात ते मयत बाबूबाई भ्र. गंगाराम मोरे यांचे वारस असल्याचे वारस प्रमाणपत्र प्रदान करण्याचा आदेश पारीत करण्यांत येईल.

दिनांक :२१/१०/२०२४

आदेशावरून

क. लिपिक | सहाय्यक अधिक्षक

दिवाणी न्यायालय, क. स्तर, कन्नड

## जाहीर प्रगटन

**माननीय श्रीमती. व्ही. एन. काटकर मॅडम, दिवाणी न्यायाधीश क. स्तर, कन्नड यांचे न्यायालयातून**

दिवाणी किरकोळ अर्ज क्र. २५४/२० २४

अर्जदार : १ जगन पिता सुखलाल राठोड, वय ४५ वर्षे, धंदा–शेती, रा. नागद तांडा, ता. कन्नड, जि. औरंगाबाद २ रामदेवबाई. भ्र. रणजीत बंजारी, वय ७४ वर्षे, धंदा–घरकाम, रा. शिरसमणी, ता. व जि. जळगांव ह. मु. नागद तांडा, ता. कन्नड, जि. औरंगाबाद २ लिलाबाई भ्र.. इंदल जाधव, वय ७४ वर्षे, धंदा–घरकाम, रा. तळवडे, ता. नांदगांव, जि. नाशिक ह. मु. नागद तांडा, ता. कन्नड, जि. औरंगाबाद ४ वजाबाई भ्र. तुळशिराम चव्हाण, वय ७५ वर्षे, धंदा–घरकाम, रा. नागद तांडा, ता. कन्नड

विरूद्ध

गैरअर्जदार : महाराष्ट्र शासन, द्वारा–जिल्हाधिकारी, औरंगाबाद

अर्ज : बॉम्बे रेग्युलेवान ॲक्ट प्रमाणे हेअरशिप सर्टिफिकेट मिळणे बाबत.

ज्याअर्थी अर्जदार यांनी त्यांचे वकील ॲड. एस. एन. उपासनी यांचे मार्फत अर्ज दाखल केला आहे की, अर्जदार क्र. १ ते ४ यांची आई नामे शांतीबाई सुखलाल राठोड हो दिनांक ११.०५. २०२४ रोजी मौजे नागद्द तांडा, ता. कन्नड येथे मयत झाली आहे. तसेच अर्जदार क्र. १ ते ४ चे वडील नामे सुखलाल भिका राठोड हे देखील १०–१२ वर्षापुर्वी मयत झाले आहे. मयतांना अर्जदारा शिवाय इतर कोणोही कायदेशीर वारत नसून अर्जदार हेच वारस आहे. अर्जदार यांना शासकीय, निमशासकीय विविध योजनेचा लाभ मिळण्यासाठी व महसूल व इतर दप्तरी वारसाची नोंद घेण्याताठी वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे व तसे संबंधीत अधिकारी यांनी मागणी केली करिता अर्जास कारण घडले आहे.

त्याअर्थी या जाहीर प्रगटनाद्वारे सर्व जनतेत सुचित करण्यांत येते की, सदर प्रकरणाबाबत कोणासही कांही उजर आक्षेप असल्यात त्यांनी सदरचे जाहीर प्रगटन प्रसिध्द झाल्यापासून ३० दिवसाचे आत या न्यायालयात स्वतः अगर आपले विधिज्ञा मार्फत हजर राहून उजर आक्षेप सादर करावा. मुदतीत उजर आक्षेप न आल्यास अर्जदार क्र. १ ते ४ यांचे हक्कात ते मयत शांतीबाई सुखलाल. राठोड, यांचे वारस असल्याचे वारस हक्क हेअरशिप प्रमाणपत्र प्रदान करण्याचा आदेश पारीत करण्यांत येईल,

दिनाक: २१/१०/२०२४

आदेशावरून

क. लिपिक | सहाय्यक अधिक्षक

दिवाणी न्यायालय, क. स्तर, कन्नड

## जाहीर प्रगटन

मा. श्री. व्ही.डी.पाटील साहेब दिवाणी न्यायाधिश कनिष्ठ स्तर कन्नड यांचे न्यायालयातुन

दिवाणी किरकोळ अर्ज क्रमांक: २५८/२०२४ पुढील तारीख : २७.११.२०२४

अर्जदार : १– यमुनाबाई भ्र. यादवराव तायडे, वय ८५ वर्षे, धंदा घरकाम, रा. नागापुर, ता. कन्नड, जिल्हा छ. संभाजीनगर २– अलकाबाई भ्र. बापुसाहेब तायडे, वय ६० वर्षे, धंदा घरकाम, रा. नागापुर, ता. कन्नड, जिल्हा छ. संभाजी नगर ३– मेघशाम पिता वापुसाहेब तायडे, वय ३८ ३८ वर्षे, धंदा शेती, रा. नागापुर, ता. कन्नड, जिल्हा छ. संभाजीनगर ४– ज्योती भ्र. अभिजीत पाटील, वय ३५ वर्षे, धंदा घरकाम, रा. नागापुर, ता. कन्नड, जिल्हा छ. संभाजीनगर ह.मु. मुकुंदवाडी जवळ, जालना रोड, ता. व जिल्हा छ. संभाजीनगर ५– पवन पिता बापुसाहेब तायडे, वय ३२ वर्षे, धंदा शेती, रा. नागापुर, ता. कन्नड, जिल्हा छ. संभाजीनगर

– विरुध्द –

गैरअर्जदार – महाराष्ट्र शासन, मार्फत जिल्हाधिकारी संभाजीनगर, जि. संभाजीनगर

अर्ज – वारसाचे प्रमाण पत्र मिळणे बाबत. Bombay Regulation Act

ज्या अर्थी अर्जदार यांचे वकील ॲड. डी.डी. जोशी यांच्या मार्फत या न्यायालयात अर्जदार हे वरील ठिकाणचे रहीवाशी असून अर्जदार यांनी सदरील अर्ज वारसाचे प्रमाण पत्र मिळावे म्हणून या न्यायालयात दाखल केले आहे. अर्जदार क्रमांक १ चा मुलगा, अर्जदार क्रमांक २ चे पती, अर्जदार क्रमांक ३ ते ५ यांचे वडील नामे वापुसाहेब ’यादवराव तायडे हे दिनांक १४.०२.२०२० रोजी मौजे नागापुर ता. कनड, जिल्हा औरंगाबाद येथे मयत झालेले आहे, सोबत ग्राम पंचायत नागापुर यांचे कडील मृत्यु प्रमाण पत्र दाखल केले आहे. मयत वापुसाहेव यादवराव तायडे यांचे वडील यादवराव लहानुजी तायडे हे दिनांक ११.१२.२०२३ रोजी मौजे नागापुर, ता. कनड, जिल्हा औरंगाबाद येथे मयत झालेले आहे, विदयमान न्यायालयाचे अवलोकनासाठी सोवत ग्राम पंचायत नागापुर यांचे कडील दोघांचेही मृत्युप्रमाण पत्र दाखल केले आहे. मयत वापुसाहेव यादवराव तायडे यांना मृत्यु पश्चात अर्जदार क्रमांक १ आई अर्जदार क्रमांक २ पत्नी, अर्जदार क्रमांक ३ व ५ मुले व अर्जदार क्रमांक ४ ही मुलगी असे वारस असून मयतास अर्जदारां शिवाय ईतर कुणीही वारस नाही. मयताच्या नावे भविष्यात शासकीय निमशासकीय मिळणारे फायदे तसेच मयताच्या नावाने असलेल्या नोंदी वारस कायदया प्रमाणे संबंधीत रेकॉर्डला नोंद घेणेसाठी वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. सबब सदरील अर्ज करणेस कारण दिनांक १२.९.२०२४ रोजी घडले आहे. अर्जदार हे मयतांचे कायदेशीर वारस असल्याने अर्जदारां शिवाय मयतांना कोणीही ईतर वारस नाही. तसेच अर्जदार यांना सदरील वारसाचे प्रमाण पत्र हे शासकीय व निमशासकीय योजनेसाठी तसेच महसुल दप्तरी नोंद करण्यासाठी आवश्यक असल्याने वारस प्रमाण पत्राची अर्जदार हे मागणी करीत आहे. अर्जदार हे मे. न्यायालयाचे कक्षेत राहत असल्याने सदरील अर्ज चालविण्याचा व वारसाचे प्रमाण पत्र देण्याचा अधिकार मे. न्यायालयास आहे. सबब वरील प्रमाणे अर्जदार यांनी या न्यायालयात मागणी केली आहे.

त्या अर्थी सदरहू जाहीर प्रगटना व्दारे सर्व जनतेस कळविण्यात येत आहे की, अर्जदार हे मयताचे कायदेशीर वारस असल्या बाबत त्यांनी प्रस्तुतचा अर्ज या न्यायालयात वारस प्रमाण पत्र मिळणेसाठी अर्ज केलेला आहे, व त्या बाबत ईतर कुठल्याही वारसाचा उजर आक्षेप नाही या साठी प्रमाण पत्र देणे आहे. सबब या जाहीर प्रगटना व्दारे वरील वारस प्रमाण पत्र देण्या पुर्वी ईतर कुणासही आक्षेप / उजर असल्यास सदर जाहीर प्रगटन वर्तमान पत्रात प्रकाशित झाल्याच्या तारखेपासून ३० दिवसाच्या आत या न्यायालयात व्यक्तीगत किंवा रितसर वकीला मार्फत हजर व्हावे तसे न केल्यास मुदतीत आक्षेप प्राप्त न झाल्यास अर्जदार यांना मयतांचे कायदेशीर वारस असल्या बाबतचे वारसा हक्क प्रमाण पत्र प्रदान करण्यात येईल. सबब आज दिनांक ११.१०.२०२४ रोजी माझे सहीनिशी व मा. कोर्टाचे शिक्यानिशी दिले.

दिनांक १९.१०.२०२४

आदेशावरून

लिपीक | सहाय्यक अधिक्षक

दिवाणी व फौजदारी न्यायालय कनिष्ठ स्तर कन्नड

## जाहीर प्रगटन

**माननीय श्रीमती. व्ही. एन. काटकर मॅडम, दिवाणी न्यायाधीश क. स्तर, कन्नड यांचे न्यायालयातून**

दिवाणी किरकोळ अर्ज क्र. २०६/२०२४

अर्जदार : १ आवलीबाई भ्र. धर्मा चव्हाण, वय ६५ वर्षे, धंदा–घरकाम, रा. बेलखेडा तांडा, ता. कन्नड, जि.छ. संभाजीनगर (औरंगाबाद) २. विजय पिता धर्मा चव्हाण, वय ५२ को धंदा–शेती, रा. बेलखेडा ताडा, ता. कन्नड ३. कैलास पिता धर्मा चव्हाण, वय ५० वर्षे, धंदा–शेती, रा. बेलखेडा तांडा, ताः कन्नड ४ अर्जुन पिता धर्मा चव्हाण, वय ४५ वर्षे, धंदा–शेती, रा. बेलखेडा तांडा, ता. कन्नड

विरुध्द

गैर अर्जदार : महाराष्ट्र शासन, मार्फत जिल्हाधिकारी, औरंगाबाद

अर्ज : बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट प्रमाणे हेअर शिप सर्टीफिकेट मिळणे बाबत.

ज्याअर्थी अर्जदार यांनी त्यांचे वकील ॲड. एस. एन. उपासनी यांचे मार्फत या न्यायालयात अर्ज दाखल केला आहे की, अर्जदार क्र. १ चे पती व अर्जदार क्र. २ ते ४ चे वडील नामे धर्मा मांगू चव्हाण हे दि. ११.४.२०२१ रोजी मौजे बेलखेडा तांडा, ता. कन्नड येथे मयत झाले आहे. मयतास अर्जदार क्र. १ ते ४ हेच कायदेशीर वारस असून इतर कोणीही वारस मयतात नाही. अर्जदार यांना शासकीय, निमशासकीय विविध योजनेचा लाभ घेण्यासाठी व महसुल व इतर दप्तरी वारसाची नोंद घेण्यासाठी वारस प्रमाणपत्राची आवश्यकता असून तसे संबंधीत कार्यालयाने वारस प्रमाणपत्राची मागणी केली करिता अर्जात कारण घडले आहे.

त्याअर्थी या जाहीर प्रगटनाद्वारे सर्व जनतेस सुचित करण्यांत येते की, सदर प्रकरणाबाबत कोणासही काही उजर आक्षेप असल्यास सदरचे जाहीर प्रगटन प्रसिध्द झाल्यापासून ३० दिवसाचे आत या न्यायालयात स्वतः अगर आपले विधिज्ञा मार्फ हजर राहून उजर आक्षेप सादर करावा, मुदतीत उजर आक्षेप न आल्यास अर्जदार क्र. १ ते ४ यांचे हक्कात ते मयत धर्मा, मांगू चव्हाण यांचे वारस असल्याचे वारस हक्क हेअर शिप प्रमाणपत्र देण्याचा आदेश पात्रीत करण्यांत येईल.

दिनांक २१/१०/२०२४

आदेशावरून,

क.. लिपिक | सहाय्यक अधिक्षक

दिवाणी न्यायालय, क. स्तर, कन्नड

## जाहीर प्रगटन

**मा. व्ही. डी. पाटील साहेब, दिवाणी न्यायाधिश क. स्तर कन्नड यांचे न्यायालयात.**

दि.कि. अर्ज नं. २९४/२०२४

अर्जदार : १) दत्तात्रय गणपत ढंगारे, वयः ४० वर्षे, धंदाः शेती, रा. नागापूर, ता. कन्नड, जि. औरंगाबाद २. व्दारकाबाई गणपत ढंगारे, वयः ५६ वर्षे, धंदा: घरकाम, रा. नागापूर, ता. कन्नड, जि. औरंगाबाद. ३. स्वाती अशोक बनसोड, वयः ३८ वर्षे, धंदाः घरकाम, रा. नागापुर, ह.मु. केहऱ्हाळा, ता. सिल्लोड, जि. औरंगाबाद, ४. पुष्पाबाई प्रभू देवकर, वयः ३९ वर्षे, धंदाः घरकाम, रा. नागापुर, ह.मु. चिंचोली नकीब, ता. फुलंब्री, जि. औरंगाबाद. ५. शरद गणपत ढंगारे, वयः ३५ वर्ष, धंदाः शेती, रा. नागापुर, ता. कन्नड, जि. औरंगाबाद.६. सुरेश गणपत ढंगारे, वयः ३२ वर्षे, धंदाः शेती, रा. नागापुर, ता. कन्नड, जि. औरंगाबाद. ७. रुपाली अनिल जाधव, वयः २६ वर्षे, धंदाः घरकाम, रा. नागापुर, ह.मु., रांजनगाव, ता. गंगापुर, जि. औरंगाबाद.

विरुध्द

गैरअर्जदार : महाराष्ट्र शासन, व्दारा जिल्हा अधिकारी कार्यालय औरंगाबाद.

ज्याअर्थी अर्जदार यांनी त्यांचे विधीज्ञ डी. डी. जोशी यांचे मार्फत वारस प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज दाखल केला आहे की, अर्जदार क्र. १ ते ६ हे वरील प्रमाणे कायमचे रहिवासी आहे. अर्जदार क्र. २ चे पती व अर्जदार क्र. १ व ३ ते ७ यांचे वडील नामे गणपत कोंडाजी ढंगारे यांना अर्जदार क्र. १ ते ७ व्यतिरीक्त कोणीही वारस नाहीत. अर्जदार क्र. २ ही मयत गणपत कोंडाजी ढंगारे यांची पत्नी असुन अर्जदार क्र. १, ५ व ६ हे मुले व अर्जदार क्र. ३, ४ व ७ हया मयताच्या मुली आहे. अर्जदार क्र. २ यांचे पती तसेच अर्जदार क्र. १ व ३ ते ७ यांचे वडील हे दि.२४/०७/२०२४ रोजी मयत झालेले आहे. तसेच त्यांचा अंत्यसंस्कार हा नागापूर, ता. कन्नड येथे करण्यात आलेला आहे. तसेच मयत गणपत कोंडाजी ढंगारे यांचे वडील नामे कोंडाजी गणु ढंगारे हे दि. ०८/१२/२०१८ रोजी मयत झालेले असुन मयतगणपत कोंडाजी ढंगारे यांची आई नामे सरुबाई कोंडाजी ढंगारे ही देखील दि.०३/०५/२०२४ रोजी मयत झालेली आहे. दोघांचेही मृत्यु प्रमाणपत्र अर्जासोबत जोडत आहे. मयत गणपत कोंडाजी ढंगारे यांना अर्जदारांशिवाय कोणतेही कायदेशीर वारस नाहीत. मयत गणपत कोंडाजी ढंगारे यांना मिळणारा शासकीय व निमशासकीय योजनेचा लाभ घेण्यासाठी तसेच महसुल दप्तरी वारसांची नोंद घेण्यासाठी अर्जदार यांना वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे, अर्जदार हे ग्रामपंचायत मध्ये वारसप्रमाणपत्र घेण्यासाठी गेले असता संबंधीत अधिकाऱ्यांनी मा. न्यायालयातुन कायदेशीर वारस प्रमाणपत्र घेवुन येण्याचे सांगीतले, त्यामुळे सदर अर्ज दाखल करण्यास कारण घडले.

त्याअर्थी सदरील जाहीर प्रगटनाव्दारे सर्व जनतेस सुचीत करण्यात येते की, सदरील प्रकरणाबाबत कोणाचाही काही उजर, अक्षेप अथवा वारस प्रमाणपत्र अर्जदाराला देण्याचा कोणाचीही काही हरकत असल्यास सदरील जाहीर प्रगटन प्रसिध्द झाल्यापासुन ३० दिवसाच्या आत स्वतः अगर आपले विधीज्ञामार्फत हजर होवुन उजर, आक्षेप नोंदवावा व मुदतीत उजर, आक्षेप न आल्यास अर्जदाराच्या हक्कात वारसाचे प्रमाणपत्र देण्याचे आदेश देण्यात येईल याची नोंद घ्यावी.

सबब हे जाहीर प्रगटन.

दिनांक १९/१०/२०२४

आदेशावरुन
सहाय्यक आधक्षक कन्नड

## जाहीर प्रगटन

**मा.सो काटकर मॅडम, दिवाणी न्यायाधीश साहेब कन्नड यांच्या न्यायालयतून.**

दि.की. अर्ज.क्र : २६३/२०२४

पुढील तारीख : ३०/११/२०२४.

अर्जदार : १) बिजालाबाई भ्र. जगन्नाथ आढाव वय: ७० धंदा मजुरी रा. रेल नावडी कन्नड ता. कन्नड जि. औरंगाबाद २) कैलास जगन्नाथ आढाव वय: ५६ धंदा : मजुरी रा. रेल नावडी कन्नड ता. कन्नड जि. औरंगाबाद ३) देविदास जगन्नाथ आढाव वय: ४७ धंदा मजुरी रा. रेल नावडी कन्नड ता. कन्नड जि. औरंगाबाद ४) ज्ञानेश्वर जगन्नाथ आढाव वय: ४५ धंदा मजुरी रा. रेल नावडी कन्नड ता. कन्नड जि. औरंगाबाद ५) नामदेव जगन्नाथ आढाव वय: ४३ धंदा मजुरी रा. रेल नावडी कन्नड ता. कन्नड जि. औरंगाबाद ६) विठाबाई भ्र. विजय जाधव वय: ४८ धंदा : मजुरी रा. रेल नावडी कन्नड ता. कन्नड जि. औरंगाबाद ७) पुष्पाबाई भ्र. पंढरीनाथ वने वय: ४० धंदा : मजुरी रा. रेल नावडी कन्नड ता. कन्नड जि. औरंगाबाद

विरुद्ध

गैरअर्जदार – महाराष्ट्र शासन, मार्फत जिल्हा अधिकारी, औरंगाबाद.

अर्ज –: बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट १८२७ चे कलम ३ प्रमाणे कायदेशीर वारस निश्चित होऊन प्रमाणपत्र मिळणे बाबत.

ज्या अर्थी अर्जदाराने त्याचे वकील श्री. शुभम.आर. राऊत यांचे मार्फत श्री. जगन्नाथ महादु आढाव हे दि. २९/०४/२०२२ रोजी मयत झाले आसून अर्जदार क्र. १ ही मयताची पत्नी आहे व अर्जदार क्र. २ ते ७ हे मयताचे मुले आहे. अर्जदार क्र. १ चे पती मयत जगन्नाथ महादु आढाव मृत्यू दि. २९/०४ /२०२२ रोजी यथे मरण पावले आहे. सोबत ग्रामपंचयात रेल नावडी ता. कन्नड जि. छ. संभाजीनगर यांनी दिलेले मृत्यू प्रमाणपत्र सोबत दाखल करीत आहे. अर्जदार क्र.१ हिस मयत जगन्नाथ महादु आढाव यांचा मृत्यू पश्चात तहसिल कार्यालय, ग्रामपंचायात कार्यालय, उपअधीक्षक भूमि कार्यालय, गाव, नगर व शहर भुमापन कार्यालय, तलाठी कार्यालय, गट विकास अधिकारी कार्यालय, आर.टी.ओ कार्यालय मध्ये व तसेच सरकारी योजनेचा लाभ मिळणे व अत्यावश्यक कामा साठी वारस प्रमाणपत्र लागत असल्यामुळे सदरील अर्जास कारण घडले आहे. त्या अर्थी सर्व जनतेस कळीविण्यात येते की, सदरील अर्जास कुणाचाही कुठल्याही प्रकारचा उजर आक्षेप असल्यास त्यांनी सदर जाहीर प्रगटण प्रसिद्धी पासून ३० दिवसाच्या आत मा. न्यायालयात लेखी स्वरूपाचा अथवा आपल्या वकील मार्फत आक्षेप नोंदवावा मुदतीत कुणाचा उजर आक्षेप प्राप्त न झाल्यास अर्जदार यांना कायदेशीर वारस प्रमाणपत्र देण्या बाबतचे आदेश प्रदान केले जाईल.

दिः–१८/१०/२०२४

आदेशावरून

लिपिक | सहाय्यक अधिक्षक

दिवाणीव व फौजदारी न्यायालय कन्नड

सोलापूर तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा
www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

## भाजपा तालुकाध्यक्ष पदी गोविंद थिटे यांची निवड



जिंतूर : तालुक्यातील वरुड येथील रहिवासी असलेले सामाजिक कार्यकर्ते तथा युवक नेतृत्व असलेले गोविंद भाऊ थिटे पाटील यांची भाजपा तालुका अध्यक्षपदी निवड झाल्याबद्दल त्यांचा सत्कार करण्याचे आयोजन करण्यात आले होते यावेळी त्यांचा आज आमदार मेघनाताई बोर्डीकर साकोरे यांच्या निवासस्थानी सत्कार करण्यात आला यावेळी व्यापारी तथा कृषी उत्पन्न बाजार समितीचे संचालक रमनभाऊ तोष्णीवाल तसेच भाजपचे युवा कार्यकर्ते अशोकराव बुधवंत पाटील आणि सुनीलभाऊ भोंबे पाटील हे उपस्थित होते.

## जिल्हाधिकारी आणि पोलीस अधीक्षकांकडून कर्जतच्या स्ट्रॉंगरूमची पाहणी



कर्जत दि.२३ : जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी सिद्धाराम सालीमठ आणि जिल्हा पोलीस अधीक्षक राकेश ओला यांनी कर्जत येथील दादा पाटील महाविद्यालयात स्थापन करण्यात आलेल्या स्ट्राँगरूमला भेट देऊन तेथील सुरक्षाव्यवस्थेचा आढावा घेतला.

मतदान अधिकारी व कर्मचारी यांच्या प्रशिक्षणाची व्यवस्था, ईव्हीएम यंत्राचे वाटप व मतमोजणीच्या दिवशी स्ट्राँगरूममधील जागेचे नियोजन याविषयी जिल्हाधिकाऱ्यांनी सविस्तर माहिती घेतली. प्रशासनाच्या सर्व विभागांच्या निवडणूकविषयक तयारीचा आढावा व कामकाजाची पाहणी करून निवडणूक आचारसंहितेच्यादृष्टीने त्यांनी सूचना दिल्या. सूचनांची काटेकोरपणे अंमलबजावणी करण्याचे निर्देशही यावेळी जिल्हाधिकाऱ्यांनी दिले. पोलीस अधीक्षक श्री.ओला यांनी ईव्हीएम सुरक्षिततेच्यादृष्टीने स्ट्राँगरूमचे ठिकाण व परिसराची पाहणी केली.

याप्रसंगी कर्जत-जामखेड विधानसभा मतदारसंघाचे निवडणूक निर्णय अधिकारी नितीन पाटील, कर्जतचे तहसीलदार गुरू बिराजदार, जामखेडचे तहसीलदार गणेश माळी, कर्जतचे पोलीस निरीक्षक मारुती मुळीक, जामखेडचे पोलीस निरीक्षक महेश पाटील, खर्डाचे सहाय्यक पोलीस निरीक्षक विजय झंजाड, मिरजगावचे सहाय्यक पोलीस निरीक्षक प्रकाश पाटील, कर्जत नगरपंचायत मुख्याधिकारी अक्षय जायभाये, जामखेड नगरपरिषद मुख्याधिकारी अजय साळवे, नायब तहसीलदार प्रीतम ठोंबरे, निवडणुक नायब तहसीलदार योगेश जाधव आदी उपस्थित होते.

# शिर्डी, कोपरगाव मतदारसंघातील खर्च विषयक कामकाजाचा आढावा

शिर्डी, दि.२३ :-* भारत निवडणूक आयोगामार्फत अकोले, संगमनेर, शिर्डी व कोपरगाव विधानसभा मतदारसंघासाठी खर्च निरीक्षक म्हणून नियुक्ती झालेले देबशीष बिस्वास (आय.आर.एस) यांनी शिर्डी व कोपरगाव या विधानसभा मतदारसंघातील निवडणूक खर्च विषयक कामकाजाचा आढावा घेतला.



शिर्डी येथील भेटीप्रसंगी निवडणूक निर्णय अधिकारी माणिक आहेर, सहायक निवडणूक निर्णय अधिकारी अमोल मोरे, गटविकास अधिकारी तथा नोडल अधिकारी जालिंदर पठारे तसेच खर्च पथकातील अधिकारी उपस्थित होते.

कोपरगाव येथील भेटीप्रसंगी निवडणूक निर्णय अधिकारी सायली सोळंके, सहायक निवडणूक निर्णय अधिकारी महेश सावंत, सहायक खर्च निरीक्षक श्री.सरकार व तहसील कार्यालयातील खर्च नियंत्रण पथकातील अधिकारी उपस्थित होते.

खर्च निरीक्षकांनी यावेळी सर्व नोडल अधिकारी व खर्च व्यवस्थापनासंदर्भात उपस्थित इतर अधिकारी व कर्मचाऱ्यांना निवडणूक खर्च व्यवस्थापन वेळीच व योग्यप्रकारे करण्याच्या सूचना दिल्या. तसेच विधानसभा क्षेत्रनिहाय संवेदनशील भागाविषयी माहिती जाणून घेतली.

निवडणूकीत उमेदवारी दाखल करणाऱ्या सर्व उमेदवारांच्या खर्चावर नोडल अधिकारी तसेच सहाय्यक खर्च निरीक्षकांनी लक्ष ठेवून दैनंदिन अहवाल विहीत वेळेत सादर करावेत. या निवडणुकीसाठी उमेदवारांच्या खर्चाचे मूल्यमापन करण्यासाठी दर निश्चित करण्यात आले असून त्यानुसार उमेदवारांचा खर्च निश्चित करावा, अशा सूचनाही त्यांनी यावेळी दिल्या.

खर्च निरीक्षकांचा मुक्काम संगमनेर येथे

देबशीष बिस्वास यांचा मुक्काम शासकीय विश्रामगृह संगमनेर येथे असणार आहे. त्यांच्याशी ८९०२१९९९०० या मोबाईल क्रमांकावर संपर्क साधता येणार आहे. त्यांचे संपर्क अधिकारी म्हणून अपर प्रवरा सब डिव्हीजनचे सहायक अभियंता प्रमोद माने यांची नियुक्ती करण्यात आली असून त्यांचा भ्रमणध्वनी क्रमांक ८६५७५७७७७७, ८९७५२२४८१९ असा आहे. असे निवडणूक शाखेमार्फत कळविण्यात आले आहे.

# आ.संग्राम जगताप गुरुवारी भरणार उमेदवारी अर्ज

### अरुण जगताप यांची माहिती

नगर - विधानसभा निवडणुकीत राजकीय डावपेच टाकण्यासाठी माजी आमदार अरुण जगताप आता मुलासाठी विधानसभा निवडणुकीच्या प्रचाराच्या आखाड्यात उतरले आहेत. आ.संग्राम जगताप यांच्या प्रचारार्थ माजी आमदार अरुण जगताप मतदारांच्या वैयक्तिक गाठीभेटींवर भर देत आहेत. त्यांनी मार्केटयार्ड मधील व्यापारी वर्गाशी संवाद साधून आ.संग्राम जगताप यांनी विकास कामांचा माध्यमातून शहराचा केलेला विकास व झालेला कायापालट याची माहिती दिली. तसेच उद्या गुरुवार दि.२४ ऑक्टोबरला राष्ट्रवादी काँग्रेस अजितदादा पवार गटाचे उमेदवार संग्राम जगताप विधानसभा निवडणुकीसाठी आपला उमेदवारी अर्ज भरणार आहे, अशी माहितीही यावेळी अरुण जगताप यांनी दिली.




[illegible]

यावेळी अरुण जगताप म्हणाले, गेल्या १० वर्षात आमदार संग्राम जगताप यांनी प्रामाणिकपणे व निष्ठेने आपले कर्तव्य बजावत केलेल्या विकास कामांमुळे शहराच्या प्रलंबित समस्या सुटल्या आहेत. उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या सहकार्याने व आ.संग्राम जगताप यांनी राज्य व केंद्र सरकार कडे केलेल्या सततच्या पाठपुराव्यामुळे शहराच्या इतिहासात प्रथमच एवढा मोठा कोट्यावधी रुपयांचा विकास निधी प्राप्त झाला असून त्याद्वारे शहरात मोठी विकासकामे सुरु आहेत. व्यापारी वर्ग, बाजारपेठ्यांचे अनेक प्रलंबित मागण्या व समस्या आ.जगताप यांनी सोडवल्या आहेत. शहरातील नागरिकांची मुलभूत प्रश्न मार्गी लागल्याने जनमताचा कौल हा जगतापांच्या बाजूने आहे. जनमत बरोबर असल्याने निवडणूक जिंकल्याशिवाय राहणार नाही.

यावेळी सुभाष पोखरणा, राजेंद्र बोथरा, संतोष बोरा, गोपाल मणियार, राजेंद्र चोपडा, अविनाश घुले, संजय चोपडा, प्रकाश भागानगरे, ज्ञानेश्वर रासकर, संजय ताथेड, राजू शेटीया, संजय लोढा, राजेंद्र बोथरा, तलकसी सावला, हिरालाल पोखर्णा, राजू चंगेडिया, रमेश सोनीमंडलेचा, राजेंद्र भंडारी, डॉ. विजय भंडारी, विपुल शहा, रंगनाथ खेंडगे आदींसह सर्व व्यापारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# उत्तम कथेतून उर्जा प्राप्त होते : स्वामी गोविंददेवगिरीजी महाराज





सेलू : कथा ही सांगायची नसते. या हृदयातून ती त्या हृदयात पोहोचवायची असते. छोट्या पडद्यावर व प्रत्यक्ष कथा ऐकणे यात फरक आहे. संपूर्ण ऊर्जा मिळवायची असेल तर कथाही कथा मंडपात ऐकल्याशिवाय संपूर्ण ऊर्जा मिळू शकत नाही. कारण उत्तम कथेतून ऊर्जा प्राप्त होत असल्याचे प्रतिपादन स्वामी गोविंददेव गिरीजी महाराज यांनी केले आहे. बुधवारी, २३ ऑक्टोबर रोजी महाआरती व महाप्रसादाने नऊ दिवसांच्या रामकथेची उत्साहात सांगता झाली.

नूतन विद्यालयाच्या हनुमानगढ परिसरात श्रीराम जन्मभूमी तीर्थक्षेत्र न्यासाचे कोषाध्यक्ष राष्ट्रसंत गोविंददेव गिरीजी महाराजांच्या अमृतवाणीतून १५ ते २३ ऑक्टोबर दरम्यान कथेचे आयोजन करण्यात आले होते. नवव्या दिवशी व्यासपीठावर श्रीसालासरजी (भक्त हनुमान) प्रतिकृती उभारण्यात आली होता. स्वामीजी म्हणाले की, उत्तम कथा हा एक प्रकारचा शक्तिपात असतो. त्यातून प्राप्त होणारी ऊर्जा मनुष्याला अनेक वर्षे पुरते. ती कथा भावूकतेच्या शिखरावरती पोहोचते. ऐकणारा श्रोता व बोलणारा वक्ता त्या भाव रसात बुडून जातात. बोलायचे देखील विसरतात. गोड भाषा माउलींनीच बोलावी. जगाच्या पाठीवर माऊली इतकी गोड भाषा कोणाची नाही. त्यांच्या भाषेने नेत्र वाहू लागतात. शब्द सुचत नाहीत. आणि अशीच कथाही सर्वोत्तम कथा असते, असे स्वामी गोविंददेवगिरीजी महाराज यांनी यावेळी बोलताना स्पष्ट केले.

गुरूकृपेमुळे कार्य सिद्धीस : जयप्रकाश बिहाणी

राष्ट्रसंत स्वामी गोविंददेवगिरीजी महाराज यांच्या श्रीराम कथेमुळे संपूर्ण शहर राममय झाले होते. गुरूकृपादृष्टीमुळे हे कार्य सिद्धीस गेले. अतिशय व्यस्ततेतून स्वामीजींनी सेलू शहरावरील प्रेमाखातर नऊ दिवसांच्या कथेसाठी उपस्थितीत राहून आपल्याला अमृतमय रसाची अनुभूती दिली. त्यामुळे मी कायम त्यांच्या ऋणात राहिल. शहरातील नागरिकांनी देखील मोठ्या संख्येने उपस्थित राहून कथा श्रवणाचा लाभ घेतला. विविध समित्या, समस्त सेलूकर, मित्र, सोयरे यांचे सहकार्य लाभले. सर्व सेलूवासीच या रामकथेचे संयोजक होते, असा सर्वांनी सक्रीय सहभाग नोंदवून कार्यक्रम यशस्वीरित्या पार पाडला. यामुळे बिहाणी परिवार धन्य झाला आहे, अशा शब्दांत आयोजक जयप्रकाश विजयकुमार बिहाणी यांनी सर्वांचेच ऋण व्यक्त केले.

## सुभाषचंद बेदमुथा यांचे निधन



बीड : चौसाळा वर्धमान जैन श्रावक संघाचे अध्यक्ष सुभाषचंद खेमचंद बेदमुथा, वय ७० ( घारगाववाला ) यांचे बुधवार दि. २३ ऑक्टोबर रोजी दुःखद निधन झाले. अत्यंत धार्मिक व मनमिळावू स्वभाव असलेल्या सुभाषचंदजी यांचे विविध सामाजिक कार्य तसेच गोसेवेच्या कार्यात नेहमीच योगदान असे. त्यांच्या पश्चात पत्नी, एक मुलगा - सुन, तीन मुली - जावई, नातवंडे असा परिवार आहे.

# विधानसभा निवडणुकीत राजकीय जाहिरातींचे पूर्वप्रमाणिकरण आवश्यक : सिद्धाराम सालीमठ

अहिल्यानगर दि.२३- विधानसभा निवडणुकीत इलेक्ट्रॉनिक माध्यमांवरून प्रदर्शित किंवा प्रसारित करण्यात येणाऱ्या जाहिरातींचे पूर्वप्रमाणीकरण जिल्हास्तरीय माध्यम प्रमाणिकरण आणि संनियंत्रण समितीकडून करून घेणे बंधनकारक आहे. विविध राजकीय पक्षांचे उमेदवार, प्रतिनिधी यांनी इलेक्ट्रॉनिक माध्यमांवर जाहिरात देण्यापूर्वी पूर्वप्रमाणिरण करून घ्यावे, असे आवाहन जिल्हाधिकारी सिद्धाराम सालीमठ यांनी केले आहे.

सर्वोच्च न्यायालयाने दूरचित्रवाणी आणि केबल वाहिनीवरील राजकीय जाहिरातींबाबत दिलेल्या निर्णयात अशा जाहिरातींचे पूर्वप्रमाणीकरण करण्यात यावे असे नमूद केले आहे, त्यासाठी समिती स्थापन करण्याचेही निर्देश दिले आहेत. सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयास अनुसरून भारत निवडणूक आयोगाच्या निर्देशानुसार माध्यम प्रमाणीकरण आणि संनियंत्रण समितीची (एमसीएमसी) स्थापना करण्यात आली आहे.

दृकश्राव्य माध्यमाद्वारे टेलिकास्ट/ब्रॉडकास्ट करण्यापूर्वी, दूरचित्रवाणी वाहिन्या, केबल नेटवर्क, केबल वृत्तवाहिन्या, सिनेमा हॉल, रेडिओ, सार्वजनिक तसेच खासगी एफएम वाहिन्या, सार्वजनिक ठिकाणी दाखविण्याच्या दृक-श्राव्य जाहिराती, ई-वृत्तपत्रामध्ये प्रसिद्ध करावयाच्या जाहिराती, बल्क एसएमएस, रेकॉर्ड केलेले व्हाईस मेसेजेस, सोशल मीडिया, इंटरनेट संकेतस्थळे यावर दर्शविण्याच्या जाहिराती तसेच मतदानाच्या आणि त्याच्या एक दिवस आधी वृत्तपत्रात प्रसिद्ध करावयाच्या जाहिराती यांना समितीकडून पूर्वमान्यता घेणे बंधनकारक आहे.

प्रत्येक नोंदणीकृत पक्षाचा उमदेवार/पक्षाने जाहिरात प्रसारीत होण्याच्या ३ दिवस अगोदर आणि अनोंदणीकृत राजकीय पक्ष किंवा इतर व्यक्तींनी किमान ७ दिवसापूर्वी जाहिरातीची इलेक्ट्रॉनिक निर्मिती आणि स्वाक्षरी केलेल्या जाहिरात संहितेसह समितीकडे विहित नमुन्यात दोन प्रतीत अर्ज सादर करावा.

मुद्रीत माध्यमाद्वारे मतदान आणि त्यापूर्वीच्या दिवशी प्रकाशित करावयाच्या जाहिरातींचे प्रमाणीकरणही आवश्यक आहे. अशा जाहिरातींबाबतचे अर्ज प्रकाशनाच्या दोन दिवस पूर्वी समितीकडे सादर करणे आवश्यक आहे. वैयक्तिक किंवा पक्षाची संकेतस्थळे/सोशल मीडिया वेबसाइट्सवरील 'ब्लॉग्स/सेल्फ अकाउंट्स' वर पोस्ट/अपलोड केले जाणारा मजकूर /टिप्पण्या/फोटो/व्हिडिओच्या स्वरूपात कोणताही राजकीय मजकूर राजकीय जाहिराती मानला जाणार नाही आणि त्यामुळे त्यांना पूर्व प्रमाणिकरणाची आवश्यकता नाही. तथापि असा मजकूर जाहिरात म्हणून दिल्यास (पेड बुस्टींग) त्यास पूर्वप्रमाणिकरण आवश्यक आहे.

सर्व राजकीय पक्षांचे प्रतिनिधी, उमेदवार यांनी निवडणूक विषयक नियमांचे पालन करून निवडणूक प्रशासनास सहकार्य करावे, असे आवाहनही करण्यात आले आहे.

## जाहीर प्रगटन

**मा. श्रीमती व्ही. एन. काटकर मॅडम सह-दिवाणी न्यायाधिश कनिष्ठ स्तर कन्नड यांचे न्यायालयातुन**

दिवाणी किरकोळ अर्ज क्रमांक : २९९/२०२४

पुढील तारीख : २९/११/२०२४

अर्जदार : १- ज्ञानेश्वर पिता बारकु घुगे, वय ४९ वर्षे, धंदा शेती, रा. मेहेगांव, ता. कन्नड, जिल्हा छ. संभाजीनगर औरंगाबाद वय ४२ वर्षे, २- बाळु पिता बारकु घुगे, धंदा शेती, रा. मेहेगांव, ता. कन्नड, जिल्हा छ. संभाजीनगर औरंगाबाद ३- अंकुश पिता बारकु घुगे, वय ३८ वर्षे, धंदा शेती, रा. मेहेगांव, ता. कन्नड, जिल्हा छ. संभाजीनगर औरंगाबाद ४- लता भ्र. श्रीधर नागरे, वय ३७ वर्षे, धंदा घरकाम, रा. फुलंब्री, ता. फुलंब्री, जिल्हा छ. संभाजीनगर औरंगाबाद ५- सुनिता भ्र. भानुदास सगळे वय ३६ वर्षे, .. धंदा घरकाम, रा. रोहिणी, ता. चाळीसगांव, जिल्हा जळगांव.

विरुध्द

गैरअर्जदार - महाराष्ट्र शासन, मार्फत जिल्हाधिकारी संभाजीनगर, जि. संभाजीनगर

अर्ज : वारसाचे प्रमाण पत्र मिळणे बाबत. Bombay Regulation Act

ज्या अर्थी अर्जदार यांचे वकील ॲड. डी.डी. जोशी यांच्या मार्फत या न्यायालयात अर्जदार हे वरील ठिकाणचे रहीवाशी असून अर्जदार यांनी सदरील अर्ज वारसाचे प्रमाण पत्र मिळावे म्हणून विदयमान न्यायालयात दाखल केले आहे. अर्जदार क्रमांक १ ते ५ यांची आई नामे बायजाबाई बारकु घुगे ही दिनांक १४.०२.२०२२ रोजी मौजे मेहेगांव ता. कन्नड, जिल्हा छ. संभाजीनगर औरंगाबाद, येथे मयत झालेले आहे, तसेच अर्जदार क्रं. १ ते ५ चे वडील नामे बारकु नामदेव घुगे हे दिनांक २७.३.२०२४ रोजी मौजे मेहेगांव ता. कन्नड, जि.छ. संभाजीनगर येथे मयत झालेले आहे सोबत ग्राम पंचायत मेहेगांव यांचे कडील दोन्ही मृत्यु प्रमाण पत्र दाखल केले आहे. मयताच्या नावे भविष्यात शासकीय निमशासकीय मिळणारे फायदे तसेच मयताच्या नावाने असलेल्या नोंदी वारस कायदया प्रमाणे संबंधीत रेकॉर्डला नोंद घेणेसाठी वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. सबब सदरील अर्ज करणेस कारण दिनांक १०.१०.२०२४ रोजी घडले आहे. अर्जदार हे मयतांचे कायदेशीर वारस असल्याने अर्जदारां शिवाय मयतांना कोणीही ईतर वारस नाही. तसेच 'अर्जदार यांना सदरील वारसाचे प्रमाण पत्र हे शासकीय व निमशासकीय योजनेसाठी तसेच महसुल दप्तरी नोंद करण्यासाठी आवश्यक असल्याने वारस प्रमाण पत्राची अर्जदार हे मागणी करीत आहे. सबब वरील प्रमाणे अर्जदार यांनी या न्यायालयात मागणी केली आहे.

त्या अर्थी सदरहू जाहीर प्रगटना व्दारे सर्व जनतेस कळविण्यात येत आहे की, अर्जदार हे मयताचे कायदेशीर वारस असल्या बाबत त्यांनी प्रस्तुतचा अर्ज या न्यायालयात वारस प्रमाण पत्र मिळणेसाठी अर्ज केलेला आहे, व त्या बाबत ईतर कुठल्याही वारसाचा उजर आक्षेप नाही या साठी प्रमाण पत्र देणे आहे. सबब या जाहीर प्रगटना व्दारे वरील वारस प्रमाण पत्र देण्या पुर्वी ईतर कुणासही आक्षेप / उजर असल्यास सदर जाहीर प्रगटन वर्तमान पत्रात प्रकाशित झाल्याच्या तारखेपासून ३० दिवसाच्या आत या न्यायालयात व्यक्तीगत किंवा रितसर वकीला मार्फत हजर व्हावे तसे न केल्यास मुदतीत आक्षेप प्राप्त न झाल्यास अर्जदार यांना मयतांचे कायदेशीर वारस असल्या बाबतचे वारसा हक्क प्रमाण पत्र प्रदान करण्यात येईल. सबब आज दिनांक २२.१०.२०२४ रोजी माझे सहीनिशी व मा. कोर्टाचे शिक्यानिशी दिले.

दिनांक २२.१०.२०२४

आदेशावरून

लिपीक — सहाय्यक अधिक्षक

दिवाणी व फौजदारी न्यायालय कनिष्ठ स्तर कन्नड

## जाहीर प्रगटन

**मा.दिवाणी न्यायाधिश न्यायालय क.स्तर गंगापुर, ता. गंगापुर जि. औरंगाबाद**

Civil Misc. Application No. 470/2024 (2nd Jt.Court)

महावीर माणिकचंद पाटणी व इतर

विरूध्द

निरंक

प्रकरण : वारस प्रमाणपत्र मिळणे बाबत.

ज्याअर्थी अर्जदार नं. १ ते ४ यांची जनकमाता राजुलबाई माणिकचंद पाटणी हि दि.२५/०९/२०१७ रोजी मौजे लासुर स्टेशन, ता. गंगापुर येथे मृत्यु पावली असुन अर्जदार नं. १ ते ४ यांचे वडील नामे माणिकचंद भिकचंद पाटणी हे दि.१०/०७/२०२२ रोजी मौजे लासुर स्टेशन, ता. गंगापुर येथे मृत्यु पावले आहे. अर्जदार नं. १. महावीर माणिकचंद पाटणी, २. भरतकुमार माणिकचंद पाटणी, ३. पंकजकुमार माणिकचंद पाटणी, वरील सर्व रा.लासुर स्टेशन, ता. गंगापुर जि. औरंगाबाद ४. सौ. सुवर्णा भ्र. संतोष बडजाते, रा. शंभु नगर, गारखेडा परिसर, औरंगाबाद यांनी मयताचे वारस प्रमाणपत्र मिळणे कामी ॲड. श्री.पीबी. जोशी, गंगापुर यांचे मार्फत या न्यायालयात अर्ज सादर केला आहे.

त्याअर्थी अर्जदार यांना या न्यायालया तर्फे वारस प्रमाणपत्र देणे कामी कोणाचाही कोणत्याही प्रकारचा आक्षेप असल्यास जाहीर प्रगटन प्रसिध्द झाल्याचे तारखेपासून ३० दिवसाचे आत या न्यायालयात लेखी आक्षेप स्वतः अथवा आपल्या विधीज्ञा मार्फत नोंदवावा. मुदतीचे आत आक्षेप प्राप्त न झाल्यास पुढील कायदेशीर कार्यवाही नियमाप्रमाणे करून अर्जदारांना वारस प्रमाणपत्र देण्यात येईलं.

सदरचे जाहीर प्रगटन माझ्या सहीनिशी व या न्यायालयाच्या शिक्यानिशी प्रसिध्दीस देण्यात येत आहे.

दि.२१/१०/२०२४

आदेशावरून

सहाय्यक अधिक्षक

दिवाणी न्यायालय क. स्तर गंगापुर

## जाहीर प्रगटन

**मा. दिवाणी न्यायाधिश साहेब, क. स्तर न्यायालय गंगापुर जि. औरंगाबाद**

सिव्हिल एम.ए. क्र. ४३०/२०२४

अर्जदार : १) नंदु कारभारी पोटफाडे, वय ४९ वर्षे, धंदा शेती रा. ईटावा ता. गंगापुर जि. औरंगाबाद २) रविंद कारभारी पोटफाडे, वय ४३ वर्षे, धंदा शेती रा. ईटावा ता. गंगापुर जि. औरंगाबाद

विरुध्द

गैरअर्जदार : निरंक

प्रकरण : बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट १८२७ कलम २ प्रमाणे हेअरशिप प्रमाणपत्र मिळणे बाबत.

उपरोक्त विषयी सर्व जनतेस कळविण्यात येते की, या न्यायालयात अर्जदार यांनी त्यांचे विधिज्ञ ॲड. श्री. एस.आर. शिराळे यांच्या मार्फत अर्ज सादर केला आहे की अर्जदार क्र.१ व २ हे आपसांत नात्याने सख्खे भाऊ असुन ते वरील ठिकाणी कायमस्वरुपी राहतात. अर्जदार क्र.१ व २ यांचे वडील नामे कारभारी गजाबा पोटफाडे हे मौजे ईटावा ता. गंगापुर जि. औरंगाबाद येथील रहिवाशी होते ते दिनांक २३/०७/२०२४ रोजी मौजे ईटावा ता. गंगापुर येथे मयत झालेले आहे तसेच अर्जदार क्र.१ व २ यांची आई नामे तुळसाबाई कारभारी पोटफाडे ह्या दिनांक १६/११/२०२३ रोजी मयत झालेल्या आहे. मयत कारभारी गजाबा पोटफाडे यांना अर्जदार क्र.१ व २ हे कायदेशीर वारसदार असुन त्यांच्या व्यतिरीक्त मयतास इतर कोणीही कायदेशीर वारसदार नसल्याचे सांगुन अर्जदार यांनी या न्यायालयात वारसप्रमाणपत्र मिळणे कामी अर्ज सादर केलेला आहे.

त्याअर्थी, तमाम जनतेस याद्वारे कळविण्यात येते की, अर्जदारांच्या प्रस्तूत अर्जातील मागणीस कोणाचा काही आक्षेप-उजर असेल तर संबंधीतांनी त्यांचा असलेला आक्षेप-उजर या न्यायालयात व्यक्तीशः अथवा विधीज्ञामार्फत हे प्रगटन प्रसिध्द झाले तारखेपासून ३० दिवसांच्या आत नोंदवावा मुदतीनंतरचा आक्षेप - उजर लक्षात घेतला जाणार नाही व हे न्यायालय अर्जदारांच्या हक्कात त्यांनी मागणी केले प्रमाणे वारस प्रमाणपत्र जारी करील. करीता हे प्रगटन माझे सही व शिक्क्यानी आज दिनांक २२/१०/२०२४ रोजी दिले.

कनिष्ठ लिपीक — सहाय्यक अधिक्षक,

दिवाणी न्यायालय गंगापुर

## जाहीर प्रगटन

**मा. दिवाणी न्यायाधिश न्यायालय क. स्तर गंगापुर, ता. गंगापुर जि. औरंगाबाद**

Civil Misc. Application No. 465/2024

गयाबाई पोपट धोत्रे

विरूध्द

निरंक

प्रकरण : वारस प्रमाणपत्र मिळणे बाबत.

ज्याअर्थी मयत पोपट मारोती धोत्रे हे दि.०४/११/१९८८ रोजी मौजे काटेपिंपळगाव, ता. गंगापुर जि. औरंगाबाद येथे मृत्यु पावले असुन अर्जदार गयाबाई पोपट धोत्रे, रा.शेजुळ गल्ली, लासुरगाव, ता. वैजापुर जि.औरंगाबाद यांनी मयताचे वारस प्रमाणपत्र मिळणे कामी ॲड.श्री.पीबी. जोशी, गंगापुर यांचे मार्फत या न्यायालयात अर्ज सादर केला आहे.

त्याअर्थी अर्जदार यांना या न्यायालया तर्फे वारस प्रमाणपत्र देणे कामी कोणाचाही कोणत्याही प्रकारचा आक्षेप असल्यास जाहीर प्रगटन प्रसिध्द झाल्याचे तारखेपासून ३० दिवसाचे आत या न्यायालयात लेखी आक्षेप स्वतः अथवा आपल्या विधीज्ञा मार्फत नोंदवावा. मुदतीचे आत आक्षेप प्राप्त न झाल्यास पुढील कायदेशीर कार्यवाही नियमाप्रमाणे करून अर्जदारांना वारस प्रमाणपत्र देण्यात येईल.

सदरचे जाहीर प्रगटन माझ्या सहीनिशी व या न्यायालयाच्या शिक्यानिशी प्रसिध्दीस देण्यात येत आहे.

दि.२१/१०/२०२४

आदेशावरून

सहाय्यक अधिक्षक

दिवाणी न्यायालय क.स्तर गंगापुर

## जाहीर प्रगटन

**मा. दिवाणी न्यायाधिश साहेब, क. स्तर न्यायालय गंगापूर जि. औरंगाबाद**

सिव्हील एम.ए.क. ४५४/२०२४

अर्जदार : १) जुलेखा अजीज पटेल, वय. ४८ वर्षे, धंदा, शेती, रा. पूरी पो. सोलेगांव, ता. गंगापूर जि. औरंगाबाद २) नईम अजीज शेख, वय. ३५ वर्षे, धंदा, नौकरी, रा. पूरी पो. सोलेगांव, ता. गंगापूर जि. औरंगाबाद ३) सुरैय्या अजीज शेख, वय. ३२ वर्षे, धंदा, शेती, रा. पूरी पो. सोलेगांव, ता. गंगापूर जि. औरंगाबाद ४) हारून अजीज शेख, वय. ३० वर्षे, धंदा, शेती, रा. पूरी पो. सोलेगांव, ता. गंगापूर जि. औरंगाबाद

विरूध्द

गैरअर्जदार - निरंक

प्रकरण : वारस प्रमाणपत्र (हेअरशिप प्रमाणपत्र) मिळणे बाबत.

याअर्थी, वरील अर्जदारांनी ॲड. एस. के. लांडे यांच्या मार्फत या न्यायालयात वारस प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज दाखल केला आहे की, अर्जदार क. १ ही अर्जदार क. २ ते ४ यांची आई असून अर्जदार क. १ चे पती व अर्जदार क. २ ते ४ यांचे वडील नामे शेख अजीज बना हे दि. ३०/११/२०१८ रोजी मौजे पुरी ता. गंगापूर जि. औरंगाबाद येथे मयत झाले आहे. अर्जदारांव्यतिरिक्त मयतास इतर कोणीही कायदेशीर वारसदार नाहीत. अर्जदार क. १ ते ४ हे एकमेव मयताचे कायदेशीर वारसदार आहे. मयत शेख अजीज बना यांना अर्जदार क. १ ते ४ यांच्या व्यतिरिक्त इतर कोणीही कायदेशीर वारसदार नसुन अर्जदारांना शाासकीय व निमशासकीय व इतर कार्यालयामध्ये अर्जदारांना वारस प्रमाणपत्राची मागणी केल्यामुळे वारस प्रमाणपत्र अर्जदारांच्या हक्कात जारी करण्यात यावे.

त्याअर्थी या जाहीर प्रगटनाव्दारे तमाम जनतेस कळविण्यात येते की, अर्जदारांच्या हक्कात त्यांनी मागणी केल्याप्रमाणे वारस प्रमाणपत्र जारी करण्यास कोणाचाही कोणत्याही प्रकाराचा आक्षेप, उजर असल्यास त्यांनी हे जाहीर प्रगटन प्रसिध्द झाल्यपासून ३० दिवसाच्या आत या न्यायालयात स्वतः किंवा वकिला मार्फत आक्षेप उजर नोंदवावा. मुदतीत आक्षेप / उजर न आल्यास अर्जदारांच्या नावे वारस प्रमाणपत्र देण्यात येईल याची नोंद घ्यावी. करिता हे जाहीर प्रगटन.

दिनांक : २१/१०/२०२४

आदेशावरून

सहाय्यक अधिक्षक

दिवाणी व फौजदारी न्यायालय, गंगापूर

संपादकीय

तरुण भारत

www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

## अग्रलेख...

# सहकार्य, स्पर्धा आणि सावधगिरी

लडाख प्रांतातील प्रत्यक्ष नियंत्रण रेषेच्या परिसरात संयुक्त लष्करी गस्ती सुरू करण्याबाबत भारत आणि चीन यांच्यात करार झाल्यासंबंधीची परराष्ट्र मंत्रालयाची घोषणा दोन्ही देशांमधील तणाव कमी करण्याच्या दृष्टीने टाकलेले एक महत्त्वाचे पाऊल आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या मुत्सद्देगिरीचे हे यश असून त्यातून सीमेवर शांतता प्रस्थापित करण्याच्या प्रयत्नांना बळ मिळणार आहे. दोन्हीकडचे जवान मागे हटण्याचा मार्ग त्यामुळे मोकळा झालेला आहे. मात्र, भारताने पूर्वेतिहास बघता यासंदर्भात भविष्यातही सावध राहायलाच हवे. भारत-चीन यांच्यातील सांस्कृतिक संबंध हजारो वर्षे जुने असले, तरी या दोन्ही शेजारी राष्ट्रांचे संबंध गुंतागुंतीचे व तणावपूर्ण राहिले आहेत. हिमालय प्रदेशातील दीर्घकाळ चाललेले सीमा वाद हे त्यातील महत्त्वाचे मुद्दे. २०२० मध्ये झालेल्या हिंसक संघर्षामुळे दोन शेजारी देशांमधील संबंधांमध्ये तणाव आणखी वाढला होता. तथापि, प्रत्यक्ष नियंत्रण रेषेवर संयुक्त लष्करी गस्त करण्यासाठी भारत आणि चीन यांच्यातील कराराच्या घोषणेने हा संघर्ष कमी करण्यासाठी आणि सीमा प्रदेशात पुन्हा स्थिरता प्रस्थापित करण्यासाठी आशेचा किरण दाखविलेला आहे, एवढाच या घटनेचा सध्याचा अर्थ आहे. भारत-चीन संबंधात सहकार्य आणि स्पर्धा आहेच. भारताच्या बाजूने त्यात सावधगिरीही आहे आणि चीनच्या बाजूने विस्तारवादी भूमिका उफाळून येणे आता नवलाईचे नाही. चीन हा खोडकर देश आहे. दोन देशांतील सीमा विवाद ही सततची समस्या आहे ती त्यामुळेच. चीनने समंजसपणा दाखविला असता तर इतकी वर्षे हा विषय चिघळण्याची आवश्यकता भासली नसती. तसे न झाल्याने संघर्ष झाले, होत असतात. २०२० मध्ये गलवान खोऱ्यात दोन्ही सैन्यांमध्ये संघर्ष झाला तेव्हा सीमेवरील तणाव अचानक वाढला होता. त्यात दोन्हीकडच्या काही सैनिकांचे जीव गेले होते. हा संघर्ष या प्रदेशातील शांतता किती तकलादू आहे, हेच सांगणारा होता. चकमकीनंतर दोन्ही देशांनी सीमावर्ती भागात अतिरिक्त सैन्याची जमवाजमव केली होती. त्यामुळे हिमालयात जणू लष्करी छावण्या अवतरल्या होत्या.भारताच्या सीमेवरील चीनच्या कृती त्या देशाच्या व्यापक भू-राजकीय धोरणाच्या संदर्भात समजून घेतल्या पाहिजेत. राष्ट्राध्यक्ष शी जिनपिंग यांच्या नेतृत्वाखाली चीनने आक्रमक धोरण अवलंबिले आहे आणि विस्तारवादी वर्तन हे त्याचे वैशिष्ट्य आहे. दक्षिण चीन भागातील समुद्राचे लष्करीकरण असो, तैवानवरील दावे असो किंवा भारत-चीन सीमेवरील विवादित भागात पायाभूत सुविधा उभारण्याचे प्रयत्न असोत, चीनने सदैव आपले वर्चस्व प्रस्थापित करण्याचा प्रयत्न केला आहे. लडाखमध्ये सुरू असलेली गडबड आणि अरुणाचल प्रदेशावरील दाव्यांमुळे चीनचा विस्तारवाद अनेकदा चव्हाट्यावर येतो. चीनच्या विस्तारवादी हालचालींमुळे केवळ भारतासाठीच नाही तर व्यापक आंतरराष्ट्रीय समुदायासाठीही चिंतेचे वातावरण निर्माण झाले आहे. या गुंतागुंतीच्या पृष्ठभूमीवर, विवादित सीमेवर संयुक्त लष्करी गस्त घालण्यासाठी भारत आणि चीन यांच्यात झालेला करार हा महत्त्वपूर्ण टप्पा मानता येतो. २०२० मध्ये सुरू झालेल्या संघर्षावर तोडगा शोधण्याचा संभाव्य मार्ग म्हणून त्याचे स्वागत करण्यात आले. सीमेवर शांतता आणि स्थिरता पुनर्स्थापित करण्यात या कराराची मदत होऊ शकते. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी व्यावहारिकता आणि सावधगिरीच्या भूमिकेतून हे घडवून आणलेले दिसते. कारण, भारताला त्याच्या शक्तिशाली शेजाऱ्याशी शांततापूर्ण संबंध राखणे आवश्यक आहे, हे त्यांना कळते. शिवाय, लष्करी संघर्ष टाळण्याचा फायदाही त्यांना कळतो. मोदी सरकारने सातत्याने भारताच्या प्रादेशिक अखंडतेचे रक्षण करण्यावर भर दिला असून चीनसोबतचा कोणताही करार भारताच्या सार्वभौमत्वाशी तडजोड करणार नाही, याची काळजी घेतली जात आहे. भारताची रणनीती चीनला मुत्सद्देगिरीच्या माध्यमातून संवादात गुंतवून ठेवण्याची आहे. अलिकडच्या वर्षांत भारताने क्वाडसारख्या उपक्रमांद्वारे अमेरिका, जपान आणि ऑस्ट्रेलियाशी आपले संबंध दृढ केले आहेत. इंडो-पॅसिफिक प्रदेशात चीनच्या वाढत्या प्रभावाचा प्रतिकार करण्यासाठी या ऐक्याचे महत्त्व आहे. याच व्यापक धोरणाचा एक भाग म्हणून संयुक्त गस्तीवरील कराराकडे पाहिले जाऊ शकते. चीनला चर्चेत गुंतवून आणि सीमा विवाद सोडविण्याच्या दिशेने काम करण्याचा भारताचा विचार दिसतो. भारत चिनी दबावाला बळी पडणार नाही, याची खातरजमा करून लष्करी तणावाचे व्यवस्थापन करण्याचा प्रयत्न सुरू आहे. इतर देशांशी भारताने प्रस्थापित केलेले मुत्सद्दी संबंध चीनसोबतचा तणाव पुन्हा वाढला तर आपल्याला इतरांचा पाठिंबा मिळेल, याची खात्री देणारे आहेत.

संयुक्त लष्करी गस्तीवरील करार हे सकारात्मक पाऊल असले, तरी भारत-चीन संबंधांमध्ये इतर अनेक महत्त्वाची आव्हाने आहेत, हे विसरून चालणारे नाही. सीमा विवादाचा मूलभूत प्रश्न अद्याप सुटलेला नाही. विशेषतः अरुणाचल प्रदेशावर चीनचा दावा आणि अक्साई चीनसारख्या भागात चीनची सतत उपस्थिती हे या संघर्षाच्या कायमस्वरूपी निराकरणासाठी मोठे अडथळे आहेत. शिवाय, चीनच्या विस्तारवादी प्रवृत्तीमुळे भारताला केवळ सहकार्याच्या भूमिकेत नव्हे तर सावधगिरीच्याही भूमिकेत राहावे लागेल. दोन्ही देश राजनैतिक वाटाघाटी करीत असतानाही, चीनने विवादित भागात पायाभूत सुविधांची उभारणी सुरू ठेवली आहे आणि सीमेवर आपली लष्करी उपस्थिती आहे ती आहेच. चीनच्या दीर्घकालीन हेतूबद्दल आणि संघर्षाच्या शांततापूर्ण निराकरणासाठी असलेल्या त्याच्या वचनबद्धतेबद्दल शंका निर्माण करणारे हे घटक. त्यामुळे भारताने सतर्क राहून स्वतःची क्षमता वाढवीत राहणे आवश्यक आहे. मुत्सद्देगिरीतून काही काळ शांतता प्रस्थापित होण्याची शक्यता आहेच. पण, चीनचा स्वभाव लक्षात घेतला तर तो देश कधीही आक्रमक भूमिका घेऊ शकतो. भूतकाळात त्याच्या अशा वर्तनाचे अनेक पुरावे सापडतील. अशा आकस्मिकतेसाठी भारताने सदैव तयार असले पाहिजे. चीनशी संवाद सुरू ठेवतानाच, सीमेवरील संरक्षणासाठी पायाभूत सुविधांमध्ये गुंतवणूक करणे सुरू ठेवणे, मजबूत लष्करी व्यवस्था आणि तत्परता तसेच चीनच्या वर्तनाबद्दल शंका व्यक्त करणाऱ्या समविचारी देशांशी युती अशा बहुआयामी पद्धतीने भारताला मार्गक्रमण करावे लागणार आहे. भारत आणि चीनच्या संबंधांना जागतिक आयाम आहेत. चीन संयुक्त राष्ट्राच्या सुरक्षा परिषदेचा स्थायी सदस्य आहे. भारत आणि चीनचा भूभाग प्रचंड आहे. तरीही भारताचा जगात दबदबा आहे आणि आशियाच्या भविष्यात भारताचे महत्त्वाचे योगदान असेल. भारत आणि चीन दोन्ही महत्त्वाच्या व वाढत्या शक्ती आहेत. भारताचा दृष्टिकोन असे सांगणारा आहे की, चीनशी असलेले भारताचे संबंध हे भू-राजकीय संदर्भातूनच पाहिले पाहिजेत. ते त्यापासून विलग करून पाहता येत नाहीत. इंडो-पॅसिफिक प्रदेशात सहयोग निर्माण करण्याच्या प्रयत्नांत भारताचा चीनसोबतचा संबंध संतुलित स्वरुपाचा ठेवावा लागेल. राष्ट्रांच्या सार्वभौमत्वाचा आदर करण्याची भारताची सुरुवातीपासूनची भूमिका आहेच. ते केले तरच चीनवर थोडा तरी अंकुश राहील. संयुक्त लष्करी गस्तीवरील करार हे योग्य दिशेने टाकलेले पाऊल आहे. परंतु, तो दोन्ही देशांतील अनेकानेक प्रकारांच्या गुंतागुंतीच्या कोड्यातील एक छोटासा भाग होय. चीनला अशा कराराद्वारे भारताशी संबंध सामान्य करण्याची इच्छा झाली, हे थोडे नाही. मात्र, ते पुरेसेही नाही. भारताने कायमच सावध राहिले पाहिजे आणि मजबूत संरक्षण क्षमता आणि आंतरराष्ट्रीय भागीदारीच्या जाळ्याद्वारे आपल्या राजनैतिक प्रयत्नांना पाठिंबा मिळेल, याची खात्री करून घेतली पाहिजे. कमकुवत असलेल्यास याचना करावी लागते. बरोबरीच्या माणसाशी समोरासमोर चर्चा केली जाते. सुरक्षा परिषदेच्या सदस्यत्वाचा भाग सोडला तर भारत कोणत्याही दृष्टीने चीनपेक्षा कमी नाही. लोकशाही, स्वातंत्र्य, संशोधन, आयटीवरील भारताचे प्रभुत्व, आंतरराष्ट्रीय समुदायातील भारताचा सहभाग या सर्व आघाड्यांवर आपला देश मोठा आहे. त्यामुळेच त्याने चीनशी बरोबरीच्या नात्याने व्यवहार केला पाहिजे. मुत्सद्देगिरीला धोरणात्मक मुद्यांची व संरक्षण सज्जतेची जोड देण्याचा पंतप्रधान नरेंद्र मोदींचा दृष्टिकोन हा भारत-चीन संबंधातील गुंतागुंत हाताळण्याचा एक व्यावहारिक मार्ग आहे. पुढील वाटचाल आव्हानांनी भरलेली आहे. सहकार्य केले तरी स्पर्धा संपणार नाही आणि त्यामुळेच सावधगिरी बाळगावीच लागेल.

## चिंतन

**गुरुदत्त दिनकर वाकदेकर**

# राष्ट्रीय क्रीडा धोरण कधी तयार होणार?

२९ ऑगस्ट रोजी साजरा केला जाणारा राष्ट्रीय क्रीडा दिन, भारतासाठी तीन ऑलिम्पिक सुवर्णपदके जिंकणारे हॉकीचे महान खेळाडू ध्यानचंद यांचा वाढदिवस असतो. हा दिवस भारताच्या समृद्ध क्रीडा इतिहासाची आणि आपल्या देशातील खेळांच्या महत्त्वाची आठवण करून देणारा असतो. तथापि, मोठी लोकसंख्या आणि मजबूत क्रीडा संस्कृती असूनही, भारताने आंतरराष्ट्रीय स्तरावर, विशेषत: ऑलिम्पिक खेळांमध्ये लक्षणीय प्रभाव पाडण्यासाठी संघर्ष केला आहे. २०२० टोकियो ऑलिम्पिकमध्ये भारताने एक सुवर्ण, दोन रौप्य आणि चार कांस्य अशी एकूण सात पदके जिंकली. असे असले तरी चीन, अमेरिका आणि जपानसारख्या इतर देशांच्या पदकांच्या तुलनेत ते यश विशेष नाही. तर, आंतरराष्ट्रीय खेळांमध्ये भारताला यश न मिळण्यामागील कारणे कोणती आहेत आणि पुढील चार वर्षांत आपली पदकतालिका वाढविण्यासाठी काय उपाययोजना करता येतील? आंतरराष्ट्रीय खेळांमध्ये भारताच्या संघर्षाचे एक प्राथमिक कारण म्हणजे क्रीडा पायाभूत सुविधा आणि प्रशिक्षण सुविधांमधील गुंतवणुकीचा अभाव. चीन आणि अमेरिकासारख्या देशांमध्ये जागतिक दर्जाच्या सुविधा आणि प्रशिक्षण कार्यक्रम आहेत, तर भारताच्या खेळाडूंना बऱ्याचदा मर्यादित सुविधा आणि संसाधने वापरावी लागतात. यामुळे भारतीय खेळाडूंना त्यांच्या आंतरराष्ट्रीय समकक्षांशी स्पर्धा करणे कठीण होते. त्यांना चांगले प्रशिक्षक, प्रशिक्षण आणि उपकरणे उपलब्ध आहेत. भारताच्या संघर्षाचे आणखी एक कारण म्हणजे मजबूत क्रीडा संस्कृतीचा अभाव. भारतात क्रिकेट अत्यंत लोकप्रिय असताना हॉकी, ॲथ्लेटिक्स आणि पोहणे यासारखे इतर खेळ लक्ष वेधण्यासाठी आणि निधी मिळविण्यासाठी संघर्ष करतात. यामुळे या खेळांमधील खेळाडूंना यशस्वी होण्यासाठी आवश्यक असलेले समर्थन आणि संसाधने मिळणे कठीण होते. पुढील चार वर्षांत भारताची पदकतालिका वाढवण्यासाठी अनेक उपाययोजना करणे आवश्यक आहे. सर्वप्रथम सरकारी आणि खाजगी क्षेत्राने क्रीडा पायाभूत सुविधा आणि प्रशिक्षण सुविधांमध्ये अधिक गुंतवणूक करणे आवश्यक आहे. यामध्ये जागतिक दर्जाचे स्टेडियम, प्रशिक्षण केंद्रे आणि उपकरणे तसेच खेळाडूंना उच्च दर्जाचे प्रशिक्षक आणि प्रशिक्षण कार्यक्रम उपलब्ध करून देणे गरजेचे आहे. त्याचवेळी भारतात मजबूत क्रीडा संस्कृती विकसित करण्यावर अधिक भर देण्याची गरज आहे. यामध्ये लहान वयापासून मुलांना खेळात सहभाग घेण्यासाठी प्रोत्साहित करणे आणि त्यांना दर्जेदार प्रशिक्षक आणि प्रशिक्षण उपलब्ध करून देणेदेखील समाविष्ट आहे. प्रतिभावान ॲथ्लीट ओळखणे आणि विकसित करणे यावर अधिक लक्ष केंद्रित करणे आवश्यक आहे. भारताची लोकसंख्या १.४ अब्जाहून अधिक आहे, परंतु लोकसंख्येपैकी फक्त दोन टक्के लोक खेळांमध्ये भाग घेतात. (स्रोत : युवा व्यवहार आणि क्रीडा मंत्रालय). भारतातील क्रीडा उद्योग ६,००० कोटी (अंदाजे ८०० दशलक्ष अमेरिकन डॉलर्स) किमतीचा असल्याचा अंदाज आहे, परंतु हे जागतिक क्रीडा उद्योगाच्या केवळ ०.१ टक्के आहे. (स्रोत : डेलॉईट). विकसित देशांमध्ये प्रती १,००० खेळाडूंमागे १० प्रशिक्षकांच्या तुलनेत भारतात प्रती १,००० खेळाडूंमागे केवळ १.५ क्रीडा प्रशिक्षक आहेत (स्रोत : भारतीय क्रीडा प्राधिकरण). भारतातील फक्त १२ टक्के शाळांमध्ये क्रीडा सुविधा आहेत आणि फक्त ५ टक्के शाळांमध्ये पूर्णवेळ क्रीडा शिक्षक आहेत (स्रोत : मनुष्यबळ विकास मंत्रालय). भारताने स्वातंत्र्यानंतर एकूण २८ ऑलिम्पिक पदके जिंकली आहेत, परंतु त्यात केवळ दोन वैयक्तिक सुवर्ण पदके मिळविली आहेत. (स्रोत : ऑलिम्पिक खेळ अधिकृत संकेतस्थळ). चीनमधील १.५ टक्के आणि युनायटेड स्टेट्समधील २.५ टक्केच्या तुलनेत भारत सरकार आपल्या बजेटपैकी फक्त ०.०५ टक्के खेळांसाठी तरतूद करते (स्रोत : अर्थ मंत्रालय). ७५ टक्के भारतीय खेळाडू ग्रामीण भागांतून येतात, परंतु त्यांना योग्य प्रशिक्षण सुविधा आणि उपकरणे मिळत नाहीत. (स्रोत : भारतीय क्रीडा प्राधिकरण). भारतात २२,००० शारीरिक शिक्षण शिक्षकांची कमतरता आहे; ज्यामुळे शाळांमध्ये क्रीडा शिक्षणाचा अभाव आहे. (स्रोत : मनुष्यबळ विकास मंत्रालय). चीनमधील रु. ५,००० कोटीच्या (अंदाजे ६७० दशलक्ष अमेरिकन डॉलर्स) तुलनेत भारतातील क्रीडा पायाभूत सुविधांवर सरासरी वार्षिक खर्च रु. ५०० कोटी (अंदाजे ६७ दशलक्ष अमेरिकन डॉलर्स) आहे. (स्रोत : डेलॉईट). चीनमध्ये १० आणि अमेरिकेमधील २० च्या तुलनेत भारतात फक्त १ क्रीडा औषध केंद्र आहे. (स्रोत : भारतीय क्रीडा प्राधिकरण). तळागाळातील क्रीडा विकास आणि पायाभूत सुविधांच्या विकासाला पाठिंबा देण्यासाठी राष्ट्रीय क्रीडा विकास निधीची स्थापना करणे. क्रीडा साक्षरता आणि शारीरिक शिक्षणाला प्रोत्साहन देण्यासाठी शाळांमध्ये क्रीडा शिक्षण कार्यक्रम सुरू करणे. युवा प्रतिभा ओळखण्यासाठी आणि त्यांचे पालनपोषण करण्यासाठी राष्ट्रीय क्रीडा प्रतिभा ओळख आणि विकास कार्यक्रम तयार करणे. विद्यमान पायाभूत सुविधा सुधारण्यासाठी आणि नवीन सुविधा निर्माण करण्यासाठी राष्ट्रीय क्रीडा पायाभूत सुविधा विकास योजना विकसित करणे. सरकारी अर्थसंकल्पातील खेळांसाठीची तरतूद एकूण बजेटच्या किमान १ टक्का वाढवणे. क्रीडा विकास आणि पायाभूत सुविधांच्या विकासासाठी सार्वजनिक-खाजगी भागीदारीला प्रोत्साहन देणे. खेळाडूंना पाठिंबा देण्यासाठी राष्ट्रीय क्रीडा विज्ञान आणि औषधी केंद्राची स्थापना. उत्कृष्ट खेळाडू आणि प्रशिक्षकांना ओळख देण्यासाठी आणि त्यांना बक्षीस देण्यासाठी राष्ट्रीय क्रीडा पुरस्कारांची पुनर्रचना करणे. क्रीडा विकासात स्वयंसेवकांना सहभागी करून घेण्यासाठी राष्ट्रीय क्रीडा स्वयंसेवक कार्यक्रम तयार करणे. खेळांना प्रोत्साहन देण्यासाठी आणि खेळाडूंना संधी देण्यासाठी राष्ट्रीय क्रीडा माध्यम आणि प्रसारण धोरण विकसित करणे. निष्पक्ष खेळाला चालना देण्यासाठी आणि भ्रष्टाचार रोखण्यासाठी राष्ट्रीय क्रीडा नीती आणि सचोटी आयोगाची स्थापना. क्रीडा विकासासाठी निधी उभारण्यासाठी राष्ट्रीय क्रीडा निधी सुरू करणे. भारताचा क्रीडा इतिहास आणि वारसा प्रदर्शित करण्यासाठी राष्ट्रीय क्रीडा संग्रहालय तयार करणे. क्रीडा पर्यटनाला चालना देण्यासाठी आणि आंतरराष्ट्रीय कार्यक्रमांना आकर्षित करण्यासाठी राष्ट्रीय क्रीडा पर्यटन धोरण विकसित करणे. नवीन तंत्रज्ञान आणि तंत्रांचा अभ्यास आणि विकास करण्यासाठी राष्ट्रीय क्रीडा संशोधन आणि विकास केंद्राची स्थापना करणे गरजेचे आहे. प्रशिक्षकांच्या मानकांमध्ये सुधारणा करण्यासाठी राष्ट्रीय क्रीडा प्रशिक्षक प्रमाणन कार्यक्रम सादर करणे. अधिकारी दर्जा सुधारण्यासाठी राष्ट्रीय क्रीडा पंच आणि पंच विकास कार्यक्रम तयार करणे. ही तथ्ये आणि आकडेवारी भारतातील राष्ट्रीय क्रीडा संस्कृती वाढवण्यासाठी एकाग्र प्रयत्नांची गरज अधोरेखित करतात. क्रीडा पायाभूत सुविधा, प्रशिक्षण सुविधा आणि शिक्षण यामध्ये गुंतवणूक करून, भारत खेळांमधील सहभाग वाढवू शकतो, कामगिरी सुधारू शकतो आणि मजबूत क्रीडा संस्कृती विकसित करू शकतो. भारताचा क्रीडा इतिहास आणि मजबूत क्रीडा संस्कृती असताना, आपण आंतरराष्ट्रीय स्तरावर महत्त्वपूर्ण प्रभाव पाडण्यासाठी संघर्ष करत आहोत. पुढील चार वर्षांत पदकतालिका वाढवण्यासाठी, आपल्याला क्रीडा पायाभूत सुविधा आणि प्रशिक्षण सुविधांमध्ये अधिक गुंतवणूक करणे, मजबूत क्रीडा संस्कृती विकसित करणे आणि प्रतिभावान खेळाडूंची ओळख आणि विकास करण्यावर लक्ष केंद्रित करणे आवश्यक आहे. हे उपाय करून आपण भारतीय खेळाडूंना आंतरराष्ट्रीय स्तरावर यश मिळवून आपल्या देशाला गौरव मिळवून देऊ शकतो.

९९८७७४६७७६

## वेध

**गिरीश शेरेकर**

# हवामानाचा लहरीपणा आणि त्याचे परिणाम

हवामानातला लहरीपणा दिवसेंदिवस वाढतो आहे. ऋतुचक्रानुसार जून महिन्यात पावसाळा सुरू होतो आणि सप्टेंबरमध्ये तो संपुष्टात येतो. पण, गेल्या काही वर्षांपासून जून महिन्यात अपेक्षेनुरूप पाऊस येतच नाही. जुलैपासून त्याची सुरुवात होते. यंदाही तेच झाले. हिवाळा आणि उन्हाळ्याचे असेच आहे. ग्लोबल वॉर्मिंगमुळे हा बदल होत असल्याचे तज्ज्ञ सांगतात. वातावरणातले उष्णतामान दिवसेंदिवस वाढत आहे. मानवासह प्राणी, पशू व पक्ष्यांच्या जीवनावरही त्याचे परिणाम वेगवेगळे रोग व आजारांच्या माध्यमातून दिसायला लागले आहेत. वातावरणातील या बदलावर नियंत्रण मिळविण्यासाठी जागतिक पातळीवर सातत्याने मंथन होत आहे. काही उपाय सुचविण्यात आले. परंतु, त्या उपाययोजनांची अंमलबजावणी वाटते तेवढे सोपे काम नाही. जागतिकीकरणाच्या लाटेतून प्रत्येकाची बदललेली जीवनशैली ही त्या पाठीमागची मोठी अडचण आहे. ती पूर्ववत होणे कठीण असले, तरी त्यात सुधारणा निश्चित होऊ शकते. त्यासाठी व्यापक स्वरूपात अभियान हाती घेतल्यावरच पदरात काही पडण्याची शक्यता आहे. केंद्र सरकारला त्यासाठी ठोस पुढाकार घ्यावा लागणार आहे. हवामानाच्या लहरीपणाचे बोलके उदाहरण म्हणजे, ऑक्टोबर महिन्यात अपेक्षेपेक्षा जास्त होणारा पाऊस आणि वाढलेले तापमान! सध्या याच स्थितीचा अनुभव विदर्भासह महाराष्ट्रात व देशातील काही भागांत जनता घेत आहे.

दसरा झाला. दिवाळी आठ दिवसांवर आली असून पाऊस थांबण्याची काही चिन्हे दिसत नाही. पाऊस न पडण्याच्या स्थितीला अनेक जण पर्यावरणाचे कारण सांगतात. पण, जर पाऊसच अधिक पडत असेल तर याचा दोष कोणाला द्यायचा? आता ऑक्टोबर महिना सुरू आहे. महाराष्ट्राच्या गावोगावीच नव्हे, तर मुंबई, पुणे, ठाणे, नागपूर, अमरावती अशा अनेक मुख्य शहरांमध्ये अधूनमधून मुसळधार पाऊस पडतो आहे. ही स्थिती निर्माण होण्यामागचे मुख्य कारण म्हणजे हवेतील कमी दाबाचा पट्टा आहे. जेव्हा उष्णता वाढते तेव्हा हवेचा दाब कमी होतो. हवा वरच्या दिशेने जाते. त्यातून अधिक दाबाचा पट्टा असलेल्या परिसरातले ढग अपेक्षेनुसार कमी दाबाच्या परिसरात येतात आणि पाऊस पडतो. यंदा हवामान विभागाने १५ ऑक्टोबरला देशातून नैर्ऋत्य मौसमी पाऊस माघारी गेल्याचा आणि ईशान्य मौसमी पाऊस सक्रिय झाल्याचे जाहीर केले. या ईशान्य मौसमी वाऱ्यांपासून प्रामुख्याने दक्षिण कर्नाटक, दक्षिण तेलंगणासह आंध्रप्रदेश, केरळ, तामिळनाडूत जोरदार पाऊस पडतो. ईशान्य मौसमी वाऱ्यांचा वेग जास्त असेल तर हे वारे दक्षिण महाराष्ट्रापर्यंत पोहोचतात. अनेकदा ईशान्य मौसमी वाऱ्यामुळे राज्याच्या दक्षिणेकडील भागात बाष्पाचे प्रमाण वाढते आणि स्थानिक पातळीवर तापमान वाढून विजांच्या कडकडाटात पाऊस पडतो. सध्या राज्याच्या अनेक भागांत याचप्रकारे पाऊस पडतो आहे. पुढे आणखी काही दिवस असाच पाऊस होण्याची शक्यता वर्तविली जात आहे. खरिपाची जी पिके सध्या शेतात आहेत, त्याला त्याचा फटका बसणार आहे.

सध्या मध्य अरबी समुद्रात वाऱ्याची चक्रीय स्थिती निर्माण झाली आहे. तिची वाटचाल वायव्य दिशेने होत असल्यामुळे दोन दिवसांत कोकणातील पावसाचे प्रमाण कमी होण्याचा अंदाज आहे. याशिवाय बंगालच्या उपसागरात २२ ऑक्टोबर रोजी आणखी एक तीव्र कमी दाबाचे क्षेत्र तयार होणार आहे. त्याची वाटचाल ओडिशा किनारपट्टीच्या दिशेने होण्याची शक्यता आहे. वाऱ्याचा जोर जास्त राहिल्यास ऑक्टोबरच्या शेवटच्या आठवड्यात पूर्व विदर्भात हलक्या ते मध्यम स्वरूपाचा पाऊस पडण्याची शक्यता भारतीय हवामान विभागाने वर्तविली आहे. ऑक्टोबर महिन्यात सरासरीच्या ११५ टक्के पाऊस पडण्याचा अंदाज असल्याने दिवाळीत काही प्रमाणात पाऊस येऊ शकतो. इतका पाऊस होत असताना उन्हाची वाढलेली तीव्रता आणि त्यातून वाढलेला उष्मा सर्वांनाच हैराण करतो आहे. उन्हाळ्यात होते तशी गरमी सध्या होत आहे. सकाळी थंडावा जाणवतो. थंड, गरम व पाऊस हे समीकरण आरोग्यावर परिणाम करणारे आहे. व्हायरल इन्फेक्शनचे प्रमाण त्यामुळेच वाढले असून घरोघरी बाधित आहेत. दिवाळीसारख्या सणाचा उत्साह कमी करणारा हा वातावरणीय बदल आहे. विशेष म्हणजे प्रत्येक ऋतूमध्ये सातत्याने असा बदल दिसतो आहे. प्रत्येक वेळी त्याची वेगवेगळी कारणे सांगितली जात आहेत. निसर्गाचे हे एक प्रकारचे दृष्टचक्रच आहे. मानवासाठी ते अजिबात चांगले नाही. यातून सुटका होण्याची चिन्हे कुठेच दिसत नाही. उलट हे चक्र अधिक वेगवान होण्याची भीतीच जास्त आहे.

९४२०७२१२२५

## धर्म-संस्कृती

**प्रा. दिलीप जोशी**

# सुखी जीवनाचा मंत्र!

*'असं तर असं! तसं तर तसं! नाहीतर! जसं होईल तसं!'*

सुखी जीवनाचा हा सिद्धमंत्र आहे. आजचे चिंतन या अद्‌भुत मंत्रावर करूया. माणूस सदासर्वकाळ सुखासाठी धडपडत असतो. सुख ही संकल्पना तत्सापेक्ष असली, तरी सुखाच्या प्राप्तीचे संस्कार लहानपणापासूनच दिले जातात. अगदी शिशु अवस्थेतही त्याचे आई-वडील, आजी-आजोबा त्या बालकाचे डोके देवाच्या पायावर ठेवतात आणि 'जय देवा सुखी ठेवा'चं मागणं मागण्याचा सहज संस्कार करतात. थोडक्यात, आपली सारी तळमळ सुखलागी असते.

आयुष्यभर अशी तळमळ करूनही सुखापर्यंत आपण पोहोचतो का खरंच? खरं सांगू! सुख क्षितिजासारखे आहे. समोर दिसते, पण भेटत नाही. कारण मनुष्याला उच्चभोग दिसला की कनिष्ठ भोग गौण वाटू लागतो. असे अनंत उच्चभोग आपल्याला नित्य समोर दिसतात. आपल्याजवळ जे आहे त्याचे महत्त्व नसतेच आपल्याला, पण जे आपल्याजवळ नाही त्यामागे वृथा धावतो आपण.

*बहु मृगजळ देखोनी डोळा । थुंकीजे जे अमृताचा गिळिता गराळा ॥*

समोर मृगजळ दिसले म्हणून तोंडातील अमृताचा गुराळाही थुंकून देतो आपण. हा आपला निसर्गदत्त स्वभाव आहे. सुख मिळावे यासाठी आपण सातत्याने धडपडत असतो आणि ते मिळत नाही म्हणून अस्वस्थता, बेचैनी, खाना खराब आणि निंद हराम अशी सदैव अवस्था आपल्या प्रत्येकाच्या जीवनात कायम निवासी असते. म्हणजे काय? तर, कितीही असू द्या जवळ तरीही माणूस आयुष्यभर अतृप्तच असतो. ही अतृप्तीच आपल्या दुःखाचे मूळ कारण आहे. असे दुःख विरघळून टाकायचे असेल तर त्यासाठी एकच सुखाचा मंत्र डॉ. दीपक केळकरांच्या एका व्याख्यानात मला सापडला.


तो म्हणजे-

*'असं तर असं! तसं तर तसं! नाहीतर! जसं होईल तसं!'*

मनुष्य स्वभाव लक्षात घेता आपल्याजवळ कितीही सुखं असली, तरी 'सुख पाहता जवापाडे आणि दुःख पर्वताएवढे' याच अतृप्तीत आपण जगत असतो. सुखाच्या राशीच्या राशी आपल्याजवळ असल्या, तरी त्या सुखराशी आपल्याला जवा (जवगव्हाचा दाणा) सारख्या वाटतात आणि दुःख सुक्ष्म म्हणजे नगण्य असले, तरी ते आपल्याला पर्वताएवढे वाटते. हा मनुष्य स्वभाव आहे. त्यामुळे आपल्या जीवनात कायम अशांती आणि अस्वस्थता असते. यावरचा एकच उपाय म्हणजे प्राप्त स्थितीचा आनंदाने स्वीकार करणे होय. एकदा असं जगून पहा.

त्यातला पहिला मंत्र म्हणजे 'असं तर असं!'

म्हणजे आपल्यावर आलाच प्रसंग एखादा आणि त्या प्रसंगाला आपल्याला सामोरे जावेच लागणार तर पळून जायचे नाही. प्राप्त स्थितीला तोंड देत म्हणायचे 'ठीक आहे! असं तर असं!'



मी स्वीकारतो ही स्थिती! जातो सामोरे हिला. ती स्थिती का आली? कुणामुळे आली? त्याच्यावरचे उत्तर शोधू यथावकाश; पण तूर्त मला प्राप्त स्थिती स्वीकारून 'असं तर असं'चा मंत्र लक्षात घ्यायचा म्हणजे मानसिक स्वास्थ्य बिघडत नाही.

दुसरा मंत्र आहे 'तसं तर तसं!'

कधी कधी काही स्थिती अशा येतात की, आपल्याला मनाविरुद्ध काही स्वीकारावं लागतं. त्या स्थितीत आपल्यासमोर पर्यायही नसतो. म्हणजे सहनही होत नाही आणि सांगताही येत नाही, ही अवस्था आपल्या वाट्याला येते. या स्थितीत चुकीचे पाऊल पडण्याची दाट शक्यता असते. त्यावेळी मनाला मुरड घालावी आणि 'तसं तर तसं'चा मंत्र जपावा. आहे त्या परिस्थितीला पाहिजे तसं बनवण्याचा प्रयत्न करायचा.

तिसरा मंत्र आहे- 'नाहीतर जसं होईल तसं!'

कधी कधी जीवनात असे प्रसंग येतात की, जिथे आपण हतबल असतो. प्रसंग बाका असतो. अगदी काहीच सुचत नाही अशावेळी माणूस घाबरून जातो. नको ते पाऊल उचलण्याची शक्यता असते. हीच वेळ आहे 'नाहीतर जसं होईल तसं'चा मंत्र वापरण्याची. यामध्ये 'नाहीतर' शब्द महत्त्वाचा आहे. समोर आलेली परिस्थिती हाताळण्याचा पूर्ण प्रयत्न करायचा, पण तरीही काहीच होत नसेल तर म्हणजे 'नाहीतर जसं होईल तसं' म्हणायचं.

खरं सांगायच तर सारं काही ठीकच होत असते. फक्त आपले काळीज हलके असल्यामुळे आपण भांबावून जातो. त्यामुळे तणावात येतो. तणाव आला की आनंद गमावतो. आनंद गेला की दुःख आपसूकच आपल्याकडे सरकते. दुःखासोबत चिडचिड, घरच्यांशी वादविवाद, तंटा, अबोला, घरातून निघून जाणे इत्यादी प्रकार आपल्याकडून सहजपणे होतात. यामुळेच डोकेदुखी, छाती धडधड करणे, रक्तदाब, घसा कोरडा पडणे अशा आजारांना सामोरे जावे लागते.

लक्षात ठेवा! ताणतणाव, घरातले वातावरण खराब करणे, तोंड पाडून बसणे, मौन बसणे, स्वतःला कोंडून घेणे हा उपायच नाही.

उपाय एकच आहे तो म्हणजे प्राप्त स्थितीला सामोरे जाणे. असे सामोरे जाताना आपण परिस्थितीचा स्वीकार केला की मन:स्थिती सहजच बनते. अजून एक सांगू! कधी कधी आपल्या हातात काहीच राहात नाही. आपली बुद्धी, शक्ती आणि पराक्रम काम करत नाही. 'न दैन्यम् न पलायनम्' अशी स्थिती येते. अशावेळी शांत बसा, दीर्घ श्वास घ्या. सारं काही परिस्थितीवर सोडा. त्या दिव्य शक्तीवर विश्वास ठेवा. होऊ द्या जे व्हायचे ते! परिस्थितीला घाबराल तर ती आपल्याला जास्त घाबरवते आणि हिंमत ठेवाल तर प्राप्त परिस्थिती पलायन करते. त्यासाठी सर्वोत्तम मंत्र आहे-

'असं तर असं! तसं तर तसं! नाहीतर! जसं होईल तसं!'

एकदा असे जगून तर पहा.

'असं तर असं' हा तृप्त संयम आहे. या मंत्राने तोडगा निघत नसेल तर 'तसं तर तसं' हा परकोटीचा विवेक आहे. या मंत्रानेही प्रश्न सुटत नसेल तर मग 'नाहीतर जसं होईल तसं' हे धैर्य आणि संकटांना कोलून टाकण्याची क्षमता आहे. सगळ्या जटिल आणि कुटिल प्रश्नांचे उत्तर म्हणजे हा सिद्धमंत्र आहे.

९८२२२६२७३५

## वाचक पत्रे

### सर्वोच्च देवत्व

एखाद्या जटिल समस्येचे समाधान शोधताना अनेकदा आपण देवाची मदत घेतो. वैद्यकीय क्षेत्रात ही एक सामान्य बाब समजली जाते. अनेक लहान-मोठ्या रुग्णालयात प्रवेश करताच आपल्याला बाप्पांचे दर्शन होते आणि दिलासा मिळतो. शेकडो वर्षे ज्या वादावर तोडगा सापडत नव्हता त्याबाबत एक ऐतिहासिक निकाल देणे ही असामान्य घटना आहे. निकाल देणाऱ्या व्यक्तीने किती महिने सतत सखोल विचार केला असेल, याची कल्पना करवत नाही. रोजची देवपूजा करताना देवाला केलेली मार्गदर्शनाची विनंती फळाला आली. यमाई देवीचा आशीर्वाद मदतीला आला. कणेरसर हे लहानसं गाव पुणे जिल्ह्यातील खेड तालुक्यात आहे. या गावी राहणाऱ्या एका स्त्रीने आपल्या कुटुंबातील मुलांना शिक्षणासाठी पुण्याला आणले. स्वतःजवळील सर्व संपत्ती खर्च करून मुलांचे शिक्षण पूर्ण केले. साहजिकच स्त्री सशक्तीकरणाची भावना त्या मुलांत वाढीला लागली. त्यांच्या पत्नीने पण या महान कार्यासाठी महत्त्वाचे योगदान दिले. पती-पत्नीने दोन विशेष मुलींना दत्तक घेतले. त्यांचे संगोपन करताना त्यांना स्त्री सशक्तीकरणाची प्रेरणा मिळाली. त्यांच्या निर्णयामुळे आपल्या देशाच्या लष्करात स्त्रियांना कायम नियुक्ती मिळू शकली. वायुसेनेत अनेक महिला वैमानिक पदावर आहेत. नौदलातील युद्धनौकांवर स्त्री शक्तीचा झेंडा दिमाखात फडकत आहे. काही विशिष्ट कार्य करण्यासाठी देव पृथ्वीतलावर अवतार घेत असतो. त्या मानवी अवतारात पदोपदी देवत्वाचा साक्षात्कार घडत असतो. कार्यसिद्धीसाठी देवाच्या कृपेने ती व्यक्ती न्यायपालिकेच्या सर्वोच्च पदी पोहोचते. दिव्यत्वाची प्रचीती आल्यावर दोन्ही हात आपोआपच जोडल्या जातात.

**डॉ. मदन काकडे**/९३७३११२४८७

●● ●●

### मोदी है तो मुमकिन है!

काही वर्षांपूर्वी डाव्या विचारसरणीचा गड असलेल्या दिल्ली येथील जवाहरलाल नेहरू विश्वविद्यालयमध्ये (जेएनयू) राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे पथसंचलन झाल्याची बातमी वाचण्यात आली. यात होस्टेलमधील मोठ्या प्रमाणावर विद्यार्थी सामील झाले होते. आपणास आठवत असेल याच जवाहरलाल नेहरू विद्यापीठात ९ फेब्रुवारी २०१६ रोजी डाव्या विचारसरणीच्या विद्यार्थ्यांनी देशविरोधी घोषणा दिल्यात. आता शहीद भगतसिंग मार्ग आणि सावरकर मार्ग विद्यापीठ परिसरात बांधण्यात आले आहेत.

डावी विचारसरणी, मुस्लिम तुष्टीकरण, हिंदुत्व विरोध या ठिकाणी मोठ्या प्रमाणात होता. यामुळे जेएनयूची प्रतिमा सर्वसामान्य जनतेत फारशी चांगली नव्हती. विशेष बाब म्हणजे आता या विद्यापीठात शिवाजी महाराजांवर एक अभ्यासक्रम सुरू करण्यात आला असून त्याला महाराष्ट्र सरकारने आर्थिक सहाय्य पुरविले आहे. १० वर्षांपूर्वी या विद्यापीठात असला अभ्यास, हिंदुत्व याचा विचारसुद्धा कोणी डोक्यात आणू शकत नव्हता. नरेंद्र मोदी देशाचे पंतप्रधान झाल्यापासून हा बदल आपणास प्रामुख्याने जेएनयूत दिसत आहे. मोदी हैं तो मुमकिन हैं...!

**अविनाश देशपांडे**/९२८४६७९६२३

### धन्यवाद मनपा

केंद्र शासनाच्या 'स्वच्छ दिवाळी - शुभ दिवाळी' या मोहिमेनुसार मनपाद्वारे २१ ते ३१ ऑक्टोबर या दरम्यान शहरातील स्वच्छतेसाठी अनेक उपक्रम राबविले जाणार असल्याचे वृत्त आले. मनपा आयुक्त डॉ. चौधरी यांनी सामान्य नागरिकांना आवाहन केले आहे. त्यानुसार नागरिकांना घरातील निरुपयोगी पण पुनर्वापर करण्यायोग्य वस्तू संकलित करण्याचे काम मनपा स्वीकार केंद्रात सुरू झाले आहे. घरच्या वस्तू, कपडे, प्लॅस्टिकच्या वस्तू, ई कचरा मुबलक प्रमाणात सामान्य लोकांकडे असतो. या निमित्ताने नागरिकांनी या योजनेचा लाभ घ्यावा. याचा दुहेरी फायदा असा की, आपल्याकडील जागा रिकामी होते आणि चांगल्या गोष्टी आपल्याला टाकवत नाहीत. त्याचा दुसऱ्याला उपयोग होईल, या विचाराने त्या देण्यास आपल्याला समाधान वाटेल. सोबतच शहरात स्वच्छता मोहीम राबविली जाणार आहे. पुतळ्यांची आणि दहनघाटांची स्वच्छता होणार, ही समाधानाची बाब आहे.

या उपक्रमाकरिता सगळ्यांचा पाठिंबा, हातभार लागणार आहे. तो सामान्य नागरिक म्हणून आपण नक्की देऊ आणि खऱ्या अर्थाने स्वच्छ सुंदर शहर आणि पर्यावरणपूरक दिवाळी साजरी करू.

**स्नेहल खंडागळे**/नागपूर

●● ●●

### वसुबारस आणि गुरुद्वादशी

हिंदू धर्मामध्ये गाईला गोमाता म्हटले जाते. गाईच्या पोटामध्ये तेहतीस कोटी देव वास करतात, अशी मान्यता आहे. गाय म्हणजे मानवी जीवनासाठी संजीवनीच आहे. देशी गाईपासून भरपूर फायदे होतात. देशी गाईचे दूध, शेण, गोमूत्र अत्यंत उपयोगी आहे. दूध हे बुद्धी वाढवणारे, रोगप्रतिबंधक, शरीराचे पोषण करणारे असते. दूध, तूप, ताक म्हणजे ईश्वरनिर्मित आहारच आहे. वसुबारसेच्या दिवशी गुरुद्वादशीदेखील असते. या दिवशी शिष्य ज्याप्रमाणे गुरुपौर्णिमेदिवशी पूजन करतात तसेच आपल्या गुरूंचे भावपूर्ण पूजन करतात.


**वैशाली घाडगे**/नागपूर

हे पत्र मुद्रक व प्रकाशक कुलभूषणराम रामकृष्ण तारे यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय प्लॉट नं ए -३२,छत्रपती संभाजीनगर इंडस्ट्रियल को ऑफ सोसायटी रेल्वे स्टेशन रोड छत्रपती संभाजी नगर ४३१००५ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक सोलापूर तरुण भारत कार्यालय,छत्रपती संभाजीनगर येथे प्रकाशित करून छत्रपती संभाजीनगर, जालना,परभणी,नांदेड, हिंगोली ,बीड येथील सोलापूर तरुण भारतच्या विभागीय कार्यालयातून वितरीत केले.
प्रबंध संपादक :विवेक घळसासी. मुख्य समुह संपादक : दिलीप यशवंत पेठे. मुख्य संपादक: प्रशांत वसंतराव माने, दूरध्वनी -८८८८८४७२६८
RNI Reg.No 46878/87
stbaurangabad@gmail.com. www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही. (पी. आर. बी. कायद्यानुसार जबाबदारी)

सोलापूर तरुण भारत
www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

# मतदार जनजागृतीवर अधिक भर द्या-महेंद्रकुमार कांबळे

## माध्यम कक्ष, स्वीप आणि टपाली मतपत्रिका प्रक्रियेबाबत प्रशिक्षण





**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.२३ ऑक्टोबर**

विधानसभेची निवडणूक २० नोव्हेंबरला होत आहे. या निवडणुकीत मतदान अधिकाधिक व्हावे, यासाठी अधिकाधिक जनजागृतीवर भर द्यावा, अशा सूचना उपजिल्हा निवडणूक अधिकारी महेंद्रकुमार कांबळे यांनी केले.जिल्ह्यातील सर्व विधानसभा मतदार संघातील माध्यम कक्ष, स्वीप आणि टपाली मतपत्रिका प्रक्रियेबाबतचे प्रशिक्षण आज जिल्हाधिकारी कार्यालयाच्या नियोजन सभागृहात पार पडले. उपजिल्हा निवडणूक अधिकारी महेंद्रकुमार कांबळे, प्रशिक्षक उपजिल्हाधिकारी शैलेश सूर्यवंशी, पोलिस निरीक्षक संतोष साबळे, एनआयसीचे संशोधक भाऊसाहेब बांगर, प्रा. लोळगे यांच्या उपस्थितीत प्रशिक्षण पार पडले.

जिल्ह्यातील सहाही विधानसभा मतदार संघातील माध्यम कक्ष स्थापन करण्यात आले आहेत. या कक्षाच्या माध्यमातून तसेच माध्यम प्रमाणिकरण व सनियंत्रण समितीकडून करावयाच्या कार्यवाहीबाबत श्री. कांबळे यांनी मार्गदर्शन केले. समितीचे कार्य, कार्यपद्धती, पेड न्यूज, फेक न्यूज याबाबतही उपस्थित अधिकारी, कर्मचारी यांना प्रशिक्षण देण्यात आले. माध्यम प्रमाणिकरण व सनियंत्रण समितीकडून राजकीय जाहिरातीचे पूर्व प्रमाणिकरण जिल्हास्तरावरून करण्यात येणार आहे. यासह समितीची रचना, कार्य, पेड न्यूजविषयक तक्रारींची पडताळणी, माध्यम सनियंत्रण यावर प्र.जिल्हा माहिती अधिकारी डॉ.श्याम टरके यांनी सादरीकरण केले. या प्रशिक्षणानंतर जिल्हाभरात स्वीपमार्फत राबविण्यात येत असलेल्या उपक्रमांचाही आढावा याठिकाणी घेण्यात आला. मतदारांचा मतदान प्रक्रियेत सहभाग वाढवावा यासाठी स्वीप कक्षाने अधिकाधिक भर द्यावा, अशा सूचना श्री. कांबळे यांनी अधिकाऱ्यांना केल्या. या दोन्ही प्रशिक्षणानंतर टपाली मतदान प्रक्रियेबाबत जिल्ह्यातील अधिकारी, कर्मचाऱ्यांना प्रशिक्षण देण्यात आले.

# विधानसभा निवडणूक २०२४ मनुष्यबळाचे प्रथमस्तरीय सरमिसळीकरण पूर्ण

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.२३ ऑक्टोबर**

बीड जिल्ह्यातील विधानसभा मनुष्यबळाचे पहिले सरमिसळीकरण मंगळवारी (ता. २२) जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी अविनाश पाठक यांच्या उपस्थितीत पूर्ण झाले. या सरमिसळीकरणाप्रसंगी निवडणूक उपजिल्हाधिकारी महेंद्रकुमार कांबळे उपस्थित होते.

विधानसभेची निवडणूक २० नोव्हेंबरला होत आहे. या निवडणुकीसाठी नियुक्त कर्मचाऱ्यांचे सरमिसळीकरण पूर्ण झाले आहे. यामध्ये जिल्ह्यात तीन हजार एक मतदान केंद्राध्यक्ष, प्रथम मतदार अधिकारी तीन हजार चार आणि इतर मतदार अधिकारी सहा हजार ३५७ असे एकूण १२ हजार ३६२ अधिकारी कर्मचाऱ्यांचा समावेश होता. यातील गेवराई १९६२, माजलगाव २०४२, बीड २२८३, आष्टी २४९८, केज २०२९, परळी विधानसभा मतदार संघातील १५४८ अधिकारी, कर्मचारी आहेत.

# आई-वडिलांच्या कष्टाची जाणीव ठेवा, जीवनात काहीच कमी पडणार नाही

### माजी नगराध्यक्ष डॉ.दिपाताई क्षीरसागर यांचे प्रतिपादन; नागापूर (खु.) येथे स्पर्धा परीक्षेचे बक्षीस वितरण



**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.२३ ऑक्टोबर**

विद्यार्थ्यांनी शालेय जीवनात शिक्षणाकडे लक्ष द्यावे. शालेय शिक्षणच स्पर्धा परीक्षेचा पाया आहे. आई-वडिलांच्या कष्टांची जाणीव ठेवा, जीवनात तुम्हाला काहीही कमी पडणार नाही, असे प्रतिपादन माजी नगराध्यक्ष डॉ.दिपाताई क्षीरसागर यांनी केले.

बीड तालुक्यातील नागापूर (खुर्द) येथे श्री.संत सावता गणेश मंडळातर्फे आयोजित विविध स्पर्धा परीक्षांचे सोमवारी (दि.२१) बक्षीस वितरण पार पडले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानावरून डॉ.दिपाताई क्षीरसागर ह्या बोलत होत्या.

प्रमुख पाहुणे म्हणून वाहेगाव येथील श्रीहरी विद्यालयाचे मुख्याध्यापक के.डी.राऊत, मंडळाचे अध्यक्ष ह.भ.प. हनुमान लव्हाळे, शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष ज्ञानेश साळुंके, मा.सरपंच अर्जुन साळुंके, साळुंके, किशोर ठोकणे, पत्रकार चंद्रकांत साळुंके, चेअरमन लक्ष्मण साळुंखे यांची उपस्थिती होती. कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी हनुमान साळुंके, धर्मा साळुंके, महेंद्र साळुंके, समाधान घोडके, परमेश्वर साळुंके, गोकुळ साळुंके यांनी मेहनत घेतली. शाम साळुंके यांच्या सुत्रसंचलनाने कार्यक्रमाची शोभा वाढवली. प्रास्ताविक नामदेव साळुंके केले. आभार प्रा.रखमा साळुंके यांनी मानले. यावेळी लहान मुलांमध्ये कमालीचा आनंद उत्साह दिसून आला. दरम्यान, गावातील ज्येष्ठ पोलीस पाटील हसन पठाण यांची डॉ.दिपाताईंनी भेट घेऊन प्रकृतीची विचारपूस केली.

# आष्टीतून भीमराव धोंडेंची उमेदवारी दाखल



**तभा वृत्तसेवा**
**आष्टी दि.२३ ऑक्टोबर**

आष्टी-पाटोदा- शिरूर मतदार संघातील जागा वाटपाचा तिढा कायम असतांना आष्टीचे माजी आमदार भीमराव धोंडे यांनी हजारो कार्यकर्तांसह आपला उमेदवारी अर्ज बुधवारी सकाळी दाखल केला आहे.

राष्ट्रवादी काँग्रेस व भाजपमध्ये आष्टीच्या जागेवरून वरिष्ठ पातळीवर चर्चेच्या फेर्या झडत असतांनाच धोंडे यांनी आपला अर्ज दाखल केला. माजी आमदार सुरेश धस यांनी बुधवारी पुन्हा देवेंद्र फडणवीस यांची भेट घेतली.

# वेतन देयके, सण अग्रीम देयके तत्काळ सादर करण्याचे आवाहन

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.२३ ऑक्टोबर**

महाकोषवरील सर्व प्रणाली २५ ऑक्टोबरच्या मध्यरात्रीपासून क्लाऊडवर वर्ग करण्याची कार्यवाही सुरु करण्यात येणार आहे. त्यामुळे सर्व कामकाज २६ ते २९ ऑक्टोबर या कालावधीत बंद राहणार आहे. तरी जिल्ह्यातील सर्व आहरण व संवितरण अधिकारी यांनी ऑक्टोबर २०२४ चे वेतन देयक व उत्सव अग्रीम देयक उद्या २३ आणि २४ ऑक्टोबर रोजी कोषागारात देयक सादर करावेत,असे आवाहन जिल्हा कोषागार अधिकारी लहू गळगुंडे यांनी केले आहे.

# नगरपालिकेतील कनिष्ठ अभियंत्याला लाच घेताना पकडले

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.२३ ऑक्टोबर**

पिंपळनेर पोलीस ठाण्यातील रामप्रसाद शिवनाथ कडूळे (वय- ३६,पोलीस अंमलदार) व ईश्वर बाबासाहेब जामकर (वय-४४ होमगार्ड) या दोघांवर वाळूचा टॅक्टर चालू देण्यासाठी व बीड नगरपालिकेतील तक्रारदार यांचे वडील व त्यांचे शेजारी यांचे बांधकाम परवाना काढण्यासाठी ९ लाखांच्या लाच प्रकरणात कनिष्ठ अभियंता व खाजगी इसमावर गुन्हा दाखल करण्यात आला आहे.एकाच दिवशी बीड व जालना लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने केलेल्या कारवाईत चार जणांवर गुन्हे दाखल करण्यात आल्यामुळे खळबळ उडाली आहे.

पिंपळनेर पोलीस ठाण्यातील रामप्रसाद शिवनाथ कडूळे (अंमलदार) व होमगार्ड ईश्वर बाबासाहेब जामकर या दोघांवर पिंपळनेर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.वाळूचा टॅक्टर चालू देण्यासाठी ५ हजारांच्या लाच प्रकरणात हे गुन्हे दाखल करण्यात आले.होमगार्डला ताब्यात घेण्यात आले असून रामप्रसाद कडूळे फरार आहे.जालन्याच्या पथकाने बीडमध्ये येऊन ही कारवाई केली.तर दुसरीकडे बीडच्या नगरपालिकेतील कनिष्ठ अभियंता फारुकी अखिल आहेमद वकील आहेमद याने बांधकाम परवान्यासाठी बारा लाखांच्या लाचेची मागणी करून तडजोडी अंती ९ लाख तक्रारदार यांना खाजगी इसम किशोर खुरमुरे यांचेकडे देण्यास सांगून प्रोत्साहन दिले.म्हणून दोन्ही आरोपींना एसीबीने ताब्यात घेतले आहे. बीड शहर पोलीस ठाण्यात सध्या गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया चालू असून लाचलुचपत विभागाच्या करवाईमुळं चार जणांवर गुन्हे दाखल करण्यात येत आहेत.एकाच दिवशी पोलीस आणि नगरपालिकेतील लाचखोरांवर कारवाई झाल्यामुळे बीडमध्ये मात्र अधिकाऱ्यांचे धाबे दणाणले होते.

# कृषिमंत्री धनंजय मुंडे आज भरणार साध्या पद्धतीने उमेदवारी अर्ज

### आ.पंकजाताई मुंडे यांच्यासह स्थानिक पदाधिकारी राहणार उपस्थित, कोणतेही शक्ती प्रदर्शन, रॅली किंवा सभेचे नसणार आयोजन!

**तभा वृत्तसेवा**
**परळी वैद्यनाथ दि.२३ ऑक्टोबर**

राज्याचे कृषिमंत्री धनंजय मुंडे हे विधानसभा सार्वत्रिक निवडणुकीसाठी परळीतून राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या वतीने महायुतीचे उमेदवार म्हणून आपला उमेदवारी अर्ज गुरुवार, दि. २४ ऑक्टोबर रोजी सकाळी ११ ते ३ या वेळेत साध्या पद्धतीने भरणार आहेत.

उमेदवारी अर्ज सादर करताना भाजप नेत्या आमदार पंकजाताई मुंडे यांच्यासह परळी विधानसभा मतदारसंघातील राष्ट्रवादी काँग्रेस, भारतीय जनता पक्ष, शिवसेना व घटकपक्ष महायुतीचे प्रमुख पदाधिकारी यांची उपस्थिती असणार आहे.

दरम्यान नेहमी रेकॉर्डब्रेक गर्दी व विक्रमी सभांचे आयोजन करणारे धनंजय मुंडे हे यावेळी साध्या पद्धतीने आपला उमेदवारी अर्ज दाखल करणार असून कोणतेही शक्ती प्रदर्शन रॅली किंवा सभेचे आयोजन करण्यात येणार नसल्याचे त्यांच्या कार्यालयाच्या वतीने सांगण्यात आले आहे.

२०१९ च्या निवडणुकीमध्ये निवडून आल्यानंतर धनंजय मुंडे यांनी मागील पाच वर्षाच्या काळात सामाजिक न्याय व कृषी या दोन खात्यांचे बारी बारीने मंत्री पद सांभाळले. या काळात परळी विधानसभा मतदारसंघासह बीड जिल्ह्याच्या विकासासाठी अनेक भरीव कामे करत धनंजय मुंडे यांनी पायाभूत सुविधांच्या निर्मितीवर भर दिला. जिल्ह्याचे पालकमंत्री म्हणून कोविड महामारीच्या काळात धनंजय मुंडे यांनी परळीसह जिल्ह्यात केलेले सूक्ष्म नियोजन अत्यंत प्रभावी ठरले, त्याची दखल अगदी आंतरराष्ट्रीय माध्यमांनी सुद्धा घेतली. परळी मतदारसंघात देखील या काळात मुंडेंच्या माध्यमातून अनेक विकासकामे पूर्ण करण्यात आली, तर अनेक कामे प्रगतीपथावर आहेत, त्याचा फायदा या निवडणुकीत धनंजय मुंडे यांना निश्चितच होईल.

# महिला महाविद्यालयाचे तृतीय नॅक मूल्यमापन

**तभा वृत्तसेवा**
**परळी वैद्यनाथ दि.२३ ऑक्टोबर**



येथील लक्ष्मीबाई देशमुख महिला महाविद्यालयाचे तिसरे 'नॅक ' मूल्यमापन संपन्न झाले . या तृतीय मूल्यमापनासाठी ' नॅक' च्या त्रिसदस्यीय समितीच्या तज्ज्ञांनी २२ व २३ आक्टोबर रोजी महाविद्यालयास भेट दिली .

या समितीत डॉ जितेनकुमार सोनी ( माजी कुलगुरु सौराष्ट्र विद्यापीठ गुजराथ .) हे समितीच्या अध्यक्षस्थानी होते तर डॉ . वासंती ताटिमाकुला ( योगी वेन्नम्मा विद्यापीठ कडापा , आंध्रप्रदेश .) व डॉ . पार्वती रुद्रप्पा ( व्ही इ टी फर्स्ट ग्रेड कॉलेज बेंगलोर , कर्नाटक . ) यांनी सदस्या म्हणून काम पाहिले . त्यांच्या या दोन दिवसीय भेटीत त्यांच्याद्वारा महाविद्यालयातील विविध विभागांची तपासणी केली गेली . त्यात महाविद्यालयाने राबविलेले विविध उपक्रम , समाजोपयोगी घेतलेली भूमिका ,विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी केलेले कार्य ,कार्यालयीन कामकाज अशा विविध विभाग कार्याचे मूल्यमापन केले.

त्यात प्रथम दिवशी महाविद्यालयात कार्यरत विविध शैक्षणिक विभागांना भेटी देऊन त्यांच्या कार्याचा अहवाल तपासून त्या त्या विभागाच्या कार्याचे कौतुक करून भविष्यत् उन्नतीसाठी कांही उपयोगी सूचनाही दिल्या.महाविद्यालयातील विविध मंडळे - भाषावाङ्मय मंडळ , विज्ञान मंडळ , सामाजिकशास्त्रे मंडळ , विद्यार्थिनी कल्याण विभागासह महाविद्यालयात कार्यरत असलेल्या विविध क्लब कार्यांचीही त्यांनी भेट देऊन माहिती घेतली . याबरोबरच महाविद्यालयांमध्ये माजी विद्यार्थिनी मेळावा , पालक मेळावा घेऊन यांत पालक व माजी विद्यार्थिनींशीही या कमिटीने संवाद साधला . तसेच सध्या महाविद्यालयात शिकत असणाऱ्या विद्यार्थिनींची त्यांनी विविध प्रश्नांच्या माध्यमातून संवाद साधून त्यांचे मनोगत ऐकून घेतले.प्रथम दिनी सायंकाळी पाच ते सात या कालावधी दरम्यान महाविद्यालयातील विद्यार्थिनींचे विविध गुणदर्शन घडवणारा सांस्कृतिक कार्यक्रम संपन्न झाला . त्यात अनेक कलावंत विद्यार्थिनींनी या समितीसमोर आपल्या विविध कलागुणांचे आविष्कारण करून दाखविले.या पुनर्मूल्यमापन प्रक्रियेसाठी महाविद्यालयाने नेमलेल्या समितीत प्राचार्या डॉ विद्या देशपांडे यांच्या मार्गदर्शनाखाली महाविद्यालयीन अंतर्गत गुणवत्ता निर्धारण कक्षाचे समन्वयक म्हणून प्रा डॉ शिवनारायण वाघमारे यांनी काम पाहिले.या मूल्यमापनकार्याच्या यशस्वितेसाठी महाविद्यालयातील सर्वच शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी प्रचंड मेहनत घेतली.


# डॉ हेडगेवार सार्वजनिक वाचनालयात मराठी भाषेस अभिजात दर्जा मिळाल्याबद्दल आनंदोत्सव साजरा

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.२३ ऑक्टोबर**

डॉ हेडगेवार सार्वजनिक वाचनालयात मराठी भाषा अभिजात दर्जा मिळाल्याबद्दल

आनंदोत्सव व विविध क्षेत्रात पुरस्कार प्राप्त प्राध्यापक तसेच सेवानिवृत्त शिक्षक याना शुभेच्छा समारंभाचे आयोजन करण्यात आले प्रमुख अतिथी अतुल कुलकर्णी यानी मार्गदर्शन करताना मराठी भाषेस अभिजात दर्जा मिळाला ही महाराष्ट्रीयाना साठी अभिमानाची व आनंदाची बातमी आहे ही मातृभाषा यात विपुल दर्जेदार साहित्य आहे प्रत्येकाने मराठी भाषा प्राधान्याने सर्व क्षेत्रात उपयोगात आणावी कुटूंबात मराठी भाषेत व्यवहार करावा मुलाना मराठी भाषूत शिक्षण द्यावे चांले दर्जेदार साहित्य निर्माण करणे आपली जबाबदारी आहे अभिजात भाषा दर्जा मिळाल्याने आपली जबाबदारी वाढली आहे असे प्रतिपादन केले.

प्रा अरुणचंद्र पाठक प कोकण प्रातांध्यक्ष यानी मराठी भाषेचा प्रारभापासुन इतिहास मांडला ही भाषा समृध्द आहे अभिजात दर्जा प्राप्ती बर्याच दिवसापासुन मागणी पूर्ण झाली ही आनंदाची घटना आहे अध्यक्षीय समारोप हेमंत मूजुमदार यानी केला मातृभाषा ही आपल्यासाठी प्रिय असते या भाषेतुन




शिक्षण घेवुन यश संपादन करता येते व विविध क्षेत्रात जावुन आपण यशस्वी होते अभिजात भाषा दर्जा मिळाल्याने आपले दायित्व भाषेप्रती कार्य करण्याचे वाढले हे आपण पार पाडणे आवश्यक असे मत व्यक्त केले. यावेळी गणेश शेडंगे ग्रंथमित्र , प्रा शशिकांत पसारकर समाजभूषण, सुनिल कठंक आदर्श शिक्षक, व दत्तात्रय तांबारे व मुकुंद देशमुख याना सेवानिवृत्तीनिमित्त शुभेच्छा मान्यवरांच्या सत्कार करण्यात आला पुरस्कार प्राप्त शिक्षक प्राध्यापक यांचा सत्कार मान्यवरांच्या हस्ते संपन्न. या समारंभाच्या अध्यक्ष पदी हेमंत धिंग मुजुमदार महामंत्री अखिल भारतीय इतिहास संकलन योजना दिल्ली, नंदकिशोर झरीकर वाचनालयाचे कार्यवाह ,यानी प्रास्ताविक केले डॉ राधाकृष्ण जोशी क्षेत्रिय प्रांत संघटन मंत्री अखिल भारतीय इतिहास संकलन योजना दिल्ली रविंद्र देशमुख पदाधिकारी व वाचक सभासद प्रा राजेंद्र सरवदे प्रा गणपत गट्टी मुकुंद कुलकर्णी गणेश गिराम प्रा सुहास जोशी व अन्य सभासद समारंभास मोठ्या संख्येने उपस्थित होते समारंभाचे सुत्रसंचलन श्रीकृष्ण जोशी व आभार प्रदर्शन प्रमोद कुलकर्णी यानी केले ग्रंथपाल रमाकांत शेरकर ,सुरेश जाडे यानी समारंभाच्या यशस्वितेसाठी प्रयत्न घेतली.

# बीडची जागा शिवसेनेचीच

### मुख्यमंत्री शिंदे साहेब बाळासाहेबांच्या एकनिष्ठ शिवसैनिकावर अन्याय करणार नाहीत- सुनिल अनभुले

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.२३ ऑक्टोबर**



शिवसेनेचा बालेकिल्ला म्हणून बीडची ओळख सर्वश्रुत आहे. एकदा नव्हे तब्बल तीन वेळा शिवसेनेचा आमदार बीडकरांनी निवडणुन दिला आहे. वर्षानुवर्षे बीड मतदार संघाची जागा शिवसेनेला सुटत आली आहे आणि ती यावेळेसही शिवसेनेलाच सुटणार आहे. तीन दशकांपेक्षा अधिक काळ मा. अनिलदादा जगताप हे बाळासाहेबांच्या विचारधारनेला प्रेरित होऊन संपूर्ण जिल्ह्याभरात शिवसेना पक्ष बांधणी करत आले आहेत. बीडला शिवसेनेचा बालेकिल्ला बनविण्यात अनिलदादांचे योगदान मोलाचे आहे आणि हे बीडकर देखील चांगलेच जाणून आहेत. आजवर शिवसेना आणि बाळासाहेब यांच्या विचार व धोरनावर ठाम राहणाऱ्या अनिलदादा जगताप यांच्या कार्याचे आणि योगदानाची सर्वोपरी माहिती तळागाळातील माणसांची जाण असणारे महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री तथा शिवसेना मुख्य नेते मा. एकनाथजी शिंदे साहेब यांना आहे. यामुळे मुख्यमंत्री शिंदे साहेब हे बाळासाहेबांचे निष्ठावंत शिवसैनिक असणाऱ्या मा. अनिलदादा जगताप यांच्यावर अन्याय होऊ न देता अनिलदादांना न्याय देणार असा आम्हा शिवसैनिकांना पूर्णतः विश्वास असल्याचे बीड विधानसभा प्रमुख सुनिल अनभुले यांनी माध्यमांना पत्रक प्रसिद्ध करून आपले मत व्यक्त केले आहे. मुख्यमंत्री शिंदे साहेबांनी बीडची जागा शिवसेनेलाच सुटणार आहे व त्यासाठी कामाला लागा असे सांगितले देखील आहे आणि आम्ही देखील सर्व शिवसैनिक अनिलदादा जगताप यांना विक्रमी मतांनी निवडून आणण्यासाठी कामाला लागलो आहोत. अनिलदादा जगताप यांचा यंदाच्या विधानसभा निवडणुकीत विजय पक्का आहे व ते विक्रमी मतांनी निवडून येणार यात तिळमात्र शंका नाही असे बीड विधानसभा प्रमुख सुनिल अनभुले यांनी पत्रकात म्हंटले आहे.

सोलापूर तरुण भारत
www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

# पोलिस उपमहानिरीक्षकांचे पथक, गुन्हे शाखेने प्रतिबंधीत गुटखा पकडला

## आरोपीसह ६ लाख ८१ हजारांचा मुद्देमाल केला जप्त



**तभा वृत्तसेवा**
**वसमत २३ आक्टोबर**

नागरिकांच्या आरोग्यास धोकादायक असलेल्या गुटका तंबाखू व तंबाखूजन्य पदार्थांची साठवणूक, विक्री व वाहतूक करण्यावर शासनाने प्रतिबंध केला असून देखील काही इसम छुप्या मार्गाने तंबाखू व तंबाखूजन्य पदार्थांची साठवणूक, विक्री व वाहतूक करण्याचा प्रयत्न करतात. अशा आरोपींविरुद्ध विशेष मोहीम राबवून कडक कायदेशीर कारवाई करण्याचे आदेश पोलीस उपमहानिरीक्षक शहाजी उमाप यांनी दिले आहेत. त्या अनुषंगाने उपमहानिरीक्षकांचे पथक व स्थानिक गुन्हे शाखा, पथकाने महाराष्ट्र शासनाकडून प्रतिबंधित असलेला वेगवेगळ्या कंपनीचा गुटखा ज्याची किंमत ६८१००० रुपयांचा गुटखा भीमाशंकर विठ्ठलराव तुकरी यांच्या राहत्या घरून जप्त केला आहे.

पोलीस सूत्राकडून मिळाली माहितीनुसार अवैध धंद्याची माहिती काढत असताना दिनांक २२ आक्टोबर रोजी उपमहानिरीक्षक नांदेड यांचे पथक व स्थानिक गुन्हे शाखेच्या पोलीस पथकास खात्रीशीर माहिती मिळाली की, पोलीस ठाणे वसमत शहर हद्दीमध्ये श्रीनगर येथील भीमाशंकर तुपकरी याच्या घरामध्ये महाराष्ट्र शासनाने प्रतिबंधित केलेले अन्नपदार्थ तंबाखूजन्य पदार्थाची अवैध विक्री व्यवसाय करण्यासाठी साठवणूक करण्यात आली आहे. अशी खात्रीशीर माहिती मिळाल्याने सदर माहितीची शहानिशा करून नांदेडचे विशेष पथक व स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने घरावर छापा मारला. तिथे महाराष्ट्र शासनाने बंदी घातलेले वेगवेगळे कंपनीचे महाराष्ट्र राज्य मध्ये विक्रीसाठी प्रतिबंधित असलेले गुटका व सुगंधी पान मसाला असा एकूण ६ लाख ८१ हजार रुपयांच्या प्रतिबंधित गुटखा व सुगंधी पान मसाला मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

सतीश माणिकराव ठेंगे यांचे फिर्यादीवरून भीमाशंकर विठ्ठलराव तुपकरी राहणार श्रीनगर याच्या विरुद्ध गु र न व कलम ०६१२/२४ कलम १२३,२७४,२७५,२२३, भान्यसा २०२३. व सह कलम २६(२)(१).२(२)(ीं).२७(२)(श).३०(२)(अ) ५९ अन्नसुरक्षा व मानके कायदा अंतर्गत २००६ भीमाशंकर विठ्ठलराव तुपकरी याच्या विरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सदरची कारवाईत पोलीस महानिरीक्षक शहाजी उमाप यांचे आदेशानुसार पोलीस अधीक्षक कोकाटे यांच्या मार्गदर्शनाखाली आईजीचे पथक व गुन्हे शाखा हिंगोली पथकाचे पोलीस उपनिरीक्षक युवराज गवळी, टापरे प्यारवाले, शेख आजम, महाडे, घोडके, बारवकर,वाघ, पडवाळ यांनी केली आहे.

# माजी खा. शिवाजीराव माने यांचा महाराष्ट्र स्वराज्य पक्षात प्रवेश

## हिंगोली विधानसभा लढविण्याची शक्यता

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, २३ आक्टोबर**



भाजपचे माजी खासदार अ‍ॅड शिवाजीराव माने यांनी भाजपला सोडचिठ्ठी देत बुधवार दि २३ आक्टोबर रोजी पुणे येथे महाराष्ट्र स्वराज्य पक्षात प्रवेश केला आहे. जिल्ह्यातील बंधाऱ्यांच्या प्रश्नावर विधानसभेत पोहोचविण्यासाठी आपण पक्ष प्रवेश केल्याचे त्यांनी बोलतांना सांगितले आहे.

हिंगोली लोकसभेचे माजी खासदार अ‍ॅड शिवाजीराव माने हे शिवसेनेच्या तिकीटावर दोनवेळा लोकसभेत पोहोचले होते. मात्र त्यानंतर त्यांना उमेदवारी न मिळाल्याने त्यांनी राष्ट्रवादीत प्रवेश केला. त्यानंतर त्यांनी काँग्रेसमध्ये प्रवेश केला. जिल्हाध्यक्षपदाची धुरा त्यांनी काँग्रेसमध्ये सांभाळली होती. परंतु अंतर्गत गटबाजीमुळे त्यांनी काँग्रेसला सोडचिठ्ठी देत मनसे त्यानंतर भाजपमध्ये प्रवेश केला. भाजपमध्ये प्रवेश केल्यानंतर त्यांनी हिंगोली जिल्ह्याच्या सिंचनाच्या प्रश्नावर आंदोलने केली. सापळी धरण रद्द करावे यासह इतर मागण्यांसाठी त्यांनी सिंचन संघर्ष समितीच्या माध्यमातून आवाज उठवला होता.

हिंगोली जिल्ह्याची वाहीनी असलेल्या कयाधू नदीवर बंधारे बांधून सिंचनासाठी पाणी उपलब्ध करून द्यावे अशी मागणी त्यांनी मागील अनेक वर्षापासून लावून धरली आहे. यासाठी तत्कालीन राज्यपालासह मुख्यमंत्री, मंत्री यांच्या गाठीभेटी घेतल्या. शिवसेना नेते उध्दव ठाकरे मुख्यमंत्री असतांनाही त्यांनी बंधाऱ्यांचा प्रश्न मांडला होता. त्यावेळी त्यांना बंधाऱ्यांचे प्रश्न सोडविण्याचे आश्वासन दिले होते. मात्र प्रत्यक्षात कुठलाही ठोस निर्णय झाला नाही. सध्याच्या महायुती सरकारच्या काळातही त्यांनी हाच प्रश्न मांडला होता मात्र या सरकारनेही त्यांना केवळ आश्वासनेच दिली. जिल्ह्यातील सिंचनाच्या प्रश्नावर वेळोवेळी आश्वासनेच दिली जात असल्यामुळे ते मागील काही दिवसांपासून नाराज होते. दि २३ आक्टोबर रोजी पुणे येथे छत्रपती संभाजी राजे यांच्या उपस्थितीत त्यांनी महाराष्ट्र स्वराज्य पक्षात प्रवेश घेतला आहे. यावेळी त्यांचा छत्रपती संभाजी राजे यांचेहस्ते सत्कार करण्यात आला.

यावेळी बोलतांना माने म्हणाले की, जिल्ह्यातील बंधाऱ्यांच्या प्रश्नावर ठाकरे सरकार तसेच शिंदे सरकारने आश्वासनाशिवाय काहीच दिले नाही. कयाधू नदीचे पाणी ईसापूर धरणामध्ये वळवून नांदेडकडे नेले जात आहे मात्र या प्रश्नावर एकही लोकप्रतिनिधी बोलण्यास तयार नाही. त्यामुळेच आपण विधानसभेत जाऊन हा प्रश्न मांडण्याचा निर्णय घेतला आहे. महाराष्ट्र स्वराज्य पक्षाचे छत्रपती संभाजी राजे यांना राज्यात परिवर्तन करायचे असून त्यांच्या परिवर्तनाला साथ देण्यासाठी आपण या पक्षात प्रवेश घेतला आहे. हिंगोली किंवा कळमनुरी विधानसभा लढविणार असल्याचेही ते म्हणाले.

# शालेय विद्यार्थ्यांकडून मतदान करण्याचा पालकांना आग्रह



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, २३ आक्टोबर**

जिल्ह्यात २० नोव्हेंबर रोजी होणाऱ्या विधानसभा सार्वत्रिक निवडणुकीत मतदानाचा टक्का वाढविण्यासाठी स्वीप समितीमार्फत शाळांमध्ये विद्यार्थ्यांकडून संकल्प पत्र भरून घेण्यात येत आहे. या संकल्प पत्रातून विद्यार्थी आपल्या पालकांना मतदान करण्याबाबत आग्रह करणार आहेत. आपल्या पालकांकडून मतदान करण्याचा संकल्प करून घेणार आहेत. यासाठी विद्यार्थ्यांना संकल्पपत्र वितरित करण्यात आले आहेत. २६ ऑक्टोबरपर्यंत हे संकल्प पत्र विद्यार्थी आपल्या शाळेमध्ये जमा करून देणार आहेत.

पालक संकल्प पत्र वाचून त्यावर स्वाक्षरी करणारा आणि मतदान करण्याचा संकल्प करणार आहेत. यावेळी मोठ्या प्रमाणात मतदारांनी मतदान करून लोकशाहीला अधिक भक्कम करण्यासाठी आपले योगदान द्यावे, यासाठी स्वीप समितीमार्फत मतदार जनजागृतीसाठी अनेक उपक्रम राबविले जात आहेत.

निवडणुकीच्या संदर्भाने यावेळी बहुसंख्य मतदारांनी आपला मतदानाचा हक्क बजावावा, मतदारांमध्ये आपल्या मतदानाबाबत जागरूकता निर्माण होऊन जिल्हाभरात मतदानाची एकूण टक्केवारी वाढावी, यासाठी जिल्हा स्विप समिती तसेच वसमत, कळमनुरी आणि हिंगोली विधानसभा स्तरावरील स्विप समिती वेगवेगळे उपक्रम राबवून मोठ्या प्रमाणावर मतदारांमध्ये जागृती निर्माण करत आहे. जिल्हाभरातून विधानसभानिहाय सर्वात जास्त संकल्पपत्र भरून देणाऱ्या पहिल्या तीन केंद्रप्रमुखांचा जिल्हाधिकारी यांच्या स्वाक्षरीच्या प्रमाणपत्राने गौरव देखील करणार आहेत. यामुळे अधिक संकल्पपत्र भरून देण्यासाठी केंद्रनिहाय चुरस निर्माण झाली आहे. जिल्ह्यात वेगवेगळे उपक्रम राबवून प्रत्येक मतदाराला मतदानाचे महत्त्व पटवून देण्यासाठी स्वीप समिती प्रयत्नशील आहे.

यापुढील काळात मतदार जनजागृतीसाठी चुनाव पाठशाला, आशा ताई, बालवाडी अंगणवाडी ताई, महिलाबचत गट, बीएलओ इत्यादीमार्फत प्रत्येक मतदारांच्या घरी जाऊन मतदान करण्याचे आवाहन करण्यासाठी गृहभेटीचे आयोजन करण्यात येणार आहे, असे जिल्हा स्वीप नोडल अधिकारी प्रशांत डिग्रसकर व संदीपकुमार सोनटक्के यांनी कळविले आहे.



हिंगोली- पोलिस विभागाच्यावतीने पोलिस अधीक्षक श्रीकृष्ण कोकाटे यांच्या मार्गदर्शनाखाली एकाच वेळी संपूर्ण जिल्ह्यात विशेष कोंम्बीग ऑपरेशन राबविण्यात आले. यावेळी पथकांनी विविध ठिकाणी छापे मारून रेकॉर्डवरी सराईत गुन्हेगारांची तपासणी करीत काहीजणांना ताब्यात घेतले. छाया- विजय गुंडेकर

# आ. संतोष बांगर यांना कळमनुरी विधानसभेतून उमेदवारी जाहीर

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, २३ आक्टोबर**

शिंदे शिवसेनेच्या पहिल्याच यादीत कळमनुरी विधानसभा मतदारसंघातून आ. संतोष बांगर यांची उमेदवारी जाहीर झाली आहे. दि २४ आक्टोबर रोजी संतोष बांगर हे शक्तीप्रदर्शन करीत उमेदवारी अर्ज दाखल करणार असून त्यासाठी जोरदार तयारी देखील करण्यात येत आहे. उबाठा शिवसेनेकडून कोणाला उमेदवारी जाहीर होते याकडे आता मतदारांचे लक्ष लागले आहे.

कळमनुरी मतदारसंघात विद्यमान आ. संतोष बांगर यांना शिवसेनेने उमेदवारी घोषित केली आहे. मागील दोन ते तीन महिन्यांपासूनच आ. बांगर यांनी प्रचाराला सुरूवात केली आहे. दोन दिवसांपूर्वी झालेल्या कार्यक्रमात त्यांनी दि २४ आक्टोबरला उमेदवारी अर्ज दाखल करणार असल्याची घोषणाही केली होती. दि २२ आक्टोबर रोजी रात्री शिंदे शिवसेनेची यादी जाहीर करण्यात आली. पहिल्याच यादीत आ. संतोष बांगर यांचे नाव आल्यामुळे त्यांच्या समर्थकांनी जल्लोष साजरा करीत त्यांचे अभिनंदन केले.

दुसरीकडे या विधानसभा मतदारसंघात वंचीतने त्यांचा उमेदवार दिलीप मस्के यांची घोषणा केली आहे. मात्र उबाठा शिवसेनेकडून अजूनही उमेदवारीच घोषणा करण्यात आली नाही. उबाठा शिवसेनेकडून माजी आ. डॉ संतोष टारफे, जिल्हाप्रमुख गोपू उर्फ अजय सावंत, बाळासाहेब मगर, अजित मगर आदीं विधानसभा लढविण्यासाठी इच्छुक आहेत. उमेदवारी कोणालाही मिळाली तरी एकजुटीने उमेदवाराच्या पाठीशी भक्कमपणे उभा राहून निवडणुक लढविणार असल्याचे इच्छुक उमेदवारांनी सांगितले आहे. या विधानसभा मतदारसंघात यावेळी तिरंगी लढत होणार असल्याचे चित्र दिसत आहे. काँग्रेसच्या आ. डॉ प्रज्ञा सातव यांची निवडणुकीत महत्वाची भूमिका असणार आहे.

वसमत विधानसभा मतदारसंघातून अजित पवार गटाचे विद्यमान आ. राजू उर्फ चंद्रकांत नवघरे यांना पुन्हा एकदा राष्ट्रवादीने उमेदवारी जाहीर केली असून याठिकाणी राष्ट्रवादी शरद पवार गटाकडून माजी मंत्री जयप्रकाश दांडेगावकर यांना उमेदवारी मिळण्याची शक्यता वर्तवली जात असून या मतदारसंघात गुरू विरूध्द शिष्य असा सामना रंगणार असल्यामुळे वसमत विधानसभा मतदारसंघात दुहेरी लढतीची शक्यता वर्तवली जात आहे.

## संक्षिप्त वृत्त

### हिंगोली व परिसरात भूकंपाचे सौम्य धक्के

हिंगोली- जिल्ह्यातील वसमत तालुक्यात काही गावात आज मंगळवार, (दि.२२) रोजी सकाळी ६:५२ वाजेदरम्यान भूकंपाचा सौम्य धक्का जाणवला असल्याची माहिती राष्ट्रीय भूकंप विज्ञान केंद्र, पृथ्वी विज्ञान मंत्रालय (खचऊ), नवी दिल्ली यांच्या संकेतस्थळावरून जिल्हा आपत्कालीन कार्य केंद्रास प्राप्त झाली आहे. राष्ट्रीय भूकंप विज्ञान केंद्र, पृथ्वी विज्ञान मंत्रालय, नवी दिल्ली यांच्या संकेतस्थळावरून घेतलेल्या माहितीनुसार या भूकंपाचा केंद्रबिंदू नांदेड जिल्ह्यातील सावरगाव येथील असून, भूकंपाची तीव्रता रिश्टर स्केलवर ३.८ अशी नोंदविण्यात आली आहे. या नैसर्गिक आपत्तीसंदर्भात सर्व संबंधित यंत्रणांनी खबरदारी घ्यावी. नागरिकांनी घाबरुन जाऊ नये, मात्र सतर्क राहावे, असे आवाहन जिल्हाधिकारी अभिनव गोयल यांनी केले आहे. तसेच भूकंप होण्याआधी, दरम्यान व भूकंप झाल्यानंतर नागरिकांनी खालीलप्रमाणे काळजी घ्यावी, असे आवाहनही करण्यात आले आहे.

### खर्च निवडणुक निरीक्षक अर्जुन प्रधान यांची नियुक्ती

हिंगोली- भारत निवडणूक आयोगाने हिंगोली जिल्ह्यातील ९२-वसमत, ९३-कळमनुरी व ९४-हिंगोली विधानसभा मतदारसंघाच्या सार्वत्रिक निवडणुकीसाठी अर्जुन प्रधान यांची निवडणूक खर्च निरीक्षक म्हणून नियुक्ती केली आहे. अर्जुन प्रधान हे २०१४ च्या आयआरएस बॅचचे अधिकारी असून, ९९००८४५९९० हा त्यांचा संपर्क क्रमांक आहे. गुजरात केडरचे अधिकारी असलेले अर्जुन प्रधान हे हिंगोली, वसमत आणि कळमनुरी विधानसभा मतदारसंघाच्या निवडणूक खर्चविषयक बाबी पाहणार आहेत. विधानसभा सार्वत्रिक निवडणुकीच्या निरीक्षणासाठी आलेले निवडणूक निरीक्षक अर्जुन प्रधान यांना कोणत्याही राजकीय पक्षांची, उमेदवारांची, नागरिकांची किंवा मतदाराची तक्रार असल्यास त्यांच्याशी मोबाईल क्रमांकावर संपर्क साधता येईल, असे निवडणूक विभागाकडून प्राप्त प्रसिद्धीपत्रकाद्वारे कळविले आहे.

### आयोध्या पौळ यांच्यावर औंढ्यात गुन्हा दाखल

औंढा नागनाथ- तालुक्यातील हिवरा जाटू येथील रहिवासी अंकुश शामराव शिंदे वय ६५ वर्ष सेवानिवृत्त शिक्षक यांनी दिनांक २२ आक्टोबर रोजी औंढा पोलीस स्टेशनला तोंडी फिर्याद देऊन असे सांगितले की अयोध्या पौळ यांनी ९४२३४५२०७५, ७४९९६५ ४८०७ मोबाईल क्रमांक धारक असलेल्या व्यक्तींनी दिनांक २१ आक्टोबर रोजी साडेआठ वाजेच्या सुमारास मराठा समाज जिल्हा हिंगोली या व्हाट्सअप ग्रुप वर व २२ आक्टोबर रोजी अयोध्या पौळ यांच्या फेसबुक अकाउंटवरुन फिर्यादीचा एक व्हिडिओ सोशल मीडियाद्वारे व्हायरल करून त्याबद्दल खोट्या स्वरूपाचा मजकूर छापून फिर्यादीची जनमानसात बदनामी केली असल्याची फिर्याद औंढा पोलीस स्टेशनला देण्यात आली असून औंढा पोलीस स्टेशनला सदर प्रकरणी विविध कलमान्वये गुन्हा दाखल करण्यात आला असून सदर प्रकरणी पुढील तपास रवीकांत हरकाळ हे करीत असल्याचे समजते

# मतदानासाठी १२ ओळखीचे पुरावे ग्राह्य

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, २३ आक्टोबर**

येत्या विधानसभा सार्वत्रिक निवडणुकीमध्ये दि. २० नोव्हेंबर रोजी मतदान करण्यासाठी भारत निवडणूक आयोगाने ईपीक म्हणजेच मतदार फोटो ओळखपत्र आणि इतर १२ ओळखीचे पुरावे ग्राह्य धरले आहेत. यापैकी कोणताही एक ओळखीचा पुरावा मतदार केंद्रावरील अधिकाऱ्यांना दाखविल्यानंतर मतदारांना मतदान करता येणार आहे.

भारत निवडणूक आयोगाच्या आदेशान्वये विधानसभा सार्वत्रिक निवडणूक २०२४ करीता छायाचित्रासह मतदार ओळखपत्र म्हणजेच ईपीक देण्यात आले आहे. ते मतदार मतदान केंद्रावर त्यांची ओळख पटविण्यासाठी छायाचित्रासह मतदार ओळखपत्र सादर करतील. परंतु मतदारांकडे छायाचित्रासह मतदार ओळखपत्र नसल्यास अशा मतदारांना त्यांची ओळख पटविण्यासाठी मतदार ओळखपत्राच्या व्यतिरिक्त इतर १२ पुराव्यापैकी कोणताही एक पुरावा ग्राह्य धरण्यात येणार आहेत.

मतदारांना मतदानाचा हक्क बजावता यावा, यासाठी स्वत:ची ओळख पटविण्यासाठी पुराव्यांमध्ये आधारकार्ड, मनरेगा जॉब कार्ड, बँक किंवा पोस्ट ऑफिसने जारी केलेले छायाचित्र असलेले पासबुक, कामगार मंत्रालयाच्या योजनेंतर्गत जारी केलेले आरोग्य विमा स्मार्ट कार्ड, वाहन चालक परवाना, पॅन कार्ड, रजिस्टार जनरल ऑफ इंडिया यांच्याद्वारा नॅशनल पॉप्युलेशन रजिस्टर अंतर्गत निर्गमित स्मार्ट कार्ड, भारतीय पासपोर्ट, छायाचित्रासह पेन्शन दस्तऐवज, केंद्र, राज्य सरकार, सार्वजनिक उपक्रम, पब्लिक लिमिटेड कंपनी यांनी कर्मचाऱ्यांना जारी केलेले सेवा ओळखपत्र, खासदार, आमदारांना जारी करण्यात आलेले अधिकृत ओळखपत्र, भारत सरकारच्या सामाजिक न्याय व सशक्तीकरण मंत्रालयाने जारी केलेले विशेष विकलांगता प्रमाणपत्र असे १२ कागदपत्रे पुरावा म्हणून ग्राह्य धरण्यात येणार आहेत.

मतदारांनाछायाचित्रासहमतदार ओळखपत्रदेण्यातआलेले आहेत, तेमतदान केंद्रावर त्यांची ओळख पटविण्यासाठी छायाचित्रासह मतदारओळखपत्रसादरकरतील. ईपीकसादरकरणेशक्य नसल्यास इतर १२ प्रकारच्या ओळखपत्रापैकी कोणत्याही एक ओळखपत्राचा उपयोग करून मतदानाचा हक्क बजावावा, असे आवाहन जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी अभिनव गोयल यांनी केले आहे.

# निवडणुक निर्णय अधिकारी विकास माने यांच्याकडून विविध पथकांचा आढावा




**तभा वृत्तसेवा**
**वसमत, २३ आक्टोबर**

वसमत विधानसभा मतदारसंघाचे निवडणूक निर्णय अधिकारी विकास माने यांनी विविध पथक प्रमुखांची ९२-वसमत विधानसभा निवडणूक पूर्वतयारीबाबत आढावा बैठक घेत विविध सूचना दिल्या.

सर्वप्रथम निवडणुकीसाठी तयार करण्यात आलेले व्हीएसटी आणि व्हीव्हीटी व व्हिडीओग्राफरची विधानसभा निवडणुकीच्या अनुषंगाने बैठक घेण्यात आली. या बैठकीला पथकातील अधिकारी व कर्मचारी तसेच व्हिडीओग्राफर हे उपस्थित होते. व्हीव्हीटी पथकाने नेमून दिलेल्या कार्यक्षेत्रात प्रत्यक दिवशी सभा, रॅली, इत्यादी बाबतचे चित्रीकरण करण्यात आलेल्या व्हीडीओची पाहणी करावी.

व्हीएसटी पथकातील नोडल अधिकारी यांनी राजकीय पक्षाची सभा असलेल्या ठिकाणी वापरलेल्या साहित्याचे चित्रीकरण करताना नोडल अधिकाऱ्यांनी मंडप, खुर्ची, सतरंजी, स्टेज, लाउडस्पीकर याबाबत सविस्तर माहिती देण्याचे निवडणूक निर्णय अधिकारी श्री. माने यांनी सांगितले. आजपासून उमेदवारी अर्ज भरणे सुरू झाले असून, या सर्व प्रक्रियेचे छायाचित्रण करावे. सोबतच सर्वांनी निवडणूक विभागाकडून आपले ओळखपत्र तयार करून स्वत:कडे ठेवण्याच्या सूचना दिल्या. उमेदवाराने उमेदवारी अर्ज भरल्याची माहिती या पथकास देण्यात येईल. त्याप्रमाणे त्यांनी संबंधित उमेदवार एखादी प्रचार सभा किवा कॉर्नर सभा घेत असल्यास त्यांनी त्यासाठी अधिकृत परवानगी घेतल्याबाबत चौकशी अहवाल पथकप्रमुखांकडे सादर करण्याचे निर्देश दिले.

मतदानाच्या दिवशी मतदान केंद्रावरील सर्व छायाचित्रण करावे. मतदान केंद्रांच्या १०० मीटर परिसरातील नियमांचे उल्लंघन केल्यास तसेच उमेदवारी अर्ज मागे घेण्यासाठी आल्यास त्याचे चित्रीकरण करावे तसेच मतदान यंत्र सील करतेवेळी चित्रिकरण करावे. खर्च नियंत्रण कक्षाने उमेदवाराने केलेल्या खर्चाच्या बाबी तपासून केलेल्या खर्चाची तपासणी करावी. तसेच संबंधित उमेदवारास योग्य सूचना देण्याबाबत त्यांनी सांगितले.

# दुसऱ्या दिवशी जिल्ह्यात १२३ अर्जांची विक्री

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, २३ आक्टोबर**

महाराष्ट्र विधानसभा सार्वत्रिक निवडणूक २०२४ मध्ये आज हिंगोली जिल्ह्यात ५६ इच्छुकांनी १२३ अर्जांची उचल केली आहे. तर वसमत विधानसभा मतदारसंघात जगन्नाथ लिंबाजी अडकिने यांनी नामनिर्देशनपत्र दाखल केले आहे. मंगळवार (दि.२२) पासून राज्यात निवडणुकीची अधिसूचना प्रसिद्ध झाली असून, नामनिर्देशन पत्र विक्री व दाखल करण्याची प्रक्रियाही सुरू झाली आहे. मंगळवारी पहिल्या दिवशी १५३ अर्जांची विक्री झाली. तर आज दुसऱ्या दिवशी ५६ इच्छुकांकडून १२३ अशा दोन दिवसात जिल्ह्यात २७६ अर्जांची विक्री झाली आहे. मंगळवार, दि. २९ ऑक्टोबर २०२४ पर्यंत उमेदवारांना नामनिर्देशनपत्र दाखल करता येणार असल्याचे जिल्हा निवडणूक अधिकारी तथा जिल्हाधिकारी अभिनव गोयल यांनी सांगितले आहे.

यावेळी निवडणूक निर्णय अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी विकास माने, निवडणूक निर्णय अधिकारी तथा उपविभागीय आधिकारी प्रतिक्षा भुते, निवडणूक निर्णय अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी समाधान घुटुकडे तसेच संबंधितविधानसभा मतदार संघाचे सहायक निवडणूक निर्णय अधिकारी तथा तहसीलदार यांच्यासह निवडणूक कामी नियुक्त अधिकारी-कर्मचारीउपस्थित होते.

# अवैध दारु विक्रीवर पोलिस व उत्पादन शुल्क करणार संयुक्त कारवाई

**तभा वृत्तसेवा**
**नांदेड,दि. २३ ऑक्टोबर**

अवैध दारु समूळ उच्चाटनासाठी पोलीस आणि उत्पादन शुल्क विभागाच्या मार्फत निवडणुकीच्या काळात संयुक्त कारवाई केली जाणार असून, याबाबतची एक बैठक काल सायंकाळी पार पडली.

अवैध दारुचे समूळ उच्चाटन करण्यासाठी आता पोलीस दल आणि राज्य उत्पादन शुल्क विभाग संयुक्तपणे कारवाई करणार आहे. यासंदर्भात काल सायंकाळी पोलीस उपमहानिरीक्षक कार्यालयात विशेष बैठक पार पडली. यामध्ये पोलीस उपमहानिरीक्षक शहाजी उमाप आणि राज्य उत्पादन शुल्क विभागाचे डॉ.विजय सूर्यवंशी यांची प्रमुख उपस्थिती होती.



अवैधरित्या उत्पादीत केली जाणारी गावठी दारु त्याचप्रमाणे बनावट दारु, दुसऱ्या राज्यातून कर बुडवून येणाऱ्या देशी व विदेशी दारुविरुध्द पोलीस विभाग आणि राज्य उत्पादन शुल्क विभाग संयुक्तपणे कारवाई करणार आहे. पोलीस उपमहानिरीक्षक शहाजी उमाप यांनी दिलेल्या माहितीनुसार मागील दोन महिन्यात गावठी दारुचे उत्पन्न रोखण्यासाठी संयुक्त कारवाया करण्यात आल्या. त्यातंर्गत १ हजार ३४ खटले दाखल करण्यात आले. यात ५९ लाख ६९ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे. राज्य उत्पादन शुल्क विभागाने तेलंगणा आणि कर्नाटक राज्याच्या सिमेवर चार संयुक्त तपासणी नाके उभारले आहेत. या नाक्यावर परराज्यातून अवैधपणे व कर बुडवून दारु रोखली जाईल. राज्यात विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर निवडणूक प्रक्रिया प्रलोभविरहीत होण्याकरिता हातभट्टी गाळप करणारे ठिकाणे, बनावट दारु बनविणारे अड्डे आणि परराज्यातून कर बुडवून महाराष्ट्रात दारु आणणारे माफिया यांचा शोध घेवून संयुक्तपणे कारवाई केली जाईल, असे राज्य उत्पादन शुल्क विभागाचे आयुक्त डॉ.विजय सूर्यवंशी यांनी सांगितले. या बैठकीस राज्य उत्पादन शुल्क विभागाचे सहआयुक्त प्रसाद सुर्वे, अधीक्षक गणेश पाटील, केशव राऊत, आदित्य पवार आणि नांदेड पोलीस परिक्षेत्राच्या चार जिल्ह्यातील पोलीस निरीक्षकांची उपस्थिती होती.

# नांदेड उत्तर मतदारसंघात आमदार बालाजी कल्याणकरांना पुन्हा उमेदवारी


**तभा वृत्तसेवा**
**नांदेड,दि. २३ ऑक्टोबर**

मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी आपल्या शिवसेनेच्या पहिल्या उमेदवारांची यादी जाहीर करण्यात आली आहे. यात नांदेड उत्तर विधानसभा मतदारसंघातून विद्यमान आमदार बालाजीराव कल्याणकर यांना दुसऱ्यांदा संधी देण्यात आली आहे. विधानसभा निवडणुकीसाठी महायुतीचा महत्त्वाचा घटक पक्ष असलेल्या मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेच्या उमेदवारांची पहिली यादी मंगळवारी रात्री उशिरा जाहीर करण्यात आली. ४५ उमेदवारांच्या यादीमध्ये नांदेड जिल्ह्यातील नांदेड उत्तर विधानसभा मतदारसंघाचा समावेश आहे. नांदेड उत्तर विधानसभा मतदारसंघातून विद्यमान आमदार बालाजी कल्याणकर यांना पुन्हा एकदा निवडणुकीच्या रिंगणात उतरवण्यात आले आहे. शिवसेनेकडून



आमदार कल्याणकर यांना उमेदवारी देण्यात आली मात्र महाविकास आघाडीचा उमेदवार अद्यापही ठरला नाही. त्यामुळे आ. बालाजीराव कल्याणकर यांना टक्कर देण्यासाठी महाविकास आघाडी निवडणुकीच्या रिंगणात कोणाला उतरवते हे अद्यापही निश्चित झालेलं नाही.

## संक्षिप्त वृत्त



### विजय रणखांब यांना राज्यस्तरीय समाजभूषण पुरस्काराबदल कलंबर शाखेतर्फे सत्कार

**नांदेड**-बहुजन शक्ती सेनेचे संस्थापक अध्यक्ष तथा लसाकमचे नांदेड जिल्हाध्यक्ष, शासनाचे व ईतर विवीध पुरस्कार प्राप्त, कामगार नेते विजय रणखांब यांना राज्यस्तरीय समाजभूषण पुरस्कार मिळाल्याबद्दल त्यांचे महावितरण कलंबर शाखा कर्मचारी बांधवांचे वतीने दि.२३.१०.२०२४ रोजी शाल व पुष्पहार घालून सत्कार करण्यात आला. समाजकार्यात पूर्णवेळ देणारे तथा कामगार संघटना व विविध संघटनेमध्ये कार्य करणारे सामाजिक कार्यकर्ते विजय रणखांब सर यांचे कार्य महान असून ते शोषित पीडित वंचितांना न्याय मिळवून देण्यासाठी प्रयत्न करतात. अशा महान कार्यासाठी त्यांना राज्य स्तरीय समाज भूषण पुरस्कार मिळाला असल्याचे मनोगत महावितरणचे दिनेश मेहर यांनी व्यक्त केले आहे. कामगार नेते विजय रणखांब यांना शासनाचे व विविध सामाजिक पुरस्कार मिळालेले असून त्यांना हा राज्यस्तरीय समाज भूषण मिळालेला पुरस्कार हा सर्व कामगारांसाठी सर्वांसाठी न्याय देणारा असून त्यांच्या कामाची पोचपावती आहे असे मत महावितरणचे विलास टोकलवाड यांनी व्यक्त केले आहे. मला मिळालेल्या राज्य स्तरीय समाज भूषण पुरस्काराबद्दल आपण सत्कार केला त्याबद्दल आपले सर्वांचे खूप खूप मनापासून आभार श्री विजय रणखांब सर यांनी व्यक्त केले. यावेळी विलास टोकलवाड ,चंद्रकांत भालेराव, दिलीप मरडे अमोल बोधनकर, राजेश डांगे, बालाजी गीते इमरोज शेख, सलमान, साई गीते, नरेंद्र ताटे, लाला मामा व सर्व मित्र उपस्थित होते.

### किनवट येथे भव्य रॅली काढून माकप उमेदवार कॉ.अर्जुन आडे यांचा अर्ज दाखल

**माहूर**-किनवट विधानसभा मतदार संघात मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाचे अधिकृत उमेदवार अर्जुन आडे यांचा उमेदवारी अर्ज दि.२३ ऑक्टोबर रोजी सहाय्यक निवडणूक अधिकारी मेघना कावली यांच्याकडे दाखल केला. किनवट मतदारसंघात आधी प्रथम विद्यमान भाजपाचे आ.भीमराव



केराम दुसरे राष्ट्रवादी चे माजी आमदार प्रदीप नाईक या दोघांनंतर तिसरा कोण? अशी राजकीय वर्तुळात प्रचंड यावेळी तीसरा प्रथम जाहीर झाला आणि तो म्हणजे वंचित बहुजन आघाडी चे प्रा.विजय खुपसे तर केलाय व नाईक यांना उमेदवारी देण्यात आल्यानंतर आता चौथ्या माकपच्या अर्जुन आडे यांनी रणांगणात उडी घेत आज उमेदवारी अर्ज दाखल करुन आधी सरळसरळ महायुतीचे केराम विरुद्ध महाविआचे नाईक यांच्यात दुहेरी लढत होणार असा अंदाज बांधला जात आसताना वंचित चे खुपसे मुळे तिरंगी व आता थेट चौरंगी लढत होण्याची शक्यता निर्माण झाली आहे. आज किनवट येथे रेल्वे स्टेशन परिसरातून हजारो लोकांची भव्य फेरी काढण्यात आली.आणि कलावती गार्डन येथे मेळावा घेण्यात आला. सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी तथा सहायक जिल्हाधिकारी यांचे कडे अर्ज दाखल करण्यासाठी पक्षाच्या वतीने राज्य कमिटीचे सचिव मंडळ सदस्य कॉ.विजय गाभने, उमेदवार कॉ. अर्जुन आडे,डॉ.बाबाराव डाखोरे, कॉ.विनोद गोविंदवार,कॉ.मोहन जाधव आदींची उपस्थिती होती.शहरात रॅली काढून सभा घेण्यात आली या सभेच्या अध्यक्षस्थानी पक्षाचे जिल्हा सचिव कॉ.शंकर सिडाम हे होते. रॅली मध्ये किशोर पवार, उज्वला पडलवार, जनार्दन काळे, प्रल्हाद चव्हाण, शिवाजी गायकवाड, अंकुश अंबुलगेकर, शैलीया आडे, दिगंबर काळे, खंडेराव कानडे, कॉ.सुभाष डाखोरे, स्टालिन आडे, संगीता गाभने, लता गायकवाड, आडेलू बोनगीर यासह हजारो च्या संख्येने स्त्री पुरुष उपस्थित होते. किनवट विधानसभा मतदार संघात चौरंगी लढत होणार असून अर्जुन आडे समीकरण बदलणार आहेत. अशी माहिती माकप जिल्हा कमिटी सभासद गंगाधर गायकवाड यांनी प्रसिद्धी पत्रकाद्वारे दिली आहे.

# आचारसंहिता भंगाच्या तक्रारी सी-व्हीजील ॲपवर

## १९५० या टोल फ्रि नंबरवर दाखल करण्याचे आवाहन

**तभा वृत्तसेवा**
**नांदेड,दि. २३ ऑक्टोबर**

नांदेड जिल्ह्यामध्ये विधानसभा सार्वत्रिक निवडणूक तसेच लोकसभा पोटनिवडणुकीची आचारसंहिता लागू झाली आहे.या काळात आदर्श आचारसंहितेचे भंग झाल्यास सी-व्हीजील ॲपवर तसेच १९५० या टोल फ्रि नंबरवर नागरिकांनी तक्रार करावी,असे आवाहन जिल्हाधिकारी अभिजीत राऊत यांनी केले आहे. विधानसभा सार्वत्रिक निवडणूक-२०२४ तसेच, १६-नांदेड लोकसभा पोटनिवडणूकीसाठी भारत निवडणूक आयोग यांचेकडून १५ ऑक्टोंबरला घोषणा करण्यात आल्यामुळे संपूर्ण महाराष्ट्र राज्यात व जिल्हयात आदर्श आचासंहिता लागू झाली आहे. आचारसंहिता लागू झालेल्या दिनांकापासून नांदेड जिल्हयात निवडणूक संदर्भात आदर्श आचारसंहितेचा भंग होत असल्यास नागरीकांनी cVIGIL ॲपद्वारे तसेच १९५० या टोल फ्रि क्रमांकावर फोन करुन तक्रारी दाखल करु शकतात. सदरील तक्रारीचे फिल्डस्तरावरील FST टिमद्वारे प्राप्त तक्रारींची शहानिशा करुन तक्रार १०० मिनिटात निकाली काढण्यात येते. त्यासाठी जिल्हास्तरावर जिल्हा नियंत्रण कक्ष स्थापन करण्यात आले आहे. नागरीक cVIGIL ॲपद्वारे जर कोणी बंदुक/पिस्तुल प्रदर्शन करणे, दारु वाटप, पैसे वाटप, सरकारी मालमत्तेचे विद्रुपन, बनावट बातमी, मतदारांची वाहतुक, भेटवस्तू वाटप, पेड न्यूज, जातीत तेढ निर्माण करणारे भाषण, धमकी इत्यादी बाबत प्रकार होत असल्यास अशा घटनांचे cVIGIL ॲपद्वारे फोटो, व्हिडीओ तसेच ऑडिओ रेकॉर्ड करुन ऑनलाईन तक्रारी दाखल करु शकतात. नागरिकांनी या सुविधांचा वापर करावा असे आवाहन त्यांनी केले आहे.

# नेताजी सुभाषचंद्र बोस महाविद्यालयात स्पर्धा परीक्षा संदर्भात सर्टिफिकेट कोर्स संपन्न

**तभा वृत्तसेवा**
**नांदेड,दि. २३ ऑक्टोबर**

येथील अभिनव भारत शिक्षण संस्था संचलित, नेताजी सुभाषचंद्र बोस कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयात लोकप्रशासन पदवी व पदव्युत्तर विभागाद्वारे आयोजित स्पर्धात्मक परीक्षेची मुलभूत तयारी या विषयावर नुकतेच पंधरा दिवसीय प्रमाणपत्र अभ्यासक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या प्रमाणपत्र अभ्यासक्रम कार्यक्रमाचे प्रमाणपत्र वितरण दि. १८ ऑक्टोबर रोजी करण्यात आले. या कार्यक्रमाच्या उद्घाटन प्रसंगी अध्यक्ष म्हणून महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य प्रा. डॉ. एम. वाय. कुलकर्णी हे उपस्थित होते, तर या कार्यक्रमाकरीता मार्गदर्शक व प्रमुख पाहुणे म्हणून स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ नांदेड येथील लोकप्रशासन अभ्यास मंडळाचे अध्यक्ष प्रा. डॉ. मोहम्मद हनीफ शेख इस्माईल साब आणि करिअर कट्टा उपक्रमाचे राज्यस्तरीय सदस्य व नांदेड जिल्हा समन्वयक प्रा. डॉ. संतोष शेंबाळे व महाविद्यालयाच्या उपप्राचार्या प्रा. डॉ. कल्पना कदम यांची प्रमुख उपस्थिती होती.

# दिव्यांग आणि वृद्ध मतदारांची घरपोच मतदानसाठी नावनोंदणी प्रक्रिया सुरू

**तभा वृत्तसेवा**
**देगलूर,दि. २३ ऑक्टोबर**

विधानसभा सार्वत्रिक निवडणूक-२०२४ प्रक्रियेसाठी मतदान करण्यासाठी वय वर्षे ८५ वरच्या आणि दिव्यांग व्यक्तींना घरपोच मतदान करण्याची सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी १२ डी फॉर्म भरून घेणे हि नोंदणी प्रक्रिया सुरू करण्यात आली आहे. विधानसभा सार्वत्रिक निवडणुकीत ज्येष्ठ नागरिक यांचे वय ८५ वर्षे व अधीक तसेच दिव्यांगांमध्ये ४०% पेक्षा जास्त दिव्यांग असणाऱ्या व्यक्ती जे पुरुष व स्त्री असो अशा मतदारांची नावे मतदार यादीत नोंदणी झाली आहे अशांना घरपोच मतदान करण्यासाठी १२ डी फॉर्म भरून घेणे हि प्रक्रिया राबविण्यात येत आहे . हि प्रक्रिया दिनांक २२ ऑक्टोबर ते दि. २७ ऑक्टोंबर पर्यंत राबिण्यात येत आहे सदरील प्रक्रियेसाठी घरोघरी बीएलओ आपल्या भागात येणार असून त्यांच्याकडे आपली घरपोच मतदान सुविधा उपलब्ध करून घेण्यासाठी १२ डी फॉर्म नावे नोंदवावीत तसेच आपली नावं निवडणूक मतदार यादीत समाविष्ट केली गेली आहेत याची खात्री करून घेऊन राष्ट्रीय कर्तव्यात सहभागी व्हावे असे आवाहन देगलूर बिलोली विधानसभा निवडणूक निर्णय अधिकारी तथा बिलोली उपविभागीय अधिकारी श्रीमती क्रांती डोंबे, सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी तथा तहसीलदार भरत सूर्यवंशी देगलूर, सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी तथा तहसीलदार गजानन शिंदे बिलोली यांनी केले असल्याची माहिती निवडणूक विभागाचे मिडिया कक्ष साहाय्यक श्रीमती सुषमा मोहोड यांनी केले आहे.

# एक लाख ८२ हजार महिलांनी घेतली मतदान करण्याची शपथ



**तभा वृत्तसेवा**
**नांदेड,दि. २३ ऑक्टोबर**

आगामी विधानसभा सार्वत्रिक निवडणूक व नांदेड लोकसभा पोटनिवडणुकीच्या पार्श्वभूमीवर जिल्ह्यात मतदानाची टक्केवारी वाढवण्यासाठी जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक निर्णय अधिकारी अभिजीत राऊत यांच्या मार्गदर्शनाखाली मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या पुढाकाराने स्वीप कार्यक्रमांतर्गत जनजागृतीचे विविध उपक्रम घेतले जात आहेत.

आज जिल्ह्यातील सर्व गावांमधून उमेद अभियानातील सुमारे एक लाख ८२ हजार २०० स्वयंसाहाय्यता समूहातील महिलांनी आज सकाळी ११ वाजता एकाच वेळी विविध गावांमधून मतदान जनजागृती शपथ घेतली. या उपक्रमासाठी उमेदचे जिल्हा अभियान सहसंचालक व जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणाचे प्रकल्प संचालक डॉ. संतोष तुबाकले यांनी पुढाकार घेतला. स्वयंसाहाय्यता समूह, ग्रामसंघ व प्रभाग संघातील महिला यात सहभागी झाल्या होत्या. यावेळी त्यांनी गावातील सर्व मतदारांना मतदान करण्यासाठी जनजागृती करण्याचा संकल्प केला. लोकशाही सुदृढ करण्यासाठी आगामी निवडणुकीत अधिकाधिक नागरिकांनी मतदान करून आपले कर्तव्य पार पाडावे, असे आवाहन जिल्हा प्रशासनाच्या वतीने करण्यात आले आहे.

# सीआरपीएफ प्रशिक्षण केंद्रात पोलिस स्मृती दिनानिमित्त अभिवादन


**तभा वृत्तसेवा**
**मुदखेड,दि. २३ ऑक्टोबर**

मुदखेड शहरातील केंद्रीय रिझर्व्ह पुलिस बल प्रशिक्षण केंद्रात दि. २१ ऑक्टोबर रोजी रोजी पोलीस स्मृती दिनाचे आयोजन करण्यात आले होते, त्यामध्ये संस्थेचे प्राचार्य सी.टी. व्यंकटेश, यांनी शहीदांना पुष्पहार अर्पण करून आदरांजली वाहिली. यावेळी सि आर पी एफ प्रशिक्षण केंद्राच्या परिसरातील हुतात्मा स्मारकावर शहीद जवानांना विशेष रक्षकांनी मानवंदना दिली. तसेच उपस्थित अधिकारी, अधिनस्त अधिकारी व जवानांनीही हुतात्मा स्मारकावर पुष्प अर्पण करून आदरांजली वाहिली.



पोलीस स्मृती दिनाचे महत्त्व विषद करताना, महानिरीक्षक सी.टी. व्यंकटेश म्हणाले की, ''आजचा दिवस आपल्या सर्वांसाठी ऐतिहासिक आहे, कारण याच दिवशी २१ ऑक्टोबर १९५९ रोजी केंद्रीय राखीव पोलीस दलातील १० शूर जवान शहीद झाले. हॉट स्प्रिंग, लडाख येथे चिनी आक्रमणाविरुद्ध लढताना फोर्सने आपले प्राण सोडले. ही आमच्यासाठी अभिमानाची बाब आहे की सी.आर. पी.एफ.च्या त्या १० शूर सैनिकांच्या बलिदानामुळे, २१ ऑक्टोबर हा दिवस देशभरातील सि आर पी एफ प्रशिक्षण केंद्रात, पोलीस दल आणि निमलष्करी दलांद्वारे 'पोलीस स्मृती दिन' म्हणून साजरा केला जातो. २१ ऑक्टोबर १९५९ रोजी, सीआरपीएफची एक छोटे गस्ती दल तिबेटच्या सीमेला समांतर निघाले; हॉट स्प्रिंग नावाच्या ठिकाणी चिनी सैनिकांनी या छोट्या गस्ती पथकावर जोरदार गोळीबार केला, गस्तीत उपस्थित असलेल्या सैनिकांनी त्यांच्याशी शौर्याने मुकाबला केला आणि मातृभूमीच्या रक्षणासाठी आपल्या प्राणांची आहुती दिली. त्या शूर सैनिकांच्या शौर्य आणि बलिदानाच्या स्मरणार्थ हा दिवस 'पोलीस स्मृती दिन' म्हणून साजरा केला जातो. यानंतर, गेल्या एक वर्षात देशाची सुरक्षा आणि अखंडता राखताना शहीद झालेल्या विविध सशस्त्र दल आणि पोलीस दलातील २१४ अधिकारी/सैनिकांची नावे संस्थेचे प्राचार्य तथा महानिरीक्षक सी टी व्यंकटेश, यांनी दिली. त्याच क्रमाने, आमच्यासाठी ही अभिमानाची गोष्ट आहे की गेल्या वर्षभरात केंद्रीय राखीव पोलीस दल देशाच्या संरक्षणात आघाडीवर आहे आणि सीआरपीएफचे जास्तीत जास्त २३ अधिकारी/सैनिक आहेत. देशाच्या रक्षणासाठी आपल्या प्राणांची आहुती दिली आहे. यावेळी कमांडंट व्ही.पी.त्रिपाठी, सहाय्यक कमांडंट हरिशंकर प्रसाद, सहाय्यक कमांडंट एस. रमेश, सर्व अधिकारी, कर्मचारी व प्रशिक्षणार्थी जवान उपस्थित होते.

# जिल्हास्तरीय क्रिडा स्पर्धेत उमरी मॉडर्न इंग्लिश स्कुलचे यश



**तभा वृत्तसेवा**
**उमरी,दि. २३ ऑक्टोबर**

नांदेड जिल्हास्तरावर घेण्यात आलेल्या १४वर्षा खालिल विद्यार्थी गटातून २०० मिटर धावण्याचे स्पर्धेत उमरी येथील मॉडर्न इंग्लिश स्कूल व कनिष्ठ महाविद्यालयाचा विद्यार्थी वरद कृष्णविलास मुकदमे हा पात्र ठरला असून त्याची विभागीय स्पर्धेसाठी निवड झाली आहे. तसेच ह्याच गटातील रिलेरेस स्पर्धेमध्ये वरद मुकदमे, हुजेफ सय्यद, विवेक नगनूरवार व अशोक सुर्यवंशी हे जिल्हास्तरावर पात्र ठरले असून त्यांची विभागीय स्पर्धेसाठी निवड झाली आहे. मॉडर्न इंग्लिश स्कूलने अध्यापनाचा सोबतच क्रिडा स्पर्धेत मिळविलेल्या यशा बध्दल त्यांचे सर्वत्र कौतुक होत आहे. मॉडर्नच्या विद्यार्थ्यांनी मिळविलेल्या ह्या यशाबद्दल शाळेच्या मुख्याध्यापिका सौ. अनुराधा संजय कुलकर्णी, क्रिडा शिक्षक सुनिल चव्हाण आणि संपुर्ण स्टाफने विजयी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले असून त्यांना विभागीय पातळीवरील स्पर्धेसाठी शुभेच्छा दिल्या आहेत.

# आमदार केराम यांनी नामनिर्देशन पत्र भरण्याआधी प्रभु दत्तात्रेय व माता रेणुकादेवीचे दर्शनाने घेतला विजयी आशिर्वाद

**तभा वृत्तसेवा**
**माहूर,दि. २३ ऑक्टोबर**

देशातील एक प्रसिद्ध तिर्थक्षेत्र तथा राज्यातील साडेतीन शक्तिपीठांपैकी श्री रेणुका देवीचे एक पीठ आणि प्रभु श्री दत्तात्रेय यांची जन्मभूमी, तपोभूमी निद्रास्थान असलेल्या देवभूमी माहूरगडावरील श्री दत्तात्रेय मंदिर,दत्तशिखर संस्थान येथे सर्वदुरवरुन येणाऱ्या भाविकांच्या सोयीसाठी कोट्यवधी रुपये विकास निधी मंजूर करुन मजबूत रुंदीकरणाचा सुलभ व सुकर रस्ता, भव्य व प्रशस्त प्रसादालय अशी पूर्वी कधीही न झालेली कामें करणारे आमदार व उमेदवार भीमराव केराम यांच्यावर साक्षात भगवान दत्तप्रभुंची कृपा असून,त्यांचे भविष्य उज्ज्वल आहे.त्यांना कोणीही रोखू शकणार नाही!'अशा शुभ संकेताचे आशिर्वाद दत्तशिखर संस्थान चे



प.पु.महंत श्री मधुसूदन भारती गुरू अच्युत भारती यांनी आ.भीमराव केराम यांना दिले.

विधानसभा निवडणुकीसाठी महायुतीच्या वतीने २० ऑक्टोबर रोजी जाहीर करण्यात आलेल्या भाजपच्या पहिल्या वहिल्या पहिल्या फळीतील ९९ उमेदवारांच्या नावांच्या यादीत किनवट/माहूर विधानसभा मतदारसंघातून सलग दुसऱ्यांदा विद्यमान आमदार भीमराव रामजी केराम यांना उमेदवारी घोषित करण्यात आली.त्यानंतर आमदार केराम यांचे नामनिर्देशन पत्र भरण्याआधी प्रभु श्री दत्तात्रेय व माता श्री रेणुका देवीचे दर्शन घेऊन निवडणुकीत विजयी आशिर्वाद घेण्यासाठी काल दि.२२ रोजी येथील टी-पॉइंट येथे आगमण होताच माहूर तालुका भाजपाच्या वतीने आपल्या लाडक्या नेत्याचे प्रचंड टाळ्यांच्या कडकडाटात जोरदार स्वागत करण्यात आले.केराम साहब! तुम आगे बढो हम तुम्हारे साथ हैं! असे गगणभेदी नारे देण्यात आले.गळ्यात पुष्पमाला घालून गुलालाची उधळण करण्यात आली. नंतर केराम यांचा काफिला देवदर्शनाला गडाकडे निघाला. सर्वप्रथम दतशिखर संस्थान येथील श्री दत्तात्रेय मंदिरातील भगवान दत्तप्रभुंचे दर्शन घेऊन केराम यांनी विजयी आशिर्वाद मागितला.

# विधानसभेसाठी निवडणूक खर्च निरीक्षक

## ए. गोविंदराज, मयंक पांडे नांदेडमध्ये दाखल

**तभा वृत्तसेवा**
**नांदेड,दि. २३ ऑक्टोबर**

नांदेड जिल्ह्यातील विधानसभा निवडणुकीसाठी खर्च निरीक्षक म्हणून तामिळनाडू कॅडरचे ए. गोविंदराज (आयआरएस) तसेच गुजरात कॅडरचे वरिष्ठ अधिकारी मयंक पांडे (आयआरएस) यांचे काल दि. २२ ऑक्टोबरला आगमन झाले असून त्यांनी आपल्या कार्यालाला प्रारंभ केला आहे. निवडणुकीमध्ये भारत निवडणूक आयोगाने प्रत्येक निवडणुकीसाठी खर्चाची मर्यादा निश्चित केली आहे. ४० लक्ष रुपये विधानसभेसाठी तर ९५ लक्ष लोकसभेसाठी खर्च मर्यादा आहे. निवडणुकीमध्ये पैशांचा गैरवापर होऊ नये यासाठी आयोगामार्फत अनेक प्रतिबंधात्मक उपाय करण्यात आले आहेत. निवडणुकीतील सभा, संमेलन, जेवनावळी, जाहिरातीवरील खर्च नियंत्रीत केल्या जाते. याशिवाय पैशाचे अमिष व अन्य बाबींबाबत कडक निगरानी केली जाते. निवडणूक निरीक्षकांमार्फत याबाबींची तपासणी केली जात असून ते नांदेड जिल्ह्यामध्ये याकाळात कायम रहिवाशी असतात.



**● ए. गोविंद राज नायगाव, देगलूर, मुखेड व लोहासाठी निरीक्षक**

तामिळनाडू कॅडरचे चेन्नई येथील गोविंद राज यांनी वरिष्ठ अधिकाऱ्यांशी नांदेड मध्ये आल्यानंतर चर्चा केली. ए गोविंदराज यांच्याकडे भारत निवडणूक आयोगाने नायगाव, देगलूर, मुखेड, लोहा या विधानसभा क्षेत्राच्या खर्च निरीक्षणाची जबाबदारी सोपविली आहे. कार्यालयीन वेळेमध्ये त्यांच्याशी नागरिकांना संपर्क साधता येईल. ए. गोविंद राज यांचा स्थानिक संपर्क क्रमांक ७२४९०४८०४० आहे. त्यांचे संपर्क अधिकारी जिल्हा परिषदेचे कार्यकारी अभियंता श्रीनिवास गंगथडे (मोबाईल क्रमांक ९८५०४८५३३२) आहेत. कार्यालयीन कालावधीत त्यांना नागरिकांना भेटता येईल. शासकीय विश्रामगृह नांदेड येथे लेंडी कक्ष येथे ते निवडणूक काळात निवासी आहेत.

**● मयंक पांडे किनवट, हदगाव, भोकर, नांदेड उत्तर, नांदेड दक्षिणसाठी निरीक्षक**

गुजरात कॅडरचे २००९ बॅचचे आयकर विभागाचे वरिष्ठ अधिकारी मयंक पांडे हे सुरत येथे आयकर विभागात अतिरिक्त आयुक्त आहेत. त्यांच्याकडे भारत निवडणूक आयोगाने नांदेड जिल्ह्यातील किनवट, हदगाव, भोकर, नांदेड उत्तर, नांदेड दक्षिण या विधानसभा क्षेत्राचे खर्च निरीक्षक म्हणून जबाबदारी सोपविली आहे. मयंक पांडे यांचा संपर्क क्र. ०८४८३८४५२२० आहे. तर त्यांचे संपर्क अधिकारी जिल्हा परिषदचे मुख्य लेखापाल शिवप्रकाश चन्ना (मो. नं. ९०११०००९२१) आहेत. शासकीय विश्रामगृह नांदेड येथील आसना कक्षात ते निवडणूक काळात निवासी आहेत. नागरिकांना आपापल्या विधानसभा क्षेत्राच्या संदर्भातील काही माहिती द्यायची असेल तक्रार असेल तर कार्यालयीन वेळेमध्ये या वरिष्ठ अधिकाऱ्यांना भेटता येणार आहे.

सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com

# सुनील गुट्टे यांच्या नेतृत्वाने परळीला आश्वासक चेहरा मिळणार

## नव्या आव्हानाची नवी दिशा आपला लढा आपल्या हक्कासाठी...परिवर्तनासाठी!

## सुनील पर्व!



परळी विधानसभा मतदार संघातून परळीतील सांस्कृतिक, शैक्षणिक व धार्मिक, राजकीय, वातावरण स्वच्छ करण्यासाठी व जनतेची सेवा करण्यासाठी सुनील गुट्टे हे राजकीय आखाड्यात समर्थपणे जनसेवेसाठी सज्ज झाले आहे. त्यांच्याबद्दल परळीतील मतदारांमध्ये स्वच्छ चारित्र्य जबाबदार व्यक्तीमत्व जनतेच्या विकासाची तळमळ व मतदार संघाच्या विकासाचा ध्यास याबद्दल आत्मविश्वास असल्याने जनता त्यांच्या पाठिशी खंबीरपणे उभी आहे. गुट्टेंच्या नेतृत्वामुळे परळीमध्ये परिवर्तन होणार त्यांचा असलेला समाजसेवेचा वारसा आणि वसा हा जनतेच्या मनात भरला आहे. यासाठी जनता त्यांना विधानसभेमध्ये पाठविण्यासाठी तयार आहे. एकूणच त्यांचे कार्य हे शाश्वत असल्याने एक चांगला उमेदवार निवडण्याची संधी परळी विधानसभा मतदार संघातील जनतेला मिळत आहे. याच बरोबर त्यांनी बेरोजगारी कमी व्हावी यासाठी सुशिक्षीत बेकार कुशल मुलांसाठी रोजगार मेळावे, शेतकऱ्यांसाठी विविध शेती संदर्भातील उपाय योजने संदर्भात केलेले कार्य जनतेच्या मनावर ठसा उमटविणारे आहे. याच बरोबर परळीत बिघडलेले सांस्कृतिक वातावरण, राजकीय शुध्दीकरण, धार्मिक सलोखा गुट्टे यांच्यामुळे कायम अबाधित राहिल. याबाबत जनतेच्या मनामध्ये तिळमात्र शंका नाही.















### भव्य नोकरी महोत्सव–परळी

आपल्या परळी मतदारसंघांमध्ये आई सौ.सुदामती रत्नाकर गुट्टे यांच्या मार्गदर्शनाखाली आणि माझ्या प्रमुख संयोजनातून व नेतृत्वाखाली भव्य असा नोकरी महोत्सव पार पडला, या महोत्सवामध्ये २७४४ उमेदवारांनी नाव नोंदणी केली होती, त्यापैकी २०१० एवढ्या मोठ्या प्रमाणामध्ये युवक युवतींनी प्रत्यक्ष सहभाग घेतला, विविध प्रकारच्या एकूण ५५ कंपन्यांमध्ये ९९२ उमेदवारांना त्याच दिवशी तात्काळ नियुक्तीपत्र देण्यात ओल.

सोलापूर तरुण भारत
Solapur Tarun Bharat

# छत्रपती संभाजीनगर



## खरीप हंगामासाठी पिक कर्ज वाटपाचे रु.२,४२४ कोटींचे उद्दीष्ट महाराष्ट्र ग्रामीण बैंकेकडून पूर्ण



छत्रपती संभाजीनगर– महाराष्ट्र ग्रामीण बैंक ही केंद्र सरकार व राज्य सरकार तसेच बैंक ऑफ महाराष्ट्र यांचे भाग भांडवल असलेली शेडुल्ड कमर्शियल बैंक आहे. बैंक ऑफ महाराष्ट्र प्रायोजित महाराष्ट्र ग्रामीण बैंक सद्यस्थितीत महाराष्ट्राच्या १७ जिल्ह्यांमध्ये कार्यरत असून ४२६ शाखांद्वारे बँकिंग व वित्तीय सेवा पुरविण्याचे काम करीत आहे. महाराष्ट्र ग्रामीण बैंक कृषी, उद्योग, शिक्षण, गृहनिर्माण, सूक्ष्म कर्ज इत्यादि क्षेत्रांना वित्त पुरवठा करून महाराष्ट्रातील लोकांच्या सर्वांगीण आर्थिक उन्नतीसाठी आणि प्रगतीसाठी सदैव प्रयत्नशील आहे.

केंद्र सरकार तसेच राज्य सरकार द्वारा लागू करण्यात आलेल्या विविध कर्ज योजनांमद्धे देखील बँकेचे मंजुरीचे व वाटपाचे प्रमाण हे समाधानकारक असून वेळोवेळी देण्यात आलेली उद्दिष्टेट बँकेने पूर्ण केली असून त्यासाठी बँकेला वेगवेगळ्या पातळीवर गौरविण्यात देखील आले आहे. २०२४–२५ या आर्थिक वर्षाच्या खरीप हंगामासाठी पिक कर्ज वाटपाचे रु.२,४२४ कोटींचे उद्दीष्ट देखील बँकेने पूर्ण केले असून, दिलेले उद्दीष्ट पूर्ण करणारी राज्यातील एकमेव बँक ठरली आहे. बँकेच्या एकूण व्यवसायात देखील मागील वर्षाच्या तुलनेत १०% टक्क्यांची वाढ झालेली असून सप्टेंबर २०२४ अखेरीस बँकेने तब्बल रु. २८,५०० कोटी व्यवसायाचा पल्ला गाठलेला आहे

महाराष्ट्र ग्रामीण बँक ही नेहमीच ग्राहकांच्या सेवेसाठी तत्पर असून अधिकाधिक बँकिंग सुविधा देण्यासाठी कटिबद्ध आहे. नुकतेच महाराष्ट्र ग्रामीण बँकेने सुलभ व जलदरित्या कर्ज उपलब्ध करून देण्यासाठी 'कर्ज उत्पत्ति प्रणाली' (ङ्जड) हे अद्ययावत तंत्रज्ञान बँकेच्या सर्व शाखांसाठी लागू केले आहे. अर्जदारांची आवश्यक कागदपत्रे या कर्ज प्रणालीमद्धे डिजिटल स्वरुपात दाखल केल्यानंतर; कर्ज प्रकरणासाठी आवश्यक शासकीय उतारे, पतमानांकण अहवाल तसेच केवायसीचे सत्यापण हे सदर प्रणालीमध्ये स्वयंचलित रित्या उपलब्ध होते. त्यामुळे कर्ज प्रक्रिया करण्यासाठी लागणारा वेळ कमी झालेला आहे. सर्व आवश्यक कागदपत्रे व अहवाल एकाच ठिकाणी व त्वरित उपलब्ध झाल्यामुळे कर्ज मंजूरी देखील सुलभ व जलद झालेली आहे. या प्रणालीमुळे वैयक्तिक कर्ज तसेच वाहन कर्ज मिळण्यासाठी लागणारा वेळ हा ७ ते १० दिवसावरून १ ते २ दिवसांवर आलेला आहे. त्याचप्रमाणे उद्योग कर्ज प्रक्रियेसाठी लागणारा वेळ देखील १० ते १५ दिवसावरून फक्त ३–५ दिवस एवढाच झालेला आहे.

या कर्ज प्रणालीसोबतच बँकेने 'व्हिडिओ केवायसी' द्वारे नवीन बचतखाते उघडण्याची सेवा देखील सुरू केली असून ग्राहक आपल्या सोयीनुसार घरबसल्या बँकेच्या मोबाइल ऐपद्वारे नविन बचतखाते उघडू शकतात. त्याचप्रमाणे बँकेने आपल्या सर्व ग्राहकांसाठी २२२ दिवस, ३३३ दिवस व ४४४ दिवसाच्या विशेष ठेव योजना अतिशय आकर्षक व्याजदरात उपलब्ध करून दिल्या असून या योजनांमद्धे ज्येष्ठ नागरिकांसाठी अर्धा टक्के अधिक व्याजदराची सुविधा देखील देण्यात आली आहे.

बँकेचे मुख्य कार्यालय हे छत्रपती संभाजीनगर या ठिकाणी असून शहराजवळील जागतिक वारसा लाभलेल्या वेरूळ येथील कैलाश मंदिराचा यथोचित गौरव करण्यासाठी बँकेने मंदिराचे चित्र असलेल्या विशिष्ट एटीएम कार्डसचे अनावरण केले असून त्याद्वारे या वास्तूचा प्रचार–प्रसार होण्यास व पर्यटनाला चालना मिळण्यास मदत होणार आहे.

बँकेच्या विविध योजना, विशेष ठेव योजना तसेच नविन कर्ज प्रणाली ही बँकेच्या ग्राहकांसाठीच असून सर्व नागरिकांनी आपल्या जवळच्या बैंक शाखेशी संपर्क साधावा व बँकेच्या सर्व सेवा सुविधांचा लाभ घ्यावा असे आवाहन महाराष्ट्र ग्रामीण बँकेचे अध्यक्ष मा. मिलिंद घारड यांनी केले आहे.

## जिल्हा तंबाखू नियंत्रण अंमलबजावणी पथकाने केली धडक कारवाई

### ११ जणांवर उगारला बडगा

छत्रपती संभाजीनगर : तंबाखू व तंबाखूजन्य पदार्थ (नियंत्रण) कायद्याचे उल्लंघन करणारे विक्रेते आणि सार्वजनिक ठिकाणी धुम्रपान करणाऱ्यांना जिल्हा तंबाखू नियंत्रण अंमलबजावणी पथकाने चांगलाच धडा शिकवला आहे. मंगळवारी करण्यात आलेल्या तपासणीत पथकाने ११ जणांवर कारवाईचा बडगा उगारला आहे.

राष्ट्रीय तंबाखू नियंत्रण कार्यक्रम अंतर्गत जिल्हा स्तरीय अंमलबजावणी पथकातील, पोलीस प्रशासन फुलंब्री आणि जिल्हा रुग्णालयातील तंबाखू नियंत्रण कक्षातील अधिकारी यांनी पोलिस स्टेशन फुलंब्री यांच्या हद्दीत संयुक्त तपासणी मोहीम राबवून तंबाखू व तंबाखूजन्य पदार्थ (नियंत्रण) कायद्याचे उल्लंघन करणारे विक्रेते आणि सार्वजनिक ठिकाणी धुम्रपान करणार्या ११ जणांवर कारवाई केली. जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. दयानंद मोतीपवळे, अतिरिक्त जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. पद्मजा सराफ यांच्या मार्गदर्शनाखाली तसेच पोलीस निरीक्षक सहाने यांच्या अध्यक्षतेखाली राष्ट्रीय तंबाखू नियंत्रण कार्यक्रमाचे जिल्हा सल्लागार डॉ. जावेद कुरेशी, योगेश सोळुंके, लक्ष्मीकांत माळगे, पोलीस सोनवणे मराठवाडा ग्रामीण विकास संस्था समन्वयक डॉ. गायकवाड यांनी सार्वजनिक ठिकाणी धुम्रपान करणार्या व्यक्तिंवर आणि पानटपरी चालकांवर कारवाई केली. तसेच उपस्थित लोकांना तंबाखू, सिगारेट सेवनाच्या दुष्परिणामाबाबत माहीती दिली.

सतराशे रुपये ठोठावला दंड

कायद्याचे उल्लंघन करू नका. अशा वारंवार सूचना दिल्या जातात. याशिवाय वारंवार कारवाई देखील केली जाते. मात्र असे असूनही अनेकजण त्याकडे दुर्लक्ष करत असल्याचे दिसून येत आहे. त्यामुळे तंबाखू नियंत्रण विभागाच्या वतीने कायद्याचे उल्लंघन करणारे विक्रेते आणि सार्वजनिक ठिकाणी धुम्रपान करणाऱ्यांना ११ जणांवर करावाई केली. आणि एकूण १ हजार ७०० रुपये दंड वसूल केला.

## मुलीची काढली छेड

छत्रपती संभाजीनगर: तरुणीचा हात धरून स्वतःजवळ ओढून तुझी बहीण येत नाही. तर तू माझ्यासोबत चल असे म्हणून तरुणीचा विनयभंग केल्याचा प्रकार समोर आला आहे. ही घटना २२ ऑक्टोबर रोजी ध्रुव तारा कंपनी कामगार चौक पंढरपूर परिसरात घडली. योगेश लक्ष्मण कीर्तीकर (२८ रा. रायपूर पोस्ट डोणगाव) असे आरोपीचे नाव आहे. तरुणीने दिलेल्या तक्रारीनुसार तरुणी ही कामगार चौकात थांबलेली असताना आरोपीने तिला आपल्याजवळ ओढून म्हणाला की तुझी बहीण येत नाही तर तू माझ्यासोबत चल असे म्हणून फिर्यादी तरुणीच्या मनाला लज्जा वाटेल असे कृत्य करून तिचा विनयभंग केल्याप्रकरणी एमआयडीसी वाळूज पोलीस ठाण्यात आरोपी विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

## तलवारीसह दागिन्यांची चोरी

छत्रपती संभाजीनगर: आंतरराष्ट्रीय स्पर्धेत जिंकलेली तलवार व सोन्याचे दागिने चोरून नेल्याची घटना समोर आली आहे. ही घटना २२ ऑक्टोंबर रोजी हर्सल पिसादेवी शिवदंत नगर परिसरात घडली. पुष्पा संजय वाघ (रा.३८हसूल पिसादेवी शिवदंत नगर) यांनी दिलेल्या तक्रारीनुसार रात्रीच्या वेळी घरी कोणीच नसल्याचा फायदा घेत अज्ञात चोरट्यांनी घराच्या दरवाजाची कडी तोडून आत प्रवेश करून फिर्यादी यांच्या मुलीने आंतरराष्ट्रीय स्पर्धेत जिंकलेली तलवार जिची किंमत २० हजार रुपये व अन्य सोन्याचे साहित्य ज्याची किंमत ५० हजार रुपये असे एकूण ७० हजार रुपयाच्या साहित्याची चोरी अज्ञात चोरट्यांनी केली.

## वीरभद्र जयंतीनिमित्त थाटात मिरवणूक

छत्रपती संभाजीनगर : शहरात वीरभद्र जयंतीनिमित्त भाविकांनी विविध कार्यक्रम सादर करीत धमाल उडवून दिली. डफ व झांज वाद्याच्या निनादात ग्रामस्थांच्यावतीने मिरवणूक काढून श्री वीरभद्र जयंती सोमवारी (दि.२१) उत्साहात साजरी करण्यात आली. यानिमित्त विविध धार्मिक कार्यक्रम झाले. महाप्रसादाने कार्यक्रमाची उत्साहात सांगता करण्यात आली. येथील खामनदीकाठी असलेल्या हनुमान मंदिरापासून सकाळी साडेदहाच्या सुमारास डफ वाद्यासह मिरवणुकीला प्रारंभ करण्यात आला. ही मिरवणूक गावातील झेंडा मैदान, गणेश चौक, जीवनलाल पाटणी प्रवेशद्वार मार्गे लांझी चौकात आणण्यात आली. भाविकांनी पावली मिरवणूक श्री वीरभद्र मंदिरात आली. महाप्रसाद कार्यक्रमाने जयंती उत्सवाची सांगता झाली.

उपसरपंच योगेश आरगडे, नारायण आरगडे, सर्जेराव भोंड, हरिभाऊ करडे, बाबासाहेब आरगडे, भानुदास आरगडे, रामकिसन करडे, आरगडे, कारभारी सोमीनाथ करडे, रखमाजी आरगडे, दशरथ आरगडे, गोरख करडे, रमेश आरगडे, योगेश करडे, बापू आरगडे, नंदकुमार सोनवणे, नानासाहेब आरगडे, कल्याण आरगडे, मारोती आरगडे, संतोष आरगडे यांच्यासह इतरांनी कार्यक्रमासाठी पुढाकार घेतला.

## गावरान सीताफळ सोयगावच्या बाजारात दाखल



तभा.वृत्तसेवा

सोयगाव,दि.२३ ऑक्टोबर

येथून जवळच असलेल्या वेताळवाडी किल्ला परिसरातील अजिंठा डोंगर रांगेत सीताफळाचे जंगल आहे. कुठलेही खत, पाणी औषधी न फवारलेल्या शंभर टक्के नॅचरल असे सीताफळ परिपक्व झाले असून सध्या हा गावरान रांनमेवा बाजारात दाखल झाले असून खरेदी साठी गर्दी होत आहे.

सोयगाव तालुक्याला दक्षिणेस अजिंठायची डोंगर रांग लाभलेली आहे. चंदन सागवान सह विविध औषधं गुणधर्म असलेल्या वनस्पती या डोंगरात आहे. त्याचप्रमाणे या डोंगरात गोड चावीस्ट गावरान सीताफळ मोठ्या प्रमाणात आहे.शंभर टक्के नॅचरल असलेल्या सीताफळांना कुठलेही खत दिले जात नाही. फवारण्या केल्या जात नाही. पावसाच्या पाण्यावर येणारे गावरान सीताफळ बाजारात येताच ग्राहक खरेदीसाठी गर्दी करतात. यंदा मोठ्या प्रमाणात हे सीताफळ आलेले आहे आणि बाजारात दाखल होत आहे. कचे सीताफळ ४० रुपये किलो मिळत आहे व पिकलेले सीताफळ ५० रुपये किलो विकले जात आहे.कॅरेट चे भाव ३०० रुपये आहे. सोयगाव परिसरातील ग्राहक खरेदी करतातच परंतु बाहेर गावी देखील मोठ्या प्रमाणात हे सीताफळ हात आहे.अनेकजण आपल्या पाहुण्यांना, मित्रांना हे सीताफळ पाठवत आहे.

## अवैध गुटख्याचा साठा पोलिसांनी केला जप्त

तभा वृत्तसेवा

कन्नड – राष्ट्रीय महामार्गावर भरधाव वेगात जाणारी चारचाकी (कार) चालकाचे नियंत्रण सुटून रस्त्याच्या खाली गेली.

घटना कळताच पोलिस मदतीसाठी सरसावले पण वाहनामध्ये अवैधपणे वाहतूक करण्यात येत असलेल्या गुटख्याचा मोठा साठा मिळाल्याने खळबळ उडाली आहे सदर घटना सोमवार २१ ऑक्टोंबरच्या रात्री साडेअकरा वाजेच्या सुमारास उघडकीस आली असून, या प्रकरणी कन्नड ग्रामीण पोलिसांनी गुटखा आणि गुटख्याची अवैध वाहतूक करणारे वाहन मिळून सुमारे ७ लाख २५ हजार १०६ रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे.

पोलिस सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार , सोमवार २१ ऑक्टोंबरच्या रात्री साडेअकरा वाजेच्या सुमारास, धुळे – सोलापूर महामार्गावरील टापरगाव शिवारातील समर्थ कॅफेजवळ, कन्नडहून छत्रपती संभाजीनगरकडे जाणारी कार क्रमांक एम एच ०४– इएफ ७२६९ चालक अजीज तय्यब सय्यद (वय २१ ) रा. शंभूनगर, छत्रपती संभाजीनगर याची कार महामार्गाच्या खाली गेल्याची माहिती ग्रामीण पोलिसांना मिळाली पोलिसांनी घटनास्थळी पोहचून सदरील कार, रोडवर आणण्यासाठी प्रयत्न करत असताना, गाडीची पाहणी केली असता, गाडीत सुगंधी वास येत असल्याचे पोलिसांच्या लक्षात आले, पोलिसांनी कारची तपासणी केली असता, कारमध्ये विमल, राजनिवास व इतर कंपनीचा गुटखा आढळुन आला. यावरून पोलिसांनी गुटख्यासह कार असा एकूण ७ लाख २५ हजार १०६ रुपयांचा मुद्देमाल जप्त करून, करचालकाच्या विरोधात कन्नड ग्रामीण पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल केला असून, सहायक पोलिस निरीक्षक रामचंद्र पवार यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिस हेड कॉन्स्टेबल कैलास करवंदे, धीरज चव्हाण अधिक तपास करत आहेत.

## सणासुदीच्या पार्श्वभुमिवर उलाढाली व देवाणघेवाणीवर कडक नजर

### निवडणूक आयोगाचे खर्चनिरीक्षक दाखल:यंत्रणांचा घेतला आढावा




छत्रपती संभाजीनगर, दि.२३(जिमाका):– विधानसभा निवडणूक २०२४ च्या आचारसंहिता कालावधीत दिवाळीसारख्या सणासुदीचा कालावधी येत आहे. त्या पार्श्वभुमिवर होणाऱ्या उलाढाली व देवाणघेवाण यावर कडक नजर ठेवावी,असे निर्देश जिल्ह्यात दाखल झालेल्या निवडणूक आयोगाच्या खर्च निरीक्षकांनी सर्व संबंधित यंत्रणांना दिले. आज या निरीक्षकांच्या उपस्थितीत सर्व लेखाधिकारी तसेच विधानसभा क्षेत्रनिहाय खर्च निरीक्षकांचे प्रशिक्षणही घेण्यात आले.

नियोजन सभागृहात पार पडलेल्या या बैठकीस जिल्हाधिकारी दिलीप स्वामी, दाखल झालेले खर्च निरीक्षक कोटापट्टी वाम्शी क्रिष्णन व सोभान सुत्रधार यांच्यासह पोलीस आयुक्त प्रवीण पवार, पोलीस अधीक्षक डॉ. विनयकुमार राठोड, उपजिल्हा निवडणूक अधिकारी देवेंद्र कटके, उपसंचालक तथा वरिष्ठ कोषागार अधिकारी शेखर कुलकर्णी तसेच सर्व नोडल अधिकारी व यंत्रणा प्रमुख उपस्थित होते.

खर्च निरीक्षकांनी सर्व यंत्रणाप्रमुख व नोडल अधिकाऱ्यांकडून होत असलेल्या कामकाजाचा आढावा घेतला. निरीक्षकांनी मार्गदर्शन केले की, दिवाळीसारख्या सणाच्या पार्श्वभुमिवर होत असलेल्या उलाढाली, भेटवस्तू देवाण घेवाण यासारख्या व्यवहारांवर नजर ठेवावी. त्यासाठी बँक खात्यांवर जमा होणाऱ्या व काढली जाणारी रोकड, ऑनलाईन होणारे व्यवहार, झिरो बॅलन्स खात्यांवर अचानक जमा होणाऱ्या रकमा, कपडे, दागिने, भेटवस्तूंच्या मोठ्या प्रमाणावर होणाऱ्या खरेदी अशा बाबींवर लक्ष ठेवावे. तसेच मद्यविक्री, रेल्वे, बस, विमानतळ याठिकाणी तसेच खाजगी वाहनांच्या तपासण्या कराव्या,असे निर्देश देण्यात आले.

## सरकारी कामात अडथळा प्रकरणी आरोपीला एक वर्ष कैद

### २० हजार रूपये दंडही भरावा लागणार

छत्रपती संभाजीनगर : एसटी चालकाला मारहाण करीत सरकारी कामात अडथळा आणणे एकाला चांगलेच महागात पडले. आरोपीला न्यायालयाने १ वर्ष साधी कैद व २० हजार रूपये दंडाची शिक्षा सुनावली. मनोज रशिद शहा, रा. विटावा, घाणेगाव ता. गंगापूर असे आरोपीचे नाव आहे. एसटी चालक केसरलाल कोंडीराम शेलार (वय ५३) यांनी वाळूज एमआयडीसी पोलिस ठाण्यात तक्रार दिली होती.

ही घटना २ एप्रिल २०२३ रोजी घडली. फिर्यादी केसरलाल कोडर्डीराम शेलार २ एप्रिल रोजी दुपारी ४ वाजेच्या सुमारास ता वाहक आबासाहेब ठोंबरे यांच्यासह विटावा गावाचे जवळ आले असता सुप्रीम कंपनीची बस आली. तेव्हा सदर गाडी पास व्हावी म्हणून फिर्यादी बस चालक यांनी त्यांची बस रोडच्या बाजूला लावली. तेव्हा सदर खाजगी बस चालक मनोज शहा याने फिर्यादी यांना तुझी बस खाली घे म्हणून शिवीगाळ केली. तेव्हा बस मधील प्रवाशांनी सदर खाजगी बस चालकास समजावून सागीतले. तरी सुध्दा सदर आरोपीने एसटी बस चालकाच्या डोक्यात लाकडी दांडा मारून डोके फोडले. सरकारी कामात अडथळा निर्माण केला म्हणून सदर आरोपी मनोज रशिद शहा रा. विटावा, घाणेगाव ता. गंगापूर याच्यावर वाळूज एमआयडीसी पोलिस ठाण्यात गुन्हा

दाखल करण्यात आला होता.

गुन्हा दाखल झाल्यानंतर पोलिस निरिक्षक कृष्णा शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली पोउपनि सचिन पागोटे यांनी तपास करून आरोपी विरुध्द सबळ पुरावे हस्तगत केले. न्यायालयात दोषारोप पत्र दाखल केले. न्यायालयाने साक्षी पुरावे नोंदवून आरोपी विरुध्द सबळ पुरावे मिळाल्याने जिल्हा व सत्र न्यायालय वैजापूर यांनी आरोपीस १ वर्ष साधी कैद, २० हजार रुपये दंडाची शिक्षा सुनावण्यात आली आहे. सरकारी वकील गजानन मांझा यांनी सरकारी पक्षातर्फे कामकाज पाहिले. कोर्ट पैरवी सफौ. दत्ता गवळी यांनी साक्षीदार यांना कोर्टात मार्गदर्शन करून कोर्टात हजर केले.

## लहान मुलांच्या भांडणातून दोन गटात राडा; तीन जण जखमी

छत्रपती : संभाजीनगर, लहान मुलांच्या भांडणातून दोन कुटुंबात वाद आणि हाणामारी झाली. ही घटना मंगळवारी रात्री चिकलठाणा येथील कामगार चौक भागात घडली. पोलिसांनी वेळीच धाव घेत वाद मिटवला. मात्र, यावेळी बघ्यांची गर्दी झाल्याने परिसरात तणावाची अफवा पसरली होती. या हाणामारीत तीनजण जखमी झाले असून दोघांना उपचारासाठी घाटीत दाखल करण्यात आले आहे.

या प्रकरणी सिडको एमआयडीसी पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक गजानन कल्याणकर यांनी माहिती दिली. यामध्ये कामगार कॉलनी भागात शेजारी शेजारी भिन्न समाजाची दोन कुटुंब राहतात. सायंकाळी १० ते १२ वर्षाच्या मुलांमध्ये खेळण्यावरून वाद झाला. हा वाद घरापर्यंत पोहचल्याने दोन्ही कुटुंबात वादाची ठिणगी पडली. याचे पर्यवसान हाणामारीत झाले. या मारामारीत ३ जण जखमी झाले. या मध्ये सरफराज खान युसूफखान (३४), मुजीब सत्तार शेख दोघे (२४, रा. पुष्पा गार्डन, चिकलठाणा) आणि दुसऱ्या गटाचा विकी कमलाकर लांडगे (३४, रा. आंबेडकरनगर) यांचा समावेश आहे. हे भांडण बघण्यासाठी बघ्यांची मोठी गर्दी झाली होती. सिडको एमआयडीसी पोलिसांना माहिती मिल्यानंतर त्यांनी घटनास्थळी धाव घेतली. वाद मिटवून गर्दी पांगविली. जखमींवर डॉ. उज्वल चव्हाण, डॉ. संजय वाकोडकर, परिचारिका शितल पांघरे, संजिवनी पवार, मिना पोटे यांनी उपचार केले. रात्री उशीरापर्यंत या प्रकरणी कोणताही गुन्हा दाखल झाला नसल्याची माहिती पोलीस निरीक्षक गजानन कल्याणकर यांनी दिली असून, या ठिकाणी शांतता असल्याचे सांगितले.

या जखमींना उपचारासाठी रात्री ९ वाजता मिनी घाटीत आणण्यात आले. प्राथमिक उपचार केल्यानंतर सिटी स्कॅनसाठी त्यांना नेण्यात आले.

### खट्याळ पिट्या...




## चिमुकल्याचे रक्तगट विसंगत प्रत्यारोपण यशस्वी – मराठवाड्यातील पहिली शस्त्रक्रिया



छत्रपती संभाजीनगर – चिकाळा तालुका मुखेड जिल्हा नांदेड येथे राहणा–या राहुल भंडारे यांच्या परिवारात जेव्हा ११ वर्षांचा त्यांचा मोठा मुलगा लक्षदीप याला उलटीचा त्रास सुरू झाला तेव्हा हा त्रास तात्पुरता राहील असे त्यांना वाटले होते. परंतु, जेव्हा त्याची प्रकृती ढासाळली तेव्हा पुढील तपासण्या केल्यानंतर कायम स्वरूपी किडनी आजाराचे निदान झाले आणि परिवारावर जणू संकटाचे डोंगरच कोसळले.

पुढील उपचारासाठी छत्रपती संभाजीनगर येथे आणले असता, डॉक्टरांनी त्या चिमुक ला तातडीने डायलिसिस करण्याची गरज आहे असे सांगितले. मेडीकवर हॉस्पिटल येथील किडनी विकारतज्ञ डॉ. सचिन सोनी यानी लक्षद्वीपचा किडनी आजार कायमस्वरुपी असल्याने किडनी प्रत्यारोपण त्याचे जीवन पालटू शकतो असे सांगितले. परिवारामध्ये किडनी दात्यासाठी केली असता, आईने अवयवदानासाठी पुढाकार घेतला. परंतु अडचणी इथे थांबल्या नाहीत. आईचा रक्तगट भिन्न होता. मुळातच किडनी प्रत्यारोपण चिमुकल्यासाठी मोठी शस्त्रक्रिया होती, त्यात विसंगत रक्तगटाचे प्रत्यारोपण हे मोठे आव्हान होते. शिवाय, इतक्या लहान वयाच्या रुग्णाचे रक्तगट विसंगत प्रत्यारोपण मराठवाडा भागात झाले नव्हते. यावेळी, डॉ. सचिन सोनी यांनी अशा प्रकार ची क्लिष्ट शस्त्रक्रिया आपण यशस्वीपणे पार पाडू असा विश्वास दाखवला.

प्रत्यारोपणासाठी आवश्यक कागदपत्रे व परवानगीची कारवाई पूर्ण करण्यात आली. ६ जानेवारी २०२४ रोजी ही शस्त्रक्रिया यशस्वीपणे पार पाडण्यात आली. प्रत्यारोपणाला आता जवळपास दहा महिने पूर्ण झाले आहेत. लक्षदीप व त्याची आई पुर्णपणे सुदृढ आहेत हे विशेष. या शस्त्रक्रियेत डॉ. सचिन सोनी, डॉ. अभय महाजन, डॉ. अरुण चिंचोले सहभागी होते. भूलतज्ञाची जबाबदारी डॉ. दिनेश लहिरे, डॉ. सुनील मुरके, डॉ. अभिजीत कबाडे आणि डॉ. निनाद धोकटे यांनी पार पाडली. संदीप चव्हाण व रोशनी चव्हाण यांनी प्रत्यारोपण समन्वयकाचे काम केले. निवासी वैद्यकीय अधिकारी डॉ. वर्षा पडलवर, डॉ. निकिता जयस्वाल व प्रत्यारोपण विभागातील सुश्रुषा कर्मचाऱ्यांनी रुग्णांची विशेष काळजी घेतली अशी माहिती वैद्यकीय अधिक्षक डॉ. संदीप ठाकूर यांनी दिली. ही शस्त्रक्रिया अल्प दरात करण्यात आली शिवाय रुग्णाला मुख्यमंत्री सहायता निधीमार्फत अर्थसहाय ही प्राप्त झाले असे केंद्रप्रमुख डॉ. दिपेन शहा यांनी सांगितले. उत्कृष्ट सुविधा, पारंगत डॉक्टरांची चमू, समर्पित सुश्रुषा सेवा यांच्या माध्यमातून ही क्लिष्ट शस्त्रक्रिया यशस्वीपणे पार पडली आणि भविष्यातही असे चांगले काम सुरू राहील हा विश्वास त्यांनी दाखवला.

# ४६ वर्षांत कोणत्याच पक्षाने लढविल्या नाहीत २८८ जागा



◆ **मुंबई, २३ ऑक्टोबर**

महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीच्या इतिहासात पहिल्यांदाच एकाच नावाचे दोन राज्यस्तरीय पक्ष एकमेकांच्या विरोधात निवडणूक लढणार आहेत. त्यातील प्रत्येकी दोन पक्ष हे महायुती आणि महाविकास आघाडीमध्ये सहभागी होऊन आमने-सामने आले असल्याने या निवडणुकीकडे संपूर्ण देशाचे लक्ष लागले आहे.

राज्यात १४५ नोंदणीकृत पक्ष आणि सहा राष्ट्रीय व चार राज्यस्तरीय पक्ष असतानाही कुठल्याही पक्षाने २८८ जागा लढविल्या नसल्याचे दिसून आले आहे. सर्वांत सक्षम असलेल्या काँग्रेसने १९७८ पासून कधीच २८८ जागांवर उमेदवार उभे केले नाहीत. तोच कित्ता अन्य पक्षांनीही गिरविल्याचे दिसून येते.

राज्यातील २८८ विधानसभा मतदार संघासाठी उमेदवारी निश्चिती आणि जागा वाटपाची लगबग सुरू झाली आहे. या निवडणुकीत राज्यातील १४५ नोंदणीकृत पक्ष आणि सहा राष्ट्रीय आणि पाच राज्यस्तरीय पक्ष निवडणूक लढवू शकतात. त्यात काँग्रेस, भाजपा, आप, बीएसपी, नॅशनल पीपल पार्टी (एनपीपी) या राष्ट्रीय पक्षाचा आणि मनसे, राष्ट्रवादी काँग्रेस, शिवसेना, शरदचंद्र पवार राष्ट्रवादी काँग्रेस आणि उद्धव ठाकरे गट या पाच राज्यस्तरीय पक्षांचा समावेश आहे.

**आघाड्या-युतीमुळे होतो घोळ**

आणिबाणीनंतर १९७८ मध्ये झालेल्या विधानसभा निवडणुकीत काँग्रेसने २५९ जागा, तर जनता पार्टीने २१५ जागांवर उमेदवार उभे केले होते. राष्ट्रवादी काँग्रेसची स्थापना झाल्यानंतर १९९९ मध्ये सर्वाधिक २२३ जागांवर उमेदवार उभे केले होते. भाजपा आणि शिवसेनेने देखील कधीच दोनशेचा आकडा पार केलेला नाही. स्वबळाचा नारा देणाऱ्या मनसेने २०१४ मध्ये सर्वाधिक २१९ जागांवर उमेदवार उभे केले होते. एकंदरीत आघाड्या आणि युतीमुळे गेल्या ४६ वर्षांपासून एकाही पक्षाने २८८ जागा लढविलेल्या नाहीत. (वृत्तसंस्था)

# पुण्यात कारमधून ५ कोटी रुपये जप्त

◆ **पुणे, २३ ऑक्टोबर**

२० नोव्हेंबर रोजी होणाऱ्या विधानसभा निवडणुकीसाठी महाराष्ट्रात लागू असलेल्या आचारसंहितेदरम्यान पुणे ग्रामीण पोलिसांनी एका कारमधून ५ कोटी रुपयांची रोकड जप्त केली, असे एका अधिकाऱ्याने सांगितले.

नाकाबंदीत साताऱ्याच्या दिशेने जाणारी एक कार अडवण्यात आली. झडती घेतली असता गाडीतील चार जणांकडून ५ कोटी रुपयांची रोकड जप्त करण्यात आली. पोलिस आणि जिल्हा निवडणूक अधिकारी या घटनेची चौकशी करीत आहेत.



दरम्यान, शिवसेनेचे खासदार संजय राऊत यांनी सोमवारी रात्री एक्सवर एका पोस्टमध्ये शिवसेना आमदाराच्या कारमधून १५ कोटी रूपये जप्त केल्याचा दावा केला आहे. (वृत्तसंस्था)

## इनकमिंग....आऊटगोईंग

- माजी आमदार अनिल गोटे येत्या दोन दिवसांत शिवसेना ठाकरे गटात प्रवेश करणार आहेत. लोकसंग्राम पक्ष म्हणून गोटे यांनी लोकसभेत महाविकास आघाडीला पाठिंबा दिला होता. आधी भाजपात असणारे गोटे नंतर राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये गेले आणि तिथूनही बाहेर पडले होते.
- एरोलीचे आमदार गणेश नाईक यांचे पुत्र संदीप नाईक यांनी मंगळवारी राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार पक्षात प्रवेश केला. त्यापाठोपाठ १३ तालुका अध्यक्षांनीही राजीनामा दिला आहे.
- कोकणातील राजापूर लांजा मतदारसंघातील राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते अजित यशवंतराव यांनी मंगळवारी उद्धव ठाकरे यांच्या उपस्थितीत उबाठात प्रवेश केला. कोकणात अजित पवारांना हा मोठा धक्का मानला जात आहे.

## आता हेच पाहणे बाकी होते!

# लॉरेन्स बिश्नोईला विधानसभा लढण्याची ऑफर

◆ **मुंबई, २३ ऑक्टोबर**

राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते बाबा सिद्दिकी यांच्या हत्येनंतर देशभरात गँगस्टर लॉरेन्स बिश्नोईचे नाव चर्चेत आहे. लॉरेन्स बिश्नोई आता राजकारणात येतो की काय, अशी चर्चा सुरू झाली आहे. लॉरेन्सला थेट महाराष्ट्र विधानसभा निवडणूक लढवण्याची ऑफर आली आहे.

वांद्रे पूर्व विधानसभा मतदारसंघातून आमदार झिशान सिद्दिकी यांच्याविरोधात लढवण्यासाठी उत्तर भारतीय विकास सेनेकडून लॉरेन्स बिश्नोईला ऑफर आली. बाबा सिद्दिकी यांच्या हत्या प्रकरणी लॉरेन्सच्या काही शूटर्सला मुंबई पोलिसांनी अटक केली आहे. सलमान खानला जीवे मारण्याची अनेक वेळा धमकी लॉरेन्सकडून देण्यात आली. बाबा सिद्दिकी यांनी अंधेरी पश्चिमच्या गिल्बर्ट हिल येथील एका प्रकल्पातील जवळपास ६२३ गरीब लोकांना बेघर केले, असा आरोप पंडित सुनील शुक्ला यांनी केला. या संदर्भात न्यायालयात याचिका दाखल करण्यात आली आहे.

उत्तर भारतीय विकास सेना हा पक्ष निवडणूक आयोग आणि महाराष्ट्र राज्य निवडणूक आयोगात नोंदणीकृत आहे. या पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष सुनील शुक्ला यांनी लॉरेन्स बिश्नोईला पत्र लिहून महाराष्ट्र विधानसभा निवडणूक लढवण्याची विनंती केली. बाबा सिद्दिकी देशभक्त नाही, लॉरेन्स देशभक्त आहे. लॉरेन्स हा उत्तर भारतीय समाजाचा आहे. त्याच्यात आम्हाला शहीद भगतसिंग दिसतो. त्यामुळे त्याने निवडणूक लढवण्यासंदर्भात विचार करावा, अशी विनंती केली आहे. (वृत्तसंस्था)

# अभिनेत्री होण्यासाठी आली; आता लागले आमदारकीचे वेध

## जानकरांना मिळाला ग्लॅमरस चेहरा

◆ **मुंबई, २३ ऑक्टोबर**

महायुतीतून बाहेर पडून महादेव जानकरांच्या राष्ट्रीय समाज पक्षाने स्वबळाचा नारा दिला. पक्ष संघटना बळकट करण्यासाठी जानकरांनी हा निर्णय घेतला. त्यात मुंबईत जानकरांच्या पक्षाला ग्लॅमरस चेहरा मिळाला आहे. मुंबईतील सिने टेलिव्हिजन इंडस्ट्रीत अभिनेत्री म्हणून काम करणारी महक चौधरीने राष्ट्रीय समाज पक्षात प्रवेश केला आहे. तिच्यावर पक्षाने मुंबई महिला अध्यक्ष म्हणून जबाबदारी दिली आहे. महक चौधरी वर्सोवा विधानसभा मतदारसंघातून निवडणूक लढवण्याची शक्यता आहे.





महक चौधरी उत्तरप्रदेशातील कृष्णनगरी मथुरा येथून मुंबईत आली. बॉलिवूडमध्ये काम करण्याचे स्वप्न डोळ्यासमोर ठेवत तिने मुंबई गाठली. अल्पावधीत तिने अनेक मालिकांमध्ये काम केले. अनेक जाहिराती, दाक्षिणात्य चित्रपट आणि नंतर वेब शोमध्ये काम करून तिने अभिनेत्री म्हणून स्वत:ला प्रस्थापित करण्याचा प्रयत्न केला. तिने काही काळ मॉडेलिंगही केले आहे. ॲड फिल्म्स, साऊथ फिल्म्स आणि वेब शोमध्ये भाग्य आजमावल्यानंतर हिंदी चित्रपटांमध्ये काम करण्याचे तिचे सर्वांत मोठे स्वप्न होते. मात्र, आता महक महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीच्या रिंगणात उतरणार आहे. (वृत्तसंस्था)

# उच्चशिक्षित नव्याचे प्रियांकांसमोर तगडे आव्हान

◆ **वायनाड, २३ ऑक्टोबर**



काँग्रेसचे नेते राहुल गांधी यांनी वायनाडची जागा सोडल्यानंतर त्या ठिकाणी होणाऱ्या पोटनिवडणुकीत प्रियांका वढेरा रिंगणात उतरल्या आहेत. मात्र, त्यांच्याविरोधात भाजपाने दिलेल्या उमेदवारामुळे हे आव्हान प्रियांकांसाठी तगडे ठरणार आहे.

३९ वर्षीय नव्या हरिदास या भाजपाच्या विद्यमान नगरसेविका आहेत. शिवाय उच्चविद्याविभूषित आहेत. सॉफ्टवेअर इंजिनीयर असणाऱ्या नव्या केरळमधील सुशिक्षित जनतेसाठी नक्कीच वेधक ठरणार आहेत. कारण, केरळ हे १०० टक्के साक्षरांचे राज्य आहे. तिथे शिक्षणाला असलेले महत्त्व आणि स्थानिक व्यक्ती समोर असणे या दोन्ही बाबींकडे काँग्रेसने डोळेझाक करून चालणार नाही.



**कुटुंब संघाशी निगडीत**

सॉफ्टवेअर इंजिनीयर असलेल्या नव्या या अपघाताने राजकारणात आल्या. बी.टेक.ची पदवी घेतल्यानंतर त्या एचएसबीसी बँकेत सॉफ्टवेअर इंजिनीयर म्हणून करीत होत्या. २००९ साली त्यांचे मरीन इंजिनीयर शोबिन श्याम यांच्याशी लग्न झाले. त्यानंतर त्या सिंगापूरला गेल्या. तिथे त्या सॉफ्टवेअर क्षेत्रात काम करीत होत्या. नव्या हरिदास यांचे कुटुंब राष्ट्रीय स्वयंसेवक संघाशी जोडले आहे. नव्या यांनी सांगितले की, त्या लहानपणापासून संघाच्या कार्यक्रमात सहभागी होत होत्या. संघाकडून विद्यार्थ्यांसाठी राबविण्यात येणाऱ्या विविध कार्यक्रमांत सहभागी झाल्या होत्या. पण, आपण राजकारणात जाऊ, असा विचार त्यांनी कधीही केला नव्हता.

२०१५ साली नव्या आपल्या मूळ गावी म्हणजेच कोझिकोडला काही काळासाठी आल्या होत्या. त्यावेळी केरळमध्ये स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुका सुरू होत्या. या निवडणुकांनी नव्या यांचे आयुष्य बदलले. त्या म्हणाल्या, मी मुलांसह काही दिवसांसाठी कोझिकोडला आले होते. कुटुंब संघ परिवाराशी संबंधित असल्यामुळे भाजपाने मला निवडणुकीला उभे राहण्याची गळ घातली. मी खुल्या मतदारसंघातून निवडणुकीला उभी राहिले. निवडणुकीत पराभव झाला, तर निमूटपणे सिंगापूरला जायचे, असे मी ठरविले होते. पण, योगायोगाने २०१५ साली नव्याचा निवडणुकीत विजय झाला. (वृत्तसंस्था)

# वर्षा गायकवाडांना बहिणीसाठी हवी धारावीची जागा

**नेते म्हणतात, कार्यकर्त्यांना उमेदवारी द्या!**

◆ **मुंबई, २३ ऑक्टोबर**

मुंबईतील काँग्रेसच्या उमेदवारांची नावे निश्चित करण्यासाठी वर्षा गायकवाड, अशोक जगताप आणि माजी मंत्री अस्लम शेख यांची समिती तयार करण्यात आली आहे. गेल्या आठवड्यात झालेल्या बैठकीत धारावी मतदारसंघाचा मुद्दा चर्चेत आला होता. त्यावेळी वर्षा गायकवाड यांनी आपली बहीण ज्योती गायकवाड यांना उमेदवारी देण्याचा आग्रह धरला होता. मात्र, त्या बैठकीत अशोक जगताप यांनी ज्योती यांच्या उमेदवारीला विरोध केल्याचे समजते.



उत्तर-मध्य मुंबईतून वर्षा गायकवाड लोकसभेत निवडून गेल्या. त्यानंतर गेल्या चार महिन्यांपासून ज्योती गायकवाड कुटुंबीयांचा परंपरागत मतदारसंघ असलेल्या धारावी विधानसभा मतदारसंघात सक्रिय झाल्या. अनेक कार्यक्रमांतून त्यांचे बॅनर्स लावले जात आहेत. ज्योती गायकवाड अलिकडेच सक्रिय झाल्या असल्यामुळे त्यांच्याऐवजी धारावी मतदारसंघात आतापर्यंत काम करणाऱ्या संदेश कोंडविलकर आणि सुनील अहिरे यांना उमेदवारी देण्याचा प्रस्ताव जगताप यांनी मांडल्याचे सांगण्यात येते. त्यामुळे ज्योती गायकवाड यांना उमेदवारी मिळणार का, हा औत्सुक्याचा विषय झाला आहे. (वृत्तसंस्था)

# राजकुमार बडोले यांचा राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये प्रवेश

## अर्जुनी मोरगावमधून उमेदवारी मिळण्याची शक्यता

◆ **मुंबई, २३ ऑक्टोबर**

भंडारा जिल्ह्यातील अर्जुनी मोरगाव मतदार संघांतील भाजपाचे माजी आमदार राजकुमार बडोले यांनी आज राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये प्रवेश केला. यावेळी पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष अजित पवार, कार्याध्यक्ष प्रफुल्ल पटेल आणि प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे यांनी त्यांचे स्वागत केले. त्यामुळे आमदार मनोहर चंद्रिकापुरे यांचा पत्ता कट होणार असल्याचे स्पष्ट झाले आहे.



मनोहर चंद्रिकापुरे यांच्याबाबत मतदारसंघात असलेली नाराजी पाहता अजित पवार यांनी चंद्रिकापुरे यांना उमेदवारी देण्यास नकार दिला. अर्जुनी मोरगाव मतदारसंघ राष्ट्रवादी काँग्रेसच्या वाट्याला येणार असल्याने बडोले यांनी उमेदवारीबाबत राष्ट्रवादी काँग्रेसकडून चाचपणी सुरू केली होती. महायुतीचे घटक पक्ष म्हणून दोन्ही मित्र पक्षांच्या नेत्यांशी चर्चा करूनच बडोले यांना प्रवेश दिला असल्याचे अजित पवार यांनी सांगितले. त्यामुळे बडोले अर्जुनी मोरगाव मतदारसंघातून राष्ट्रवादी काँग्रेसच्या चिन्हावार महायुतीचे उमेदवार असल्याचे सांगितले जात आहे. राज्यात महायुतीचे सरकार आणण्यासाठी जे करणे अपेक्षित आहे, ते सर्व आम्ही करणार असल्याचे अजित पवार यांनी सांगितले.

राष्ट्रवादी काँग्रेसचे जे उमेदवार निश्चित आहेत, त्यांना पहिल्या यादीत उमेदवारी देण्यात येणार आहे. महायुतीत सर्व जागांवर चर्चा पूर्ण होताच यादी जाहीर करण्यात येणार असून, निश्चित असलेल्या उमेदवारांना एबी फॉर्म देण्यात आल्याचे अजित पवार यांनी स्पष्ट केले. (वृत्तसंस्था)

# पुतण्याच्या महत्त्वाकांक्षेने काकांची पंचाईत

◆ **नाशिक, २३ ऑक्टोबर**

राज्याच्या राजकारणात सातत्याने चर्चेत राहिलेल्या भुजबळ कुटुंबातील गेल्या लोकसभा निवडणुकीपासून असलेली चलबिचल थांबताना दिसत नाही. विधानसभा निवडणुकीच्या पृष्ठभूमीवर हेविवेट मंत्री म्हणून गणल्या जाणाऱ्या छगन भुजबळ यांचे पुत्र पंकज यांची विधान परिषदेवर वर्णी लागल्यानंतर पुतणे समीर यांची राजकीय महत्त्वाकांक्षा उफाळून आल्याने भुजबळ यांच्यासमोर नवा पेच निर्माण झाला आहे. समीर यांच्या हालचालींचा वेग लक्षात घेता ते विपरित निर्णय घेण्याची शक्यता जास्त आहे. महायुतीमध्ये विशेषतः राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये चिंतेचे वातावरण आहे.



२००९ च्या लोकसभा निवडणुकीत नाशिकमधून खासदारकीचा टिळा लागल्यानंतर सतत दहा वर्षांपासून समीर भुजबळ यांची पाटी कोरी राहिली आहे. तुर्तास, समीर यांच्याकडे पक्षाचे मुंबई प्रांताध्यक्षपद असले तरी, जनतेतून निवडून जाण्याची महत्त्वाकांक्षा त्यांना स्वस्थ बसू देत नसल्याचे अलिकडे स्पष्ट झाले आहे. छगन भुजबळ राज्य मंत्रिमंडळात असताना पुत्र पंकज यांची राज्यपालनियुक्त विधान परिषद सदस्य म्हणून वर्णी लागली. मात्र, आपली राजकीय कवाडे पुढील पाच वर्षांसाठी बंद होणार असल्याची भावना समीर यांना कासावीस करीत असावी. त्याच अनुषंगाने नांदगावची जागा शिवसेनेची असतानाही समीर भुजबळ यांनी तिथे शक्ती दाखविण्याची तयारी चालवली आहे. (वृत्तसंस्था)

**भुजबळ यांच्याकडून सारवासारव!**

वस्तुतः, सुहास कांदे आणि समीर भुजबळ हे महायुतीत असतानाही भुजबळ यांनी नांदगावच्या मैदानात उतरण्याचा निर्धार केला. महाविकास आघाडीत ही जागा उद्धव गटाला जाते. त्या पक्षाने मनमाडचे माजी नगराध्यक्ष गणेश धात्रक यांना तयारीचे निर्देश दिले असताना त्यांच्याऐवजी आपणास चाल द्यावी, अशी समीर भुजबळ यांची इच्छा असल्याची चर्चा आहे. त्यासाठी प्रसंगी शिवबंधन बांधण्याची त्यांनी तयारी केल्याचे सांगण्यात येते. या घडामोडीबाबत समीर यांच्या पक्षांतराची चर्चा निव्वळ अफवा असल्याचे म्हणत मंत्री भुजबळ यांनी ते अजित पवार गटासोबतच असल्याचे ठामपणे सांगितले. अर्थात, जो काही निर्णय घ्यायचा, त्याबाबत समीर हे काकांना अंधारात ठेवणे अशक्यप्राय आहे. ही बाब लक्षात घेता येत्या काही तासांतील घडामोडी भुजबळ परिवारासाठी महत्त्वाच्या आहेत.

# सोमवारी अर्ज दाखल करणार अजित पवार

◆ **बारामती, २३ ऑक्टोबर**



आगामी विधानसभा निवडणुकीसाठी बारामती विधानसभा मतदारसंघातून उपमुख्यमंत्री अजित पवार सोमवारी आपला उमेदवारी अर्ज दाखल करणार आहेत.

सोमवारी सकाळी दहा वाजता कसब्यातून मिरवणुकीने निघून दुपारी एक वाजता तहसील कचेरीत अजित पवार अर्ज दाखल करतील. त्यानंतर श्री क्षेत्र कण्हेरी येथे दुपारी दोन वाजता सभा होणार आहे. अजित पवार आठव्यांदा विधानसभेसाठी आपला उमेवदारी अर्ज दाखल करणार आहेत. सलग सात वेळा अजित पवार बारामतीतून आमदार म्हणून विधानसभेवर निवडून गेले आहेत. गेल्या निवडणुकीत ते राज्यात सर्वाधिक मताधिक्याने विजयी झाले होते. (वृत्तसंस्था)

# नीलेश राणेंच्या शिवसेना प्रवेशासाठी मुख्यमंत्री आज कुडाळमध्ये

◆ **सावंतवाडी, २३ ऑक्टोबर**

माझा शिवसेना प्रवेश निश्चित झाला असून, मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या उपस्थितीत बुधवारी सायंकाळी ४ वाजता कुडाळ हायस्कूलच्या मैदानावर होणाऱ्या सभेत मी शिवसेनेत प्रवेश करणार, असे माजी खासदार नीलेश राणे यांनी पत्रकारांना सांगितले. आपले वडील नारायण राणेंची राजकीय सुरुवात ज्या पक्षातून आणि ज्या धनुष्यबाण चिन्हावर झाली, त्याच चिन्हावर मला निवडणूक लढविण्याची संधी मिळत आहे, याचा मला आनंद व समाधान आहे, असे राणे यांनी सांगितले. बाळासाहेब ठाकरे यांच्यावर आपले प्रेम होते आणि ते आजही आहे. यापुढेही राहणार आहे, असे सांगत निवडणूक जिंकणे हेज आपले प्रथम उद्दिष्ट असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.महायुतीच्या जागा वाटपात कुडाळ मालवण विधानसभा क्षेत्र शिवसेनेच्या वाट्याला आला आहे. गेल्या काही वर्षांपासून मी या मतदारसंघात काम करीत आहे. तेव्हापासून मला भाजपा, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व पालकमंत्री रवींद्र चव्हाण यांनी सहकार्य दिले आहे, असे ते म्हणाले. (वृत्तसंस्था)



# दोन माजी मुख्यमंत्र्यांना व अन्य तिघांच्या नातलगांना उमेदवारी

**श्यामकांत जहागीरदार**

◆ **नवी दिल्ली, २३ ऑक्टोबर**

झारखंड विधानसभा निवडणुकीसाठी भाजपाने ६६ उमेदवारांची पहिली यादी जाहीर केली. १३ आणि २० नोव्हेंबर अशा दोन टप्प्यात निवडणूक होणार आहे.

राज्यातील सात मुख्यमंत्र्यांपैकी पाच मुख्यमंत्री भाजपाच्या बाजूला असल्याचे आधी म्हटले होते. बाबुलाल मरांडी, अर्जुन मुंडा, रघुवरदास, मधु कोडा आणि चम्पई सोरेन हे ते पाच मुख्यमंत्री आहेत. यातील बाबुलाल मरांडी, अर्जुन मुंडा आणि रघुवरदास हे तीन मुख्यमंत्री मूळ भाजपाचे तर, मधू कोडा आणि चम्पई सोरेन बाहेरचे आहेत.

रघुवरदास ओडिशाचे राज्यपाल असल्यामुळे राज्याच्या राजकारणात नाही. भाजपाजवळ आज सक्रिय असे चार माजी मुख्यमंत्री आहेत. यात बाबुलाल मरांडी, अर्जुन मुंडा, मधू कोडा आणि चम्पई सोरेन आहेत. यापैकी भाजपाने बाबुलाल मरांडी आणि चम्पई सोरेन यांना रिंगणात उतरवले आहे. चम्पई सोरेन यांच्यासोबत त्यांच्या मुलालाही भाजपाने उमेदवारी दिली.




अर्जुन मुंडा, रघुवरदास आणि मधू कोडा यावेळी निवडणुकीच्या रिंगणात नाही. मात्र, भाजपाने या तिघांच्या निकटच्या नातलगांना उमेदवारी दिली आहे. रघुवरदास यांची सुन पूर्णिमा यांना भाजपाने उमेदवारी दिली आहे. अन्य एक माजी मुख्यमंत्री आणि माजी केंद्रीय मंत्री अर्जुन मुंडा यांच्या ऐवजी त्यांची पत्नी मीरा मुंडा, तर माजी मुख्यमंत्री मधू कोडा यांच्या पत्नी गीता कोडा यांना भाजपाने उमेदवारी दिली आहे.

पूर्णिमा साहू यांना भाजपाने जमशेदपूर पूर्व विधानसभा मतदारसंघातून रिंगणात उतरवले आहे. राज्यपालपदाचा राजीनामा देत पुन्हा झारखंडच्या राजकारणात सक्रिय होण्याची रघुवरदास यांची इच्छा होती, असे म्हणतात. १९९५ मध्ये पहिल्यांदा रघुवरदास जमशेदपूर पूर्व मतदारसंघातून विजयी झाले होते. या मतदारसंघातून ते सलग पाच वेळा विजयी झाले. या मतदारसंघातून निवडून येत रघुवरदास राज्याचे पहिले गैरआदिवासी तसेच पाच वर्षांचा कार्यकाळ पूर्ण करणारे पहिले मुख्यमंत्री ठरले. २०१९ च्या विधानसभा निवडणुकीत मात्र या मतदारसंघात रघुवरदास यांचा धक्कादायक पराभव झाला. २०१९ च्या विधानसभा निवडणुकीच्या आधी रघुवरदास यांचे त्यांच्याच मंत्रिमंडळातील मंत्री सरयू राय यांच्याशी मतभेद झाले. त्यामुळे दास यांनी जमशेदपूर पश्चिममधील सरयू राय यांची उमेदवारी कापली. याचा बदला म्हणून सरयू राय यांनी जमशेदपूर पूर्व मतदारसंघात अपक्ष उमेदवार म्हणून अर्ज भरला आणि मुख्यमंत्री असलेल्या रघुवरदास यांचा धक्कादायक पराभव केला. भाजपाने तेव्हा जमशेदपूर पश्चिमचीही जागा गमावली होती.

# अर्जुन मुंडांच्या पत्नी मीरा पोटका मतदारसंघात भाजपा उमेदवार

◆ **नवी दिल्ली, २३ ऑक्टोबर**

पोटका मतदारसंघातून भाजपाने माजी मुख्यमंत्री अर्जुन मुंडा यांच्या पत्नी मीरा मुंडा यांना उमेदवारी दिली आहे. यावेळी विधानसभा निवडणूक लढवण्यास अर्जुन मुंडा यांनी असमर्थता दर्शवल्यामुळे भाजपाने त्यांच्या पत्नी मीरा यांना निवडणुकीच्या रिंगणात उतरवले. पोटका हा अर्जुन मुंडा यांचा मतदारसंघ आहे. त्यामुळे त्यांचा विजय निश्चित मानला जात आहे.



माजी मुख्यमंत्री चम्पई सोरेन यांचे पुत्र बाबुलाल यांना भाजपाने घाटशीला मतदारसंघातून रिंगणात उतरवले आहे. घाटशीला हा तसा चम्पई सोरेन यांचा मतदारसंघ आहे. या मतदारसंघातून ते अनेकवेळ निवडून आले आहेत. पण, आपल्या मुलासाठी त्यांनी यावेळी घाटशिला मतदारसंघ सोडत सरायकेलाची निवड केली. हेमंत सोरेन तुरुंगात गेल्यानंतर अल्पकाळासाठी चम्पई सोरेन मुख्यमंत्री झाले होते. पण, सहा महिन्यांच्या आतच त्यांना राजीनामा द्यावा लागला. त्यामुळे दुखावलेल्या चम्पई सोरेन यांनी झामुमोचा राजीनामा देत भाजपात प्रवेश केला. भाजपाने आणखी एका माजी मुख्यमंत्र्याच्या सुनेला आणि विद्यमान मुख्यमंत्र्याच्या म्हणजे हेमंत सोरेन यांच्या भावजयीला सीता सोरेन यांना जामताडामधून उमेदवारी दिली. सीता सोरेन या राज्याचे माजी मुख्यमंत्री शिबू सोरेन यांचे ज्येष्ठ पुत्र दुर्गा सोरेन यांच्या पत्नी आहेत. झामुमोत आपल्याला डावलण्यात येत असल्याचा आरोप करत त्यांनी काही दिवसांपूर्वी झामुमोचा राजीनामा देत भाजपात प्रवेश केला.

राज्याचे अन्य एक माजी मुख्यमंत्री मधू कोडा यांना भ्रष्टाचाराच्या आरोपात शिक्षा झाल्यामुळे ते विधानसभा निवडणूक लढवू शकत नाही. त्यामुळे भाजपाने त्यांच्या पत्नी गीता कोडा यांना जगन्नाथपूर राखीव मतदारसंघातून उमेदवारी दिली. (तभा वृत्तसेवा)

# जरांगेंनी बोलावली इच्छुकांची बैठक

◆ **सातारा, २३ ऑक्टोबर**

प्रत्येकालाच वाटते मलाच उमेदवारी मिळाली पाहिजे. तुम्ही सगळेजण म्हणाले. मलाच पाहिजे, तरी मी रुसणार नाही अन् रागावणारही नाही. पण, एक उमेदवार देण्याचा प्रयत्न असेल, असे मत मराठा आंदोलक मनोज जरांगे पाटील यांनी व्यक्त केले. येत्या गुरुवारी जरांगेंनी सर्व इच्छुकांची बैठक बोलावली आहे. मी राजकीय नेतृत्व करणार नाही, मी पक्षासारखे मतही लादणार नाही. सगळ्यांचे योगदान आहे. माझ्यासाठी सगळे सारखे असल्याचे जरांगे पाटील म्हणाले. एका मतदारसंघातून चार-पाच जण अर्ज भरा. कुणीही बॉंड लिहून देऊ नका. आधी आम्हाला विचारा. ज्याने आपली जिरवली, त्याची आपल्याला जिरवायची, हे सुद्धा डोक्यात ठेवायचे आहे, असे ते म्हणाले. २० ऑक्टोबरला इच्छुकांची आपण बैठक घेतली होती, ती लढायचे की पाडायचे यासाठी होती. आता २४ ऑक्टोबरला पुन्हा एकदा आपण इच्छुकांची बैठक घेत आहोत. आपण त्यांना सांगितले होते. (वृत्तसंस्था)

CMYK

# धाराशिव दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

## राणाजगजितसिंह पाटील यांचा इटकळ भाजपाकडून सत्कार

**तभा वृत्तसेवा**
**इटकळ, दि.२३ ऑक्टोबर -**
भारतीय जनता पक्षाच्या वतीने तुळजापुर विधानसभेसाठी राणाजगजितसिंह पाटील यांना उमेदवारी मिळाल्या बद्दल इटकळ येथील भारतीय जनता पक्षाच्या कार्यकर्त्याकडून शुभेच्छा देण्यात आल्या.

यावेळी माजी सरपंच राहुल बागडे, अरविंद पाटील, मेघराज जाधव, श्रीकृष्ण मुळे, प्रदीप हुक्किरे, काशिनाथ लकडे, नागनाथ



लकडे व आस्तिक बागडे यांची उपस्थिती होती.



## ▶▶ संक्षिप्त वृत्त...



### साठे, चव्हाण, होनाळकर यांचा निवडीबद्दल सत्कार

**लोहारा, दि.२३ ऑक्टोबर -**
लोहारा तालुक्यातील माकणी येथील शुभम साठे यांची भाजपा जिल्हा युवा वॉरीयर्स सहसंयोजकपदी व जेवळी (द) येथील बालाजी चव्हाण यांची युवा मोर्चा भाजप जिल्हा उपाध्यक्षपदी तर हिप्परगा (रवा) येथील मुरलीधर होनाळकर यांची युवा मोर्चा जिल्हा चिटणीसपदी, बुद्धीजीवी जिल्हा संयोजक प्रमोद पोतदार यांची निवड झाल्याबद्दल मित्र परिवाराच्या वतीने शहरात यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी भाजपा माजी तालुकाध्यक्ष राजेंद्र पाटील, कृ.उ. बाजार समिती माजी सभापती दिनकरराव जावळे-पाटील, माजी जिल्हा चिटणीस विक्रांत संगशेट्टी, भाजपा तालुका सरचिटणीस इकबाल मुल्ला, भाजपा तालुका सरचिटणीस दगडु तिगाडे, मिलाप मित्र मंडळाचे संस्थापक अध्यक्ष दादाभाई मुल्ला, रामेश्वर जाधव, दाऊद शेख आदी उपस्थित होते.

### ७६ व्यक्तींनी केली १७३ अर्जाची खरेदी

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.२३ ऑक्टोबर -**
जिल्ह्यात ४ विधानसभा मतदारसंघ येतात.यामध्ये २४०-उमरगा, २४१-तुळजापूर,२४२-उस्मानाबाद आणि २४३ -परंडा विधानसभा मतदारसंघाचा समावेश आहे. २३ ऑक्टोबर रोजी नामांकन अर्ज दाखल करण्याच्या दुसऱ्या दिवशी एकाही उमेदवाराने निवडणुकीसाठी अर्ज दाखल केला नाही. २३ ऑक्टोबर रोजी ७६ इच्छूक उमेदवारांनी १७३ अर्ज खरेदी केले. यामध्ये उमरगा विधानसभा मतदारसंघासाठी ११ व्यक्तींनी २४ अर्ज, तुळजापूर मतदारसंघासाठी २० व्यक्तींनी ५२ अर्ज,उस्मानाबाद मतदारसंघासाठी ३१ व्यक्तींनी ७० अर्ज आणि परंडा विधानसभा मतदारसंघासाठी १४ व्यक्तींनी २७ अर्जाची खरेदी केली.



### हिप्परगा येथे भावार्थ रामायणास उत्साहात प्रारंभ

**इटकळ दि.२३ ऑक्टोबर -**
तुळजापुर तालुक्यातील हिप्परगा ताड येथे श्री संत एकनाथ महाराज लिखित श्री भावार्थ रामायण ग्रंथातील किष्किंधा कांडास मोठ्या उत्साहात प्रारंभ झाला आहे. मौजे हिप्परगा ताड येथे श्री भावार्थ रामायण ग्रंथ वाचन निरुपणाचे हे दुसरे वर्ष असुन मोठ्या भक्ती भावाने ग्रामस्थ राम भक्तांच्या वतीने दररोज सायंकाळी ७ ते ९ या वेळेत ही राम कथा संपन्न होते. रामभक्त ग्रामस्थ ही मोठ्या संख्येने राम कथेचा आनंद घेत आहेत एकूण सात कांड २९७ अध्याय असलेल्या या भावार्थ रामायण ग्रंथातील बालकांड, अयोध्याकांड,अरण्यकांड अशा ३ कांडाची समाप्ती झाली असून ४ था किष्किंधा कांडास सुरुवात झाली आहे. या राम कथेमुळे गावातील अगदी चौथी पाचवीची मुल मुली सुमधुर असे रामायण ग्रंथाचे वाचन करीत आहेत. पहाटे पाच वाजता गावात रामफेरी व सायंकाळी ७ ते ९ ग्रंथ वाचन निरूपण यामुळे अवघा गाव राममय झाले असल्याचे दिसून येत आहे.

### २४ ऑक्टोबरपर्यंतच सर्व देयके सादर करा

**लोहारा, दि.२३ ऑक्टोबर -**
संचालक, संचालनालय लेखा व कोषागारे,मुंबई यांच्या आभासी बैठकीतील निर्देशानुसार सर्व आहरण व संवितरण अधिकारी यांनी आपल्या कार्यालयातील देयके जिल्हा कोषागार कार्यालयाकडे २४ ऑक्टोबरपर्यंतच सादर करावीत, असे आवाहन जिल्हा कोषागार अधिकारी अर्चना नरवडे यांनी केले आहे. २४ ऑक्टोबरपर्यंतच सर्वांनी आपले वेतन देयके,उत्सव अग्रिमाची व निवृत्तीवेतनाची देयके कोषागारात सादर करण्याची दक्षता घ्यावी म्हणजे वेतन वेळेवर करणे सोईचे होईल.२६ ऑक्टोबर ते २९ ऑक्टोबर २०२४ या कालावधीत कोषागाराची संगणकीय प्रणाली बंद राहणार आहे. त्यामुळे यादिवशी कोणतेही देयक कोषागारात स्वीकारले जाणार नाही. त्यामुळे वेतन देयकास विलंब झाल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी ही आहरण व संवितरण अधिकारी यांची राहणार आहे, याची कृपया गांभीर्याने नोंद घ्यावी, असे जिल्हा कोषागार अधिकारी अर्चना नरवडे यांनी कळविले आहे.

### रंगनाथ लांडगे यांचे निधन

**तुळजापूर, दि.२३ ऑक्टोबर -**
तुळजापूर तालुक्यातील बिजनवाडी येथील रंगनाथ दादाराव लांडगे वय-१०६ वर्ष यांचे राहत्या घरी दिनांक २२ ऑक्टोबर रोजी वृधापकाळाने निधन झाले. त्याच्या पश्चात एक मुलगा, सून, नातू, नातवंडे असा परिवार आहे.



बिजनवाडी येथील स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात आले. यावेळी गावातील आजी-माजी प्रतिष्ठित नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# शिवसेना शिंदे गटाच्या पहिल्या यादीत आ.तानाजीराव सावंतचा समावेश

**परंडा मतदारसंघात कार्यकर्ते, पदाधिकाऱ्याकडून आनंद व्यक्त**

**तभा वृत्तसेवा**
**परंडा, दि.२३ ऑक्टोबर -**
विधानसभा निवडणुकीसाठी शिवसेना शिंदे गटाकडून उमेदवारांची पहिली यादी जाहीर करण्यात आली असून या यादीत शिवसेना पक्षाने ४५ जागांसाठी उमेदवार जाहीर केले आहेत. शिवसेना शिंदे गटाने परंडा विधानसभा मतदारसंघातून दुसऱ्यांदा आ.प्रा.डॉ. तानाजीराव सावंत यांना उमेदवारी दिली आहे . उमेदवारांच्या पहिल्याच यादीत नाव जाहीर होताच विधानसभा परंडा मतदारसंघातील गावागावात पदाधिकारी, कार्यकर्त्यांनी जल्लोष करून आनंद साजरा केला.

शिवसेना पक्ष एकसंघ होता त्यावेळी परंडा विधानसभा मतदारसंघातून आमदार तानाजीराव सावंत यांना २०१९ ला उद्धवजी ठाकरे यांनी उमेदवारी दिली होती. या निवडणुकीत आमदार सावंत यांनी विजयश्री खेचून आणला होता.

अडीच वर्षाच्या काळात बराच फेरबदल झाला शिवसेना पक्ष फुटला यावेळी शिवसेना पक्ष व धनुष्यबाण एकनाथ शिंदे यांच्याकडे गेला आमदार सावंत ही एकनाथ शिंदे बरोबर बंडखोरी करून गेले आणि महाराष्ट्रात शिवसेना शिंदे गट व भाजपाची सत्ता स्थापन झाली.

या अडीच वर्षाच्या काळात सावंत यांनी मतदारसंघात दोन ते अडीच हजार कोटी पेक्षा अधिक रुपयांचे तर परंडा शहरात दीडशे ते दोनशे कोटीची विकास कामे करीत तसेच जिल्ह्यातील तेरणा सहकारी साखर कारखाना भाडेतत्त्वावर सुरू केला.

याचबरोबर परंडा मतदारसंघात शेत तिथे रस्ता अभियान अंतर्गत स्वखर्चाने अनेक रस्त्याची कामे केली. तसेच स्वतःच्या मतदारसंघाबरोबरच धाराशिव जिल्ह्यात व महाराष्ट्रात महाआरोग्य शिबिर घेऊन जनतेची सेवा केली आहे.

महाविकास आघाडीचा मात्र अद्याप उमेदवार जाहीर न झाल्याने परंडा मतदारसंघात महाविकास आघाडीचा कोण उमेदवार असणार याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

**धनंजय सावंत यांनी घेतला उमेदवारी अर्ज**

प्रा.डॉ.तानाजीराव सावंत यांना मंगळवारी रात्री उमेदवारी घोषीत होताच. बुधवारी त्यांचे पुतणे जि.प.चे माजी उपाध्यक्ष धनंजय सावंत आणि विक्रम सावंत यांनी प्रत्येकी दोन असे चार उमेदवारी अर्ज विकत घेतले आहेत. हे विकत घेतलेले अर्ज त्यांनी नेमके कोणासाठी घेतले हे मात्र स्पष्ट होवू शकले नाहीये.



## निवडणुकीची कामे दक्षतेने, काळजीपूर्वक करा

**निवडणूक निरीक्षक (खर्च) अलुरु राव**

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.२३ ऑक्टोबर -**
महाराष्ट्र विधानसभा सार्वत्रिक निवडणुकीचा कार्यक्रम भारत निवडणूक आयोगाने जाहीर केला आहे. निवडणुकीची आदर्श आचारसंहिता लागू झाली आहे. विविध विभागाच्या अधिकारी कर्मचाऱ्यांकडे निवडणूकविषयक जबाबदाऱ्या सोपविण्यात आल्या आहे. निवडणूकविषयक कामे निवडणूक आयोगाच्या मार्गदर्शक सूचनेनुसार दक्षतेने आणि काळजीपूर्वक करण्यात यावी. असे निर्देश निवडणूक निरीक्षक (खर्च) अलुरु व्यंकट राव यांनी दिले.

आज २३ ऑक्टोबर रोजी जिल्हाधिकारी कार्यालयातील सभागृहात निवडणूक खर्चविषयक संबंधित अधिकाऱ्यांच्या बैठकीत श्री.राव बोलत होते.यावेळी जिल्हा निवडणूक अधिकारी तथा जिल्हाधिकारी डॉ.सचिन ओंबासे, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ.मैनाक घोष व पोलीस अधीक्षक संजय जाधव यांची प्रमुख उपस्थिती होती.

श्री.राव पुढे म्हणाले की, निवडणूकविषयक कामे करताना काही अडचणी येत असतील तर त्याबाबत वरिष्ठांचे मार्गदर्शन घ्यावे. निवडणूकविषयक माहिती आवश्यकता त्या विहित नमुन्यात वेळेत सादर करावी. निवडणूकविषयक अहवाल देखील निर्धारित वेळेत सादर करण्याची जबाबदारी पार पाडावी असे त्यांनी सांगितले.

डॉ.ओम्बासे म्हणाले, जिल्ह्यातील चारही विधानसभा निवडणुकीची तयारी पूर्ण करण्यात आली आहे. विविध पथके गठीत करण्यात आली आहे. निवडणुकीच्या काळात आचारसंहितेचा भंग होणार नाही याबाबत सूचना देण्यात आल्या आहे. जिल्हयात जे मतदान केंद्र क्रिटिकल आहेत अशा मतदान केंद्रावर वेब कास्टिंग करण्यात येणार आहे. मतदान केंद्रावर मोबाईल घेऊन जाण्यास बंदी राहणार आहे.याबाबत सर्व निवडणूक निर्णय अधिकारी यांच्या स्तरावरून सूचना देण्यात येत असल्याचे त्यांनी सांगितले.

या बैठकीला उपजिल्हाधिकारी उदयसिंह भोसले, जि.प.चे मुख्य लेखा व वित्त अधिकारी सचिन इगे, राज्य उत्पादन शुल्क विभागाचे अधीक्षक गणेश बारगजे, जिल्हा अग्रणी बँक प्रबंधक चिन्मय दास, जिल्हा सूचना व विज्ञान अधिकारी पुरुषोत्तम रुकमे व खर्च विषयक संबंधित अधिकारी उपस्थित होते. तर व्हिडिओ कॉन्फरन्सच्या माध्यमातून सर्व निवडणूक निर्णय अधिकारी व सहायक निवडणूक निर्णय अधिकारी उपस्थित होते. निवडणूकविषयक तयारीची माहिती संबंधित अधिकाऱ्यांनी दिली.यावेळी निवडणूकविषयक माहितीचे सादरीकरण जिल्हा परिषदेचे मुख्य वित्त व लेखा अधिकारी सचिन इगे यांनी दिली.

## कोरोना संकटात काम केलेल्या कंत्राटी आरोग्य कर्मचाऱ्यांना मोबदला मिळेना

**तभा वृत्तसेवा**
**मुरुम, दि.२३ ऑक्टोबर -**
कोरोनाच्या संकटकाळात आरोग्य विभागाने कंत्राटी पद्धतीवर हजारो आरोग्य कर्मचाऱ्यांना मानधन देण्याच्या अटीवर कामावर घेऊन आरोग्य सेवा करायला भाग पाडले. मात्र कामाचा मोबदला पूर्णपणे देण्यात अद्यापही आरोग्य विभाग चालढकल करत आहे .अश्या तक्रारी कंत्राटी कर्मचाऱ्यांकडून मांडल्या जात आहेत विशेषतः राज्याचे आरोग्यमंत्री व स्वतः पालकमंत्री असलेल्या डॉ. सावंत यांच्या जिल्ह्यातीलच कंत्राटी कर्मचारी बोंबाठा उठवत असल्याने आश्चर्य व्यक्त करण्यात येत आहे.

कोरोनाच्या संकटात आरोग्य खात्याकडे पुरेसे मनुष्यबळ नसल्याने कंत्राटी पद्धतीवर आरोग्य कर्मचाऱ्यांची नेमणूक करण्यात आल्या होत्या.

यामध्ये मानधन देण्याच्या अटीवर अनेकांना कोवीड सेंटर तर कांहींना सरकारी दवाखाना तसेच कोरोना प्रतिबंध लसीकरण केंद्रावर काम सोपविण्यात आले होते यातील अनेक कंत्राटी कर्मचाऱ्यांना त्यांच्या कामाचा मोबदला देण्यात आले तर कांही जणांचे मोबदला संबंधितानी लपाधप्पा केल्याचे संशय व्यक्त करण्यात येत आहेत त्यामुळे आजही असंख्य कंत्राटी कर्मचारी मोबदला मिळण्यापासून वंचित राहिले आहेत.

याबाबत उत्तम उदाहरण म्हणजे मुरूम रुग्णालयात कंत्राटी पद्धतीवर काम केलेल्या कर्मचारीकडून ऐकवयास आणि पाहण्यात मिळाले आहे सप्टेंबर २०२१ ते ३० जानेवारी २०२२ या कालावधीत कोरोना प्रतिबंधक लसीकरण मोहिमेत केंद्रस्थानी काम केलेल्या कर्मचाऱ्याना त्यांच्या कामाचा मोबदला देण्यात आलेला नाही.

त्यामुळे कामाचा मोबदला तात्काळ देण्यात यावी अशी मागणी कंत्राटी कर्मचाऱ्यांनी २३ ऑक्टोबर २४ रोजी मुरूम रुग्णालयाचे वैद्यकीय अधिक्षक तसेच धाराशिव शल्य चिकित्सक आणि खा. ओमराजे निंबाळकर यांच्याकडे लेखीपत्राद्वारे मागणी केली आहेत दरम्यान राज्याचे आरोग्यमंत्री पद उपभोगलेल्या धाराशिव जिल्ह्यातीलच कंत्राटी आरोग्य कर्मचाऱ्यावर ही दशा आल्याने इतर जिल्ह्यातील कंत्राटी कर्मचाऱ्यांचे हाल काय असेल?

## ...नेते, पदाधिकारी यांना होऊ लागली कार्यकर्त्यांची आठवण

**तभा वृत्तसेवा**
**तेर, दि.२३ ऑक्टोबर -**
महाराष्ट्र राज्यातील विधानसभा निवडणुका जाहीर होताच विविध राजकीय पक्षांच्या नेते,पदाधिकारी यांना कार्यकर्त्यांची आठवण येऊ लागली आहे.

महाराष्ट्र राज्यातील विधानसभा निवडणुका जाहीर होताच विविध राजकीय पक्षांचे नेते,पदाधिकारी यांना कार्यकर्ते यांची आठवण येत असल्याने एक प्रकारे कार्यकर्ते यांचा सन्मान होऊ लागला आहे.

विविध राजकीय पक्षाचे नेते, पदाधिकारी विधानसभा मतदारसंघातील गावांची यादी, त्या त्या गावातील पक्षाचे एकनिष्ठेने काम करणारे कार्यकर्ते यांच्या यादी तयार करण्यात काम करीत आहेत तर बुथ प्रमुख कोण आहे? नसेल तर कोणत्या कार्यकर्ते यांच्याकडे ही जबाबदारी सोपवावी याचीही व्यूहरचना आखण्यात येत आहे. विधानसभा मतदारसंघात परगावी कोण कोण कोणत्या गावात, शहरात राहतात यांची माहितीही काढली जात आहे.त्याच प्रमाणे बुथवरील मतदार यादीत कोण कोण मयत झालेले आहेत याची माहितीही कार्यकर्ते यांच्याकडून विचारणा करण्यात येत आहे. प्रचारासाठी वाहन कोणते लावावे, मतदानाच्या दिवशी कोणत्या वाहानातून कोणत्या बुथवरील मतदार आणावे यांचे आराखडे कार्यकर्ते यांना विचारून आखले जात आहेत.

विधानसभा मतदारसंघात विविध प्रकारच्या कामांसाठी नेते, पदाधिकारी यांना कार्यकर्ते यांची आठवण येत असून नेते,पदाधिकारी कार्यकर्ते यांच्याशी संपर्क करीत आहेत.प्रचार सभा कोठे घ्यावी, कधी घ्यावी, मार्गदर्शनासाठी कोणाला कोणत्या गावात कोणत्या नेत्याला बोलवावे याची आखणी केली जात आहे त्यासाठी कार्यकर्ते यांच्याशी यासंदर्भात नियोजनासाठी नेते, पदाधिकारी कार्यकर्ते यांच्याशी संपर्क करीत आहेत.

त्यामुळे विविध राजकीय पक्षातील कार्यकर्ते यांना सुगिचे दिवस आले असून विधानसभा निवडणुकीमुळे नेते, पदाधिकारी कार्यकर्ते यांच्याशी संपर्क साधत असल्याने विधानसभा निवडणुकीच्या निमित्ताने कार्यकर्ते यांची आठवण होऊ लागली आहे.विविध निवडणुकीत नेते, पदाधिकारी यांना उमेदवारी देताना मोजकेच कार्यकर्ते आठवतात पण पक्षासाठी काम करणारे कार्यकर्ते यांची आठवण येत नाही. गुत्तेदाराची कामे वाटताना मोजकेच पदाधिकारी, कार्यकर्ते आठवतात पण पक्षासाठी काम करणारे कार्यकर्ते यांची आठवण येत नाही. विविध राजकीय, विकासात्मक चर्चा करण्यासाठी आयोजित बैठकीला अनेक कार्यकर्ते यांना बैठकीचा निरोपच दिला जात नाही. निवडणूक जाहीर होताच कार्यकर्त्यांना बोलावले जाते अशी प्रतिक्रिया कार्यकर्ते बोलून दाखवत आहेत.

## गणेश विद्यालय, सुबोध विद्यामंदिरच्या वतीने मतदान जनजागृती प्रभातफेरी

**तभा वृत्तसेवा**
**तेरखेडा, दि.२३ ऑक्टोबर -**
विधानसभा निवडणुकीचा कार्यक्रम निवडणूक आयोगाने जाहिर केला आहे. राज्यात विधानसभेसाठी एकाच टप्प्यात मतदान होणार असून २० नोव्हेंबर रोजी मतदान प्रक्रिया पार पडणार आहे. अवघे काही दिवस शिल्लक राहिले असून राज्यात मतदानाचा टक्का वाढविण्यासाठी निवडणूक आयोगाने जोरदार प्रयत्न सुरू केले आहेत.





वाशी तालुक्यातील तेरखेडा येथील गणेश विद्यालय व सुबोध विद्यामंदिर या दोन्ही शाळेच्या वतीने संपूर्ण गावात मतदान जनजागृती प्रभात फेरी काढण्यात आली.

२० नोव्हेंबर रोजी होणाऱ्या विधानसभा निवडणुकीत सर्वांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, तसेच निवडणूक हा एक उत्सव आहे आणि या उत्सवात आपण सहभागी होऊन आपल्या मतदानाचा हक्क बजावावा असे आव्हान गणेश विद्यालय व सुबोध विद्यामंदिरातील मुलामुलींनी प्रभातफेरीच्या माध्यमातून गावातील लोकांना केले.

ढोल, ताशा वाजत गाजत मतदार राज्या जागा हो, स्वतःचे मत,अनमोल मत, ना जातीवर, ना धर्मावर बटन दाबा कार्यावर अश्या घोषणा देत व घोषणांचे फलक हाती घेऊन दोन्ही शाळेने संपूर्ण गावात फेरी काढली.

गणेश विद्यालयाचे मुख्याध्यापक अरुण बोंदर, सुबोध विद्यामंदिरचे मुख्याध्यापक दत्तप्रसाद शिंदे तसेच दोन्ही शाळेचे शिक्षक चंद्रशेखर कुरवलकर, बाळासाहेब शिंगाडे, सुजितकुमार मुळे, शिवाजी पांढरे निरजकुमार त्रिपाठी, सचिन पाटील, प्रभुलिंग ढोले, संदीप ढोले, महेश भालेकर शाळेच्या शिक्षिका जयश्री तांदळे, संगीता ठाकूर, राणी गरड, रुजीता पाटील व कर्मचारी गणेश आवटे, महेश शिंदे, लहू तकीक, अक्षय घोलप, विद्यार्थी उपस्थित होते.

## नितीन राठोड यांची उबाठाकडून तुळजापुरातून मागणी

**तभा वृत्तसेवा**
**जळकोट, दि.२३ ऑक्टोबर -**
तुळजापूर विधानसभा मतदारसंघासाठी उद्धव बाळासाहेब ठाकरे सेनेकडे आलियाबाद येथील शिवसेना उबाठाचे कट्टर कार्यकर्ते नितीन राठोड यांनी पक्षाकडे उमेदवारीची मागणी केली आहे.



सध्या विधानसभा निवडणुकीचे वातावरण तापत आहे. आपापल्या पक्षाकडे उमेदवारीची अनेकांनी मागणी केली आहे. आलियाबाद येथील शिवसेनेचे कट्टर कार्यकर्ते नितीन राठोड यांनी पक्षाकडे उमेदवारीची मागणी एका पत्राद्वारे केली आहे. राठोड यांनी पक्षाच्या माध्यमातून सर्वसामान्यांच्या अडचणी सोडवल्या आहेत. आपला जलसंपर्क मोठा असून, त्या जनसंपर्काचा या निवडणुकीत फायदा होणार आहे. लोकसभा निवडणुकीत ओमराजे निंबाळकर यांना भरघोस मतांनी निवडून आणण्यात नितीन राठोड यांचा सिंहाचा वाटा होता. पक्षश्रेष्ठी काय निर्णय घेणार? याकडे लक्ष लागून राहिले आहे.


# जन्मजात मूकबधिर असलेल्या दोन वर्षीय सुहानावर यशस्वी शस्त्रक्रिया

### मुरूम येथील राष्ट्रीय बाल स्वास्थ्य तपासणी पथकाची किमया; कुंटूंबासह चिमुकलीच्या चेहऱ्यावर फुलले हास्य

**तभा वृत्तसेवा**
**मुरुम, दि.२३ ऑक्टोबर -**
जन्मजातच मूक व बधिर असलेल्या केसर जवळगा येथील दोन वर्षीय चिमुकली सुहाना हरून इनामदार हिच्यावर यशस्वीरीत्या मोफत शस्त्रक्रिया झाल्याने ती आता हळूहळू खेळू बागडु लागली आहे. यामुळे सुहानाचे हास्य फुलत आहे.

येथील मुरूम ग्रामीण रुग्णालयाच्या राष्ट्रीय बाल स्वास्थ्य कार्यक्रम अंतर्गत स्थापन असलेल्या पथकाने याबाबत पुढाकार घेऊन ही किमया घडवून आणली आहे

मुरूम येथील ग्रामीण रुग्णालयात राष्ट्रीय बाल स्वास्थ्य कार्यक्रम अंतर्गत पथकाची नियुक्ती आहे. या पथकामार्फत मुरूम व परिसरातील शाळा आणि अंगणवाडीतील विद्यार्थ्यांचे आरोग्य तपासणी वर्षातून दोनदा केले जाते. सदर



पथकाने सन २०२४ मध्ये केलेल्या आरोग्य तपासणीत केसर जवळगा येथील दोन वर्षीय सुहाना हरून इनामदार ही चिमुकली मूक व बधिर असल्याचे आढळून आली. त्यामुळे तिच्यावर शस्त्रक्रिया करणे आवश्यक होते.

त्यामुळे सदर पथकाचे प्रमुख वैद्यकीय अधिकारी डॉ.जी.एल.कांबळे तसेच वैद्यकीय अधिकारी टी.पी.सोनवणे यांनी वैद्यकीय अधिक्षक एम.एम. अरदळे यांच्या मार्गदर्शनाखाली चिमुकली सुहाना हिच्यावर शस्त्रक्रिया करण्यासाठी मिरज येथील यशश्री हॉस्पिटलमध्ये दाखल केले.

या हॉस्पिटलमध्ये दि.२१ ऑक्टोबर २४ रोजी सुहाना हिच्यावर मोफत व यशस्वीरीत्या शस्त्रक्रिया करण्यात आली विशेष म्हणजे सदरच्या शस्त्रक्रियासाठी दहा ते बारा लाख रुपये खर्च येत असते शस्त्रक्रिया यशस्वीपणे झाल्याने सुहाना आता हळूहळू चालू शकते, बोलू शकते व ऐकू शकते.

मूक व बधिर असलेल्या चिमुकल्या सुहानाच्या आयुष्याला फुलवल्याने इनाम दार कुटुंब व ग्रामस्थांनी रुग्णालयाच्या टीमचे आभार मानले आहे. यामुळे मुरूम परिसरात सध्या या आगळ्यावेगळ्या यशस्वी शस्त्रक्रियेचीच चर्चा आहे.

## फर्दापूर परिसरात वाघूर नदी पात्रात गावठी हातभट्टी वर छापा

तभा वृत्तसेवा

फर्दापूर दि २३ फर्दापूर शिवारातील वाघूर नदी पात्रात गावठी हातभट्टीवर फर्दापूर पोलिसांनी सोमवार दि.२१ दुपारी २ वाजेच्या सुमारास छापा टाकून ३६ हजार रुपयांचे दारू बनविण्याचे रसायन व दारू जप्त करून नष्ट करण्यात आले.यात एका आरोपीला अटक करण्यात आली आहे.

पोलीस सूत्रांकडून मिळालेल्या माहितीनुसार उपविभागीय पोलिस अधिकारी डॉ.दिनेश कुमार कोल्हे व सहायक पोलीस निरीक्षक प्रफुल्ल साबळे यांच्या पथकाने सोमवारी वाघूर नदी पात्रातील गावठी हातभट्टी बनविणाऱ्या अड्ड्यावर छापा टाकला असता त्यांना त्या ठिकाणी ६ हजार रुपये किमतीचे १५ लिटर क्षमता असलेल्या पांढऱ्या रंगाच्या ४ कॅन व ३० हजार रुपये किमतीचे १५० लिटर क्षमता असलेल्या रसायनाच्या ४ टाक्या असा एकूण ३६ रुपये किमतीचे रसायन व दारू जप्त करून जागेवर नष्ट करण्यात आले.याप्रकरणी आरोपी गुलशन समशेर तडवी (वय.४१ रा.फर्दापूर ता. सोयगाव) याच्या विरोधात फर्दापूर पोलीस स्टेशन मध्ये गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

## सिल्लोड शहरात महावीर स्तभाचे सुशोभीकरण

सिल्लोड ( प्रतिनिधी ) दि.२२, पालकमंत्री अब्दुल सत्तार यांनी सिल्लोड शहरात भगवान महावीर स्तंभाचे सुशोभीकरण केले. त्यासोबतच शहरात भव्य भगवान महावीर प्रवेशद्वार उभारले , श्री कुंथुनाथ भगवान मंदिर उभारण्यासाठी भरीव मदत केली , याभागात रस्त्यांचा विकास तसेच या मंदिराच्या भागाला अहिंसा झोन घोषित केले . मुख्य रस्ता - टिळक नगर ते जैन स्थानक मार्गाला अरिहंत मार्ग नामकरण केले . माहेश्वरी स्तंभ , महाराजा अग्रसेन चौकाचे सुशोभीकरण यासारख्या विविध कामांसह त्यांचे समाज बांधवांना कायम सहकार्य असते. याबाबद्दल ऋण व्यक्त करीत सकल राजस्थानी समाज, जैन समाज, गुजराथी, सिंधी, माहेश्वरी समाजाच्या वतीने मंत्री अब्दुल सत्तार यांचा भव्य सत्कार करण्यात आला. तसेच विधानसभा निवडणुकीत समाज बांधव मंत्री अब्दुल सत्तार यांच्या पाठीशी असल्याचे सांगत सदरील समाज बांधवांच्या वतीने ना. अब्दुल सत्तार यांना जाहीर पाठिंबा देण्यात आला. सकल राजस्थानी, गुजराथी, जैन, माहेश्वरी, सिंधी समाज बांधवांचा स्नेह मिलन कार्यक्रम शहरातील गॅलक्सि लॉन्स येथे पार पडला. या कार्यक्रमास मंत्री अब्दुल सत्तार यांची प्रमुख उपस्थिती होती.



सर्व समाज बांधवांचा विश्वास आणि पाठिंबा आयुष्यात प्रेरणादायी असून आत्मविश्वास वाढविणारा आहे असे स्पष्ट करीत समाज बांधवांनी केलेला सत्कार म्हणजे मी केलेल्या कामाची पावती असल्याचे प्रतिपादन मंत्री अब्दुल सत्तार यांनी सत्काराला उत्तर देतांना व्यक्त केले.

यावेळी विनोद मंडलेचा, रमेश कासलीवाल, रमेश लाठी, सुदर्शन अग्रवाल, सुभाष जैन, गिरीश शहा आदींनी मनोगत व्यक्त करीत मंत्री अब्दुल सत्तार यांना पाठिंबा जाहीर केला. कार्यक्रमास ज्येष्ठ विधिज्ञ ॲड विलास सोनवणे हे देखील आवर्जून उपस्थित होते. यावेळी त्यांनी मनोगत व्यक्त करीत आपण पक्षाचा युतीधर्म पाळत मंत्री अब्दुल सत्तार यांच्या पाठिशी असून त्यांना आजच विजयाच्या शुभेच्छा देत असल्याचे सांगितले.

याप्रसंगी माजी सभापती रामदास पालोदकर, कृउबा समितीचे संचालक नंदकिशोर सहारे, सकल राजस्थानी समाजाचे ता.अध्यक्ष विनोद मंडलेचा, माहेश्वरी समाज तालुकाध्यक्ष रमेश लाठी , श्रावक जैन संघाचे ता. अध्यक्ष धर्मचंद मंडलेचा, श्वेतवाल जैन समाजाचे ता.अध्यक्ष पद्माकर गोसावी, दिगंबर जैन समाजाचे तालुकाध्यक्ष अनिल लोहाडे , खंडेलवाल समाजाचे तालुका अध्यक्ष कैलास खंडेलवाल, अग्रवाल समाजाचे ता.अध्यक्ष सुदर्शन अग्रवाल, गुजराती समाज संघटनेचे तालुकाध्यक्ष गिरीश शहा ,सिंधी समाज तालुका अध्यक्ष रामशेठ कटारिया, जैन अल्पसंख्यांक आयोगाचे सदस्य सुनील पाटणी, कुंथुनाथ जैन मंदिराचे अध्यक्ष सुभाष शेठ जैन, शिवसेना शहरप्रमुख मनोज झंवर, व्यापारी महासंघाचे रमेश शेठ कासलीवाल , गोपाल चांडक, बाबू पटेल, संतोष गिल्डा, जगदीश घई, रवी सकलेचा , सत्यनारायण गट्टानी, संजय पांडे ,सुनील पगारिया, दिलीप झंवर, अनिल बोरा, डॉ.आशिष गोलेच्या, मुकेश खंडेलवाल , सत्यनारायण खंडेलवाल, रणछोडदास होलानी, सत्तूसेट गट्टानी, राजू खिंवसरा, रमण बडाळे, सुनील कटारिया ,सुशील ओस्तवाल ,डॉक्टर सी पी जैन ,डॉक्टर सुराणा ,डॉक्टर बाफना ,नंदू पगारिया, पंकज शहा , विनोद भोजवाणी, आशिष कटारिया आदींची उपस्थिती होती.

## विधानसभा निवडणूकीत पैशांचा वापर निदर्शनास आल्यास थेट आयकर विभागाला कळवा

छत्रपती संभाजीनगर, दि.२३(जिमाका):- विधानसभा निवडणूक २०२४ च्या दरम्यान काळ्या पैशाचा वापर रोखण्यासाठी आयकर विभागाने थेट जनतेला आवाहन केले आहे. अशाप्रकारे रोख रकमेचा वापर, वाटप रकमेची वाहतुक अशा बाबतीत नागरिकांनी आयकर विभागाला द्यावी, माहिती देणाऱ्याची ओळख गुप्त ठेवण्यात येईलअसेही कळविण्यात आले आहे.याबाबत छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील सर्व ९ विधानसभा मतदार संघातील नागरिकांनी काळ्या पैशाच्या वापराची माहिती गोपनियरित्या द्यावी. त्यासाठी टोल फ्री क्रमांक १८००-२३३-०३५५, १८००-२३३-०३५६ वर माहिती द्यावी तसेच ९४०३३९०९८० या व्हॉट्सप क्रमांकावर उपलब्ध असलेली छायाचित्रे, व्हिडीओ पाठवावीत. तसेच nagpur.addidit.invincometax.gov.in व nashik.addidit.invincometax.gov.in या इमेलवरही माहिती देऊ शकता. माहिती देणाऱ्या व्यक्तिचे नाव गुप्त ठेवले जाईल,असे जिल्हा अग्रणी व्यवस्थापक मंगेश केदार यांनी केले आहे.


## शगुन कलेक्शनचे अनावरण

मुंबई : सेन्को गोल्ड अँड डायमंड्स ही भारतभरातील १६७ शोरूम्ससह संपूर्ण भारतातील अग्रगण्य ज्वेलरी विक्रेते असून ८५ वर्षांचा वारसा असलेला ब्रँड आणि अनेक शोरूम आहेत. सेन्को गोल्ड अँड डायमंड्सला सलग चौथ्या वर्षी टीआरए द्वारे दुसऱ्या क्रमांकाचा सर्वात विश्वासार्ह ज्वेलरी ब्रँड म्हणून सूचीबद्ध करण्यात आला आहे. हि धनतेरस, सेन्को गोल्ड अँड डायमंड्स तुमच्यासाठी खरेदीदाराच्या आवडी आणि आवडीनुसार १ग्राम ते २००ग्राम पर्यंतचे विविध प्रकारचे कलेक्शन आणि डिझाईन्स घेऊन येत आहेत. भव्य उत्सवाचा एक भाग म्हणून, श्री-धन डोळ्यांसमोर ठेवून, सेन्को गोल्ड अँड डायमंड्सने शगुन कलेक्शन अंतर्गत १ लाखांपासून सुरू होणाऱ्या वधूच्या डिझाईन्ससह अनेक डिझाइन्स आणि ज्वेलरी पीस लॉन्च केले आहेत. शगुन कलेक्शनमध्ये समकालीन हलक्या वजनापासून शाही पारंपारिक डिझाईन्सपर्यंत सर्व प्रसंगांसाठी उत्कृष्ट नमुने उपलब्ध आहेत.

## आईकू 13 लवकरच स्नॅपड्रॅगन ८ एलिटसह येत आहे

पुणे : उच्च-कार्यक्षमता स्मार्टफोन ब्रँडआईकू ने आज घोषणा केली की त्याचा फ्लॅगशिप स्मार्टफोन,आईकू १३ लवकरच नवीनतम स्नैपड्रैगन ८ एलीट प्रोसेसरसह लॉन्च होईल. आईकूच्या क्वालकॉम सोबतच्या धोरणात्मक सहकार्याने ब्रँडला नवीनतम स्नॅपड्रॅगन प्रोसेसर भारतात आणण्यास मदत केली आहे आणि त्याचे उच्च-कार्यक्षमता फ्लॅगशिप उपकरण आजपर्यंत लॉन्च केले आहे. आईकू हा एक जागतिक स्मार्टफोन ब्रँड आहे ज्यामध्ये अतुलनीय कामगिरीचा मजबूत प्रस्ताव आहे. आईकू चा अर्थ आय क्वेस्ट ऑन आणि ऑन आहे, जो सर्वोत्कृष्ट होण्यासाठी ब्रँडचा अथक प्रयत्न प्रतिबिंबित करतो. आईकू कामगिरी शोधणाऱ्या तरुणांसाठी अनोखे अनुभव देण्यासाठी वचनबद्ध आहे. आईकू स्मार्टफोन अशा ग्राहकांसाठी तयार केले आहेत जे मोठ्या स्वप्नांच्या शोधात आहेत. आईकू बीएमडब्ल्यू एम मोटरस्पोर्ट चा प्रीमियम भागीदार आहे.

## स्पेल बी २०२४ च्या अंतिम फेरीला सुरुवात

नाशिक - भारतातील सर्वात विश्वासार्ह जीवन विमा कंपन्यांपैकी एक एसबीआय लाइफ इन्शुरन्सतर्फे मिर्चीच्या सहकार्याने मुंबईत 'बी स्पेलबाउंड' एसबीआय लाइफ स्पेल बी २०२४ च्या १४व्या सत्राच्या क्षेत्रीय अंतिम फेरींची सुरुवात झाल्याचे जाहीर करण्यात आले. ही स्पर्धा देशभरातील सर्वात हुशार तरुण स्पेलर्सला एकत्र आणते आणि आता पुढच्या टप्प्यात प्रवेश करत आहे. या टप्प्यावर वेगवेगळ्या विभागांतील विजेते ठरविले जातील आणि ते राष्ट्रीय स्तरावर प्रगती करतील. मुंबई क्षेत्रीय अंतिम फेरीत ४३ शाळांमधील १७,४७० विद्यार्थ्यांपैकी ५५ विद्यार्थ्यांनी भाग घेतला.मुंबईच्या कांदिवली ईस्ट येथील चिल्ड्रन अकॅडमी स्कूलच्या इयत्ता नववीमध्ये शिकणाऱ्या अनया शिराळी या १४ वर्षांच्या विद्यार्थिनीने तिच्या अप्रतिम स्पेलिंग कौशल्य आणि बौद्धिक प्रतिभेमुळे एसबीआय लाइफ स्पेल बी २०२४ची मुंबई क्षेत्रीय अंतिम फेरी जिंकली. ती आता डिसेंबर २०२४ मध्ये होणाऱ्या राष्ट्रीय पातळीवरील भव्य अंतिम फेरीत इतर शहरांतील निवडलेल्या सहभागींसोबत स्पर्धा करेल.

## च्विप्पी चे हायपरलोकल सोशल मीडिया ॲप सुरु

छत्रपति संभाजीनगर - च्विप्पी हा एक अभिनव हायपरलोकल सोशल नेटवर्किंग प्लॅटफॉर्म असून महाराष्ट्रातील शहरांमध्ये, गावांमध्ये आणि ४४०००हून अधिक खेड्यांमध्ये त्याचे अधिकृतरीत्या लाँच करण्याची घोषणा करण्यात आली.हा प्लॅटफॉर्म लोकांना एकत्र आणण्यासाठी, त्यांच्यातील परस्पर संवाद वाढवण्यासाठी, आणि व्यापाराला चालना देण्यासाठी तयार करण्यात आला आहे. या मंचाच्या माध्यमातून स्थानिक पातळीवर लोकांचे विविध समुदाय तयार होतील आणि त्यांच्यात उत्साहवर्धक संवादाची देवाणघेवाण होईल. च्विप्पी हे ॲप समान आवडी अथवा समान कार्यक्रमांच्या आधारे वापरकर्त्यांना जोडत असल्यामुळे, कुटिरोद्योग / गृहउद्योग चालवणाऱ्या छोट्या व्यावसायिकांना आपल्याच परिसरात आपला व्यवसाय वाढवण्यासाठी ते एक वरदान ठरेल.

## टाटा मोटर्सकडून 'कस्टमर केअर महोत्सव' लॉंच

मुंबई, २३ ऑक्टोबर २०२४: टाटा मोटर्स या भारतातील सर्वात मोठ्या व्यावसायिक वाहन उत्पादक कंपनीने व्यावसायिक वाहन ग्राहकांसाठी सर्वसमावेशक ग्राहक सहभाग उपक्रम 'कस्टमर केअर महोत्सव २०२४'च्या लाँचची घोषणा केली. हा उपक्रम २४ डिसेंबर २०२४ पर्यंत राबवण्यात येईल. हा अद्वितीय व मूल्यवर्धित उपक्रम देशभरातील २५०० हून अधिक अधिकृत सर्विस आऊटलेट्समध्ये आयोजित करण्यात येईल, जेथे ताफा मालक व ड्रायव्हर्स माहितीपूर्ण चर्चांसाठी एकत्र येतील. या महोत्सवाच्या माध्यमातून ग्राहक अनेक फायद्यांचा आनंद घेऊ शकतात, जसे प्रशिक्षित टेक्निशियन्सकडून करण्यात येणारे बारकाईने वेईकल चेक-अप्स आणि मूल्यवर्धित सेवा. तसेच, ड्रायव्हर्सना सुरक्षित व इंधन-कार्यक्षम ड्रायव्हिंग पद्धतींबाबत व्यापक प्रशिक्षण आणि कंपनीच्या संपूर्ण सेवा २.० उपक्रमांतर्गत सर्वोत्तम ऑफरिंग्ज मिळतील.




## सुनील बनकर यांचे निधन

तभा वृत्तसेवा

कन्नड, दि.२३ ऑक्टोबर : सार्वजनिक बांधकाम विभागात कार्यरत असलेले सुनील काशिनाथ बनकर वय ५५ वर्ष यांचे अल्पशा आजाराने दि.२३ रोजी पहाटे ०५ वाजेच्या सुमारास प्राणज्योत मालवली आहे. ते सार्वजनिक बांधकाम विभाग पूर्व मध्ये वरीष्ठ लिपिक या पदावर कार्यरत होते,त्यांच्या पश्चात वडील, पत्नी,मुले,मुली,जावई ,नातवंडे असा परिवार आहे दुपारी शोकाकूल वातावरणात देवलोक स्मशानभूमीत अंत्यसंस्कार झाले.

## पंचायत समिती शिक्षण विभाग कन्नडच्या वतीने दिव्यांग विद्यार्थ्यांसाठी आलिम्को शिबिर व आरोग्य तपासणी शिबीर संपन्न

तभा वृत्तसेवा

नाचनवेल: दि.२२. ऑक्टोंबर- कन्नड तालुक्यातील समग्र शिक्षा समावेशीत शिक्षण पंचायत समिती शिक्षण विभाग कन्नड अंतर्गत शिक्षण घेणाऱ्या दिव्यांग विद्यार्थ्यांना कृत्रिम साहित्य साधनेचा लाभ देण्याकरिता आलिम्को शिबिर व आरोग्य तपासणी शिबीराचे आयोजन करण्यात आले होते..!

शिबिर कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी तालुक्याच्या गटशिक्षणाधिकारी नीता श्रीमाळ होत्या, कार्यक्रम प्रसंगी उपशिक्षणाधिकारी तथा गटशिक्षणाधिकारी नीता श्रीमाळ यांनी उपस्थित पालकांना व दिव्यांग विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले, यावेळी म्हणाल्या की दिव्यांग विद्यार्थ्यांना शिक्षण घेत असतांना अनेक अडचणींचा सामना करावा लागतो, परंतु शिक्षण घेत असतांना बरेच दिव्यांग विद्यार्थी त्यांच्या अडचणीमुळे शिक्षण अर्धवट सोडून जातात, परिणामी त्यांची शिक्षण घेण्याची इच्छा अपूर्ण राहते, म्हणून आशा दिव्यांग विद्यार्थ्यांचे शिक्षण घेण्याचे स्वप्न अर्धवट राहू नये त्यासाठी विविध प्रकारच्या दिव्यांग विद्यार्थ्यांना कृत्रिम साहित्य साधने उपलब्ध करून देणाऱ्या आलिंमको संस्थेमार्फत हे शिबीर दरवर्षी राबवल्या जाते, आणि अनेक दिव्यांग विद्यार्थ्यांनी या शिबिराचा लाभ घेऊन यशस्वीपणे आपले शिक्षण घेत आहे,



आजच्या दिव्यांग आलिंमको शिबिरासाठी व वैद्यकीय तपासणी शिबिरासाठी श्रीमती जयश्री चव्हाण मॅडम शिक्षणाधिकारी (प्राथमिक) अश्विनी लाटकर शिक्षणाधिकारी (माध्यमिक) नीता श्रीश्रीमाळ उपशिक्षणाधिकारी तथा गटशिक्षणाधिकारी डि. टी.शिंदे सर शिक्षण विस्तार अधिकारी निकेत दलाल सर जिल्हा समन्वयक (आय ई डी) गणेश बेडके जिल्हा समन्वयक (आय ई डी) यांचे विशेष सहकार्य व मार्गदर्शन लाभले, तसेच दिव्यांग विद्यार्थ्यांची आरोग्य तपासणीसाठी ग्रामीण रुग्णालय कन्नड चे वैद्यकीय अधिकारी डॉ. सिकंदर डॉ.घोडके व त्यांचे सहकारी डॉक्टर तसेच आलिंमको शिबिरासाठी जबलपूर येथील तज्ञ डॉक्टर उपस्थित होते, या शिबिरामध्ये कन्नड तालुक्यातील एकूण १४७ दिव्यांग विद्यार्थ्यांनी लाभ घेतला, दिव्यांग आलिंमको शिबीर यशस्वी करण्यासाठी समावेशीत शिक्षणचे विशेषतज्ञ श्री. नितीन वाघ, प्रशांत अहिराव, लेखाधिकारी खुशाल राठोड विषय साधन व्यक्ती.संदीप कुलकर्णी,. झिंगराव सपकाळ, विशेष शिक्षक .कडूबा भुसारी ,शिवाजी घुले, प्रविण वाकेकर, उत्तम आघाडे. चेंडके सर तसेच सर्व केंद्रप्रमुख व केंद्रीय मुख्याध्यापक यांचे सहकार्य लाभले.

## फर्दापूर गावात विधानसभा निवडणुकीच्या अनुषंगाने पंथसंचलन



तभा वृत्तसेवा

फर्दापूर दि २३ विधानसभा निवडणूक २०२४ च्या अनुषंगाने मंगळवार दि.२२ फर्दापूर गावात फर्दापूर पोलीस स्टेशन व बी.एस.एफ लष्कराच्या वतीने पथसंचलन करण्यात आले.यावेळी फर्दापूर पोलिस स्टेशन सहा पोलिस निरीक्षक प्रफुल्ल साबळे सुग्रीव चाटे तसेच बी एस एफ लष्कराचे कर्मचारी पोलिस कर्मचारी यावेळी पंथसंचलना सहभागी झाले होते.

## सोयगाव तालुक्यातील गोंदेगावच्या सरपंच पदी शिवसेना(उध्दव ठाकरे) गटाच्या शिवसेना अतुल बोरसे यांचा तीन मतांनी विजयी



तभा.वृत्तसेवा

सोयगाव,दि.२३ ऑक्टोबर

तालुक्यातील गोंदेगाव ग्रामपंचायतच्या सरपंच पदी शिवसेना(उद्धव ठाकरे) गटाच्या अतुल बोरसे यांची तीन मतांनी निवड झाली आहे.गोंदेगाव ग्रामपंचायतीच्या सरपंच पदाच्या निवडी साठी मंगळवारी विशेष सभेचे आयोजन करण्यात आले सकाळी दहा वाजता उमेदवारी अर्ज भरण्यत आले दरम्यान सरपंच पदासाठी उद्धव ठाकरे गटाच्या शिवसेनेचे अतुल बोरसे व दिपक खोडके दोन अर्ज प्राप्त झाले दुपारी बारा वाजता छाननी व सभेला सुरुवात झाली.यामध्ये मतदान प्रक्रिया झाली या प्रक्रियेत यात अतुल बोरसे यांना एकूण आठ तर दिपक खोडके यांना पाच मते मिळाली.अतुल बोरसे यांचा तीन मतांनी विजय झाला दुपारी दोन वाजता निवडणूक निर्णय अधिकारी लक्ष्मण जाधव यांनी घोषणा केली.यावेळी निवडणूक अधिकारी म्हणून लक्षण जाधव,संतोष राऊत (तलाठी) ग्रामसेवक के.बी. दौड,पोलीस पाटिल मनोहर निकम,पोलीस उपनिरीक्षक शेख,राजू बर्डे,उपसरपंच पल्लवी चौधरी,ग्राम पंचायत सदस्य ज्योती नगरे,वनमाला निकम,मंगलबाई पाटील,दिपक अहिरे,गौरव तेली,हिम्मत मोरे,छाया सूर्यवंशी,रेखा पवार,मनीषा ढकरे,विजय सोनवणे, तसेच,शरद निकम,विजय नगरे,ईश्वर ढाकरे,प्रशांत चौधरी,राजू कोळी,सतीश पाखले,वैभव पाखले,भूषण पाखले,शाम देवरे,विजय निकम,नासिर शे बशीर,सचिन बोरसे,आबा चौधरी,अकबर शेख,सुधाकर अहिरे,गोरख निकम,घुले,संकेत पवार,दिलीप पवार ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## ड्रग्स विरोधातील कारवाईमुळे पेडलर भूमीगत ट्रॅव्हल्स एजन्सीच्या कार्यालयांना बजावणार नोटीस

छत्रपती संभाजीनगर : अंमली पदार्थ प्रतिबंध पथकाने शहरात ड्रग्स पाठवणाऱ्या रॅकेटची पाळेमुळे शोधली आहे. हमसफर ट्रान्सपोर्ट मार्फत हा माल येत असल्याचे निष्पन्न झाल्याने एनडीपीएस पथकाने हमसफरला सिल ठोकले आहे. असा प्रकार शहरातील इतर ठीकाणी होत असल्याचा संशय असल्याने एनडीपीएस पथकाने ट्रॅव्हल्स एजन्सीच्या कार्यालयांना देखील नोटीस बजावण्यात येणार असल्याचे सांगितले आहे. विशेष म्हणजे या कारवाईमुळे शहरातील पेडलर भुमीगत झाले असल्याची माहिती सूत्रांनी दिली आहे.

शहरात नशेच्या औषधीं विक्री करणाऱ्या महिलेला अंमली पदार्श प्रतिबंध पथकाने अटक केल्यानंतर मोठे रॅकेट असल्याचे तपासात समोर आले आहे. महिलेने दिलेल्या माहिती आधारे पेडलर पेडलर युसुफ खान महेबूबखान यासह त्याला ट्रॅव्हल्समधून माल पाठवणारा नाशिकचा फार्मा एजंसीचा चालक प्रविण गवळी याला अटक करण्यात आली आहे. ज्या ट्रॅव्हल्समधून मालाचा पुवठा करण्यात येत होता, ती हमसफर ट्रान्सपोर्टचे शहरातील कार्यालय अंमली पदार्थ प्रतिबंध पथकाने सिल केले आहे. आरोपी हे हमसफर सारख्या आणखी किती ट्रॅव्हल्स ऐजंसींच्या माध्यमांतून अशा औषधी पाठवित होत्या याचा शोध घेण्यात येत असल्याचे पोलिसांनी सांगितले आहे.

यातील आरोपी मेडीसीन सप्लायर आरोपी प्रविण गवळी यांच्या नावाने हिरकणी फार्मा नावाची मेडीकल ऐजंसी आहे. मात्र गवळीने या धंद्यासाठी सुयोग फार्मा नावाच्या ऐजंसीचा वापर केल्याचे समोर आले आहे. सोमवारी एनडीपीएसच्या पथकाने चांदवड गाठत या ऍजीसीची झाडाझडती घेत चौकशी केली.

आरोपी प्रविण गवळी याच्या नावे दोन फर्म आहेत. एक हिरकणी आणि एक सुयोग फर्मा अशा नावाने आहे. मात्र सुयोग फर्म बनावट फर्म असून ती अस्तित्वात नसल्याचे पोलिसांच्या तपासात समोर आले आहे. विशेष म्हणजे याच फर्म आरोपी गवळी हा नशेच्या औषधींचा व्यवसाय करित होता. तो सहा महिने अशी फर्म वापरायचा आणि सहा महिन्यांनी दुसऱ्या बनावट फर्मची नोंदणी करून त्याद्वारे नशेच्या औषधींचा धंदा करीत होता.

**पर्चेस ऑर्डर शिवाय वाहतूक नको**

शहरातील इतर ट्रॅव्हल्स एजंसींना देखील एनडीपीएस पथकाकडून मेडीकल पर्चेस ऑर्डर असल्याशिवाय अशा कोणत्याही मालाची वाहतूक करु नये याबाबत नोटीस बजावणार असल्याची माहिती पोलिस निरीक्षक गिता बागवडे यांनी दिली.

**मुख्य सूत्रधाराचा शोध सुरुच**

या रॅकेटची पाळेमुळे थेट उत्तर प्रदेश, मध्य प्रदेश येथील गोळ्या औषधी बनविणाऱ्या कंपन्यांपर्यंत पोहचत आहेत. एक पथक गाजीयाबाद (मध्यप्रदेश) येथील मुख्य सूत्रधाराला पकडण्यासाठी पाठविण्यात आले असून हा सूत्रधार हातात आल्यानंतर रॅकेट मोठ्या प्रमाणात उघड होण्याची शक्यता आहे. यानंतर हे सिरप बनवून त्याचा पुरवठा करणाऱ्या कंपन्यांना पत्रव्यव्हार करण्यात येणार असल्याची माहिती सुत्रांनी दिली.

## नशेच्या गोळ्या विकणारा अटकेत २०० गोळ्या जप्त

छत्रपती संभाजीनगर : नशेच्या गोळ्यांची विक्री करण्यास आलेल्या व्यक्तीला सिटीचौक पोलिसांनी छापा टाकून पकडल्याची घटना मंगळवारी सायंकाळी लेबर कॉलनी भागात घडली. सपोनि मनिषा हिवराळे यांना गुप्त बातमीदाराने माहिती दिली की, एक व्यक्ती हर्षनगर लेबर कॉलनीच्या मोकळ्या जागेमध्ये नशेच्या गोळ्या विक्री करण्यासाठी येणार आहे. मिळालेल्या बातमीवरून सपोनि मनिषा हिवराळे, पोलीस उपनिरीक्षक अर्जुन कदम, सफौ मुनीर पठाण, पोह साळुंके, पोअ इप्पर, पोअं वाहूळ, पोअ मनोहर त्रिभुवन, पोअ गायकवाड यांनी हर्षनगर, लेबर कॉलनी गाठले. येथील मोकळ्या मैदानाजवळ पोहोचल्यानंतर सापळा लावण्यात आला. काही वेळानंतर मिळालेल्या माहिती सारखा व्यक्ती त्या ठिकाणी आला. पोलिसांनी छापा टाकून त्याला ताब्यात घेतले. त्याची चौकशी केली असता शेख अतिक पिता शेख अब्दुल्ला असे नाव त्याने सांगितले. त्याची अंगझडती घेतली असता त्याच्या ताब्यातून ७०० रुपये किंमतीच्या नशेच्या २०० गोळ्या जप्त करण्यात आल्या. ही कारवाई पोलीस निरीक्षक पोलीस आयुक्त प्रविण पवार, पोलीस उपायुक्त नितीन बगाटे, सहाय्यक पोलीस आयुक्त संपत शिंदे, पोलीस निरीक्षक निर्मला परदेशी यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली.

## बनावट लग्न करुन बबली फरार; तरुणास तीन लाखाला गंडा

छत्रपती संभाजीनगर : बोगस आधारकार्ड वापरून एका बबलीने तरूणाशी लग्न करीत तीन लाखांना फसविले. अंगावरील दागिने घेऊन मामाच्या दुचाकीवरून दुल्हन फरार झाल्याची घटना कुबेर गेवराई परिसरात सोमवारी (दि.२१) उघडकीस आली. याप्रकरणी तिच्यासह ७ जणांवर गुन्हा दाखल करण्यात आला. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, कुबेर गेवराई (छत्रपती संभाजीनगर) येथील हरिचंद्र अशोक कुबेर (वय ३३) हा लग्नासाठी वधू शोधत असताना मुळे (पूर्ण नाव माहीत नाही) यांनी हरिचंद्र कुबेर यांचे चुलते पांडुरंग कुबेर यांना स्थळ असल्याचे सांगितले. जोगेश्वरी येथे २६ मार्च २०२४ रोजी नातेवाईकांच्या उपस्थितीत मुलगी बघण्याचा कार्यक्रम झाला. त्यावेळी मुलीची आई मीरा हिने सांगितले, की मुलीला वडील नसून चुलते कुंडलिक चव्हाण हेच सर्व काही पाहतात. असे म्हणून कुसुम अजय चव्हाण या नावाने मुलगी दाखविण्यात आली. मुलगी सुंदर आहे, शिकलेली आहे, असे यावेळी सांगण्यात आले. शिवाय हुंडा मिळणार नाही. उलट लग्नासाठी ३ लाख रुपये द्या आणि लग्न तुमच्या पद्धतीने गावी किंवा मंदिरात कोठेही करा, असे यावेळी कुबेर यांना सांगितले. या सर्व अटींना कुबेर यांनी होकार दिला. २७ मार्च रोजी कुबेर गेवराई येथे लग्न लावण्याचे ठरले. करमाड येथे लग्नाचा बस्ता बांधण्यात आला आणि त्यानंतर त्याच दिवशी दुपारी कुबेर गेवराई येथे लग्न झाले. लग्नानंतर नववधू ही हरिचंद्र कुबेर यांच्या घरी गेवराई येथे ३ एप्रिल २०२४ पर्यंत राहिली. त्याच दिवशी नववधू कुसुमला मामाचा फोन आला, की तिचे आजोबा आजारी त्यांना भेटण्यासाठी आपल्याला फाटा येथे जायचे आहे. त्यामुळे आणि हरिचंद्र दोघे भेटण्यासाठी निघाले. ते जालन्यात आल्यानंतर जालना येथेच थांबा मी तेथे येत असे मामाकडून कळविण्यात त्यानंतर मामा दुचाकीने तेथे त्यावेळी कुसुमच्या चुलत भावाच्या अंत्यविधीसाठी बुलढाणा जायचे आहे, असे म्हणून नववधू हीं अंगावरील सोन्याच्या दागदागिन्यांसह मामाच्या दुचाकीवर बसून निघून गेली. त्यानंतर हरिचंद्र कुबेर व त्यांच्या नातेवाइकांनी कुसुम व तिच्या मामाला वारंवार फोन केला असता १० दिवसांनी, १५ दहा दिवसांनी येणार आहे, तुम्ही काळजी करू नका. असे सांगण्यात आले. परंतु, ती आलीच नाही. आपली फसगत झाल्याचे लक्षात देताच हरिचंद्र अशोक कुबेर यांनी पोलिस ठाण्यात धाव घेत फिर्याद दिली.

त्यावरून संशयित कुसुम अजय चव्हाण हिच्यासह कुंडलिक चव्हाण, संगीता कुंडलिक चव्हाण, कल्पना प्रकाश मोराळकर, मीरा गिरी व सूर्यनारायण, मुळे (पूर्ण नाव माहीत नाही) यांच्याविरुद्ध वाळूज एमआयडीसी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला.

## जिल्ह्यातील २९६ गावांचा पोखरा योजनेत समावेश

छत्रपती संभाजीनगर : शेती आणि शेतीशी निगडीत बाबींच्या विकासासाठी असणाऱ्या नानाजी देशमुख कृषी संजीवनी (पोखरा) योजनेचा दुसरा टप्पा राबविण्यात येत आहे. यासाठी राज्य शासनाने मान्यता दिली आहे. यामध्ये मराठवाड्यातील ८ जिल्ह्यांसह विदर्भातील ११ व खान्देशमधील जळगाव आणि नाशिक अशा एकूण २१ जिल्ह्यांतील ६ हजार ९५९ गावांचा समावेश आहे. या योजनेत संभाजीनगर जिल्ह्यातील २९६ गावे आहेत. १० ऑक्टोबर रोजीच्या शासन निर्णयात दुसऱ्या टप्प्यासाठी ६ हजार कोटी रुपयांच्या बजेटची घोषणा करण्यात आली आहे. दरम्यान योजनेचा पहिला टप्पा यशस्वी ठरल्यानंतर राज्य सरकारने ९८ जून रोजी मंत्रिमंडळाची बैठक घेऊन दुसऱ्या टप्प्याला मान्यता देत असल्याचे जाहीर केले होते. त्यानंतर ३० जून रोजी या योजनेला तत्त्वतः मान्यता देण्यात आली आहे. यामध्ये सहा हजार कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे. कोणत्या जिल्ह्याला किती बजेट मिळणार याकडे लक्ष लागून आहे.

## माजी सैनिक परिषद अधिवेशन उत्साहात

छत्रपती संभाजीनगर : पंचकर्म म्हणजे कुटुंब प्रबोधन, समरसता, नागरिक शिष्टाचार आणि स्वबोध जागरण, पर्यावरण. या पंचकर्म (पाच विषयांवर) पुढील काळात काम व्हावे, अशी अपेक्षा भारतीय पूर्व सैनिक सेवा परिषदेच्या महाराष्ट्र व गोवा राज्याचे अध्यक्ष एअर निवृत्त मार्शल प्रदीप बापट यांनी व्यक्त केली. राष्ट्रीय स्वंयसेवक संघाच्या सातारा परिसरातील समर्पण या संघाच्या प्रांत कार्यालयात रविवारी (दि.२०) झालेल्या अखिल भारतीय पूर्व सैनिक सेवा परिषदेच्या महाराष्ट्र व गोवा राज्याच्या वार्षिक अधिवेशनात ते बोलत होते. देवगिरी प्रांत संघ चालक अनिल भालेराव आणि प्रांत कार्यवाह धनंजय धामणे यांची प्रमुख उपस्थिती होती. या कार्यक्रमात बापट यांनी उपस्थितांना पंचकर्माचे महत्त्व सांगितले. दुपारच्या सत्रामध्ये विदर्भ, मराठवाडा, मुंबई, गोवा येथील प्रांताध्यक्षांनी आपल्या भागातील कार्याचा अहवाल सादर केला. मातृशक्ती अंतर्गत पूनम कुमारी यांनी विचार मांडले. राज्याचे संघटनमंत्री रमेश देसाई यांनी समारोप भाषण केले. विनय देवगावकर यांनी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केले. सर्जन कॅप्टन मोहन रोटे यांनी आभार मानले.